# ग्रामीण भागात तृणमूल स्तरावर काम करणाऱ्या कार्यकर्त्यांचे चर्चासत्र

विषय

वंचिताभिमुख विकासविचार, व्यूहनीती व कृतीकार्यक्रम

आधारभूत टिपण व चर्चासत्राचा संक्षिप्त अहवाल

प्रयास

संसाधने व उपजीविका गट
प्रयास, पुणे.

ऑगस्ट २००३

# प्रस्तावना

आज भारतात वंचित समूहांच्या उपजीविकेचा प्रश्न गंभीर बनला आहे. अनेक ठिकाणी रूढ विकास धोरणांच्या अंमलबजावणीमुळे व जागतिकीकरणांतर्गत येणाऱ्या धोरणे व प्रकल्पांमुळे लोकांच्या उपजीविकेचा प्रश्न आणखीनच तीव्र बनल्याचे दिसते. ठिकठिकाणी लोक व त्यांच्या संघटना अशा विध्वंसक प्रकल्पांना विरोध करीत असतानाच अनेक अभ्यासक व कार्यकर्ते विविध प्रकारच्या पर्यायांची मांडणी व प्रत्यक्षात उभारणी करताना दिसत आहेत.

प्रयास संस्थेमधील 'संसाधने व उपजीविका' गट गेल्या दोन वर्षांपासून ग्रामीण भागातील नैसर्गिक संसाधने व त्यावर अवलंबून असणाऱ्या लोकांच्या उपजीविका या विषयावर काम करीत आहे. या कामाचा एक भाग म्हणून विकासाच्या रूढ प्रतिमानाची समीक्षा आणि त्याचा प्रतिवाद करणाऱ्या पर्यायी विकास–विचारांचा अभ्यास आम्ही करत आहोत.

या संदर्भात संसाधने आणि उपजीविका गटातर्फे दि. १५ डिसेंबर २००२ रोजी पुणे येथे 'विकास विषयक चर्चासत्र'आयोजित करण्यात आले होते. यामध्ये रूढ विकास प्रतिमानाची समीक्षा आणि त्याविरोधी पर्यायांची मांडणी यावरील प्राथमिक स्वरूपाच्या चर्चेत अनेक अभ्यासक आणि कार्यकर्ते सहभागी झाले होते. या चर्चासत्रात पर्यायी विकास–विचारांची संकल्पनात्मक आणि व्यूहनीतीच्या पातळीवर व्यवस्थित मांडणी करण्याची गरज प्रकर्षाने पुढे आली. या चर्चेमध्ये अशीही सूचना करण्यात आली की तळागाळात काम करणाऱ्या कार्यकर्त्यांच्या बरोबर पर्यायी विकास व्यूहनीतीबाबत विचार–विनिमयाची वेगळी प्रक्रिया सुरू करण्यात यावी आणि त्यात प्रयासने समन्वयकाची भूमिका बजवावी.

त्यानुसार आम्ही 'पर्यायी विकासाची व्यूहनीती' या विषयावर कोकण भागात काम करणाऱ्या कार्यकर्त्यांचे चर्चासत्र दि. २० जुलै २००३ रोजी आणि प. महाराष्ट्र, विदर्भ, मराठवाडा येथे काम करणाऱ्या कार्यकर्त्यांचे चर्चासत्र दि. १० ऑगस्ट २००३ रोजी पुणे येथे आयोजित केले होते. सदर चर्चासत्रातील चर्चेचा संक्षिप्त गोषवारा सर्वांना उपलब्ध व्हावा या उद्देशाने हा दस्तावेज तयार केला आहे. या चर्चासत्राकरता पर्यायी विकासाच्या व्यूहनीतीवर आम्ही एक सविस्तर टिपण तयार केले होते. या टिपणाच्या पहिल्या भागात प्रामुख्याने पर्यायी विकास विचारांच्या संकल्पनात्मक गाभ्याची एक विशिष्ट मांडणी केली आहे. टिपणाच्या दुसऱ्या भागात त्या गाभ्यावर आधारित पर्यायी विकासाच्या व्यूहनीतीची मांडणी करण्याचा प्रयत्न केला आहे. तर टिपणाच्या तिसऱ्या भागात या व्यूहनीतीवर आधारित कृतीकार्यक्रमाची मांडणी करण्याचा प्रयत्न केला आहे. चर्चासत्राच्या तयारीसाठी तीन भागातील हे टिपण सर्व निमंत्रित कार्यकर्त्यांना आधी पाठवण्यात आले होते.

हे आधारभूत टिपण व दोन्ही दिवशी झालेल्या चर्चेचा संक्षिप्त अहवाल याचा या दस्तावेजात समावेश आहे. या चर्चासत्रात टिपणातील भाषा, संज्ञा आणि आशय याबद्दल उपस्थितांकडून अनेक महत्त्वपूर्ण सूचना केल्या गेल्या. त्या सूचनांवर आमचे काम चालू आहे. या दस्तावेजात मूळ टिपण (भाषेचे काही बदल वगळता) आहे त्या स्वरूपातच समाविष्ट केले आहे. तसेच चर्चेच्या शेवटी ही प्रक्रिया पुढे चालवण्याबाबत कार्यकर्त्यांनी अनेक कार्यक्रमात्मक सूचना केल्या. ह्या सूचनांवरील एक छोटीशी टिपणी या दस्तावेजाच्या शेवटी दिली आहे. तसेच चर्चासत्राला उपस्थितांची नावे, डाकपत्ते व इतर संपर्क पत्त्यांची माहितीही सोबत दिली आहे. पर्यावरण व विकास ह्या विषयामध्ये रस असणाऱ्या महाराष्ट्रातील कार्यकर्ते व अभ्यासक यांना हा दस्तावेज उपयुक्त ठरेल असा विश्वास वाटतो.

**संसाधने व उपजीविका गट, प्रयास**

# वंचिताभिमुख विकासविचार, व्यूहनीती, व कृतीकार्यक्रम

## अनुक्रमणिका

**विभाग पहिला : चर्चेसाठी टिपणाचे प्रारूप**

टिपणाची प्रस्तावना ०१

भाग १ पर्यायी व्यूहनीतीचा संकल्पनात्मक गाभा ०३

भाग २ उपजीविकाकेंद्री विकासाची व्यूहनीती १२

भाग ३ त्रिसूत्री व्यूहनीतीवर आधारित कृतीकार्यक्रमाची रूपरेषा २८

**विभाग दुसरा : चर्चासत्राचा अहवाल**

दि. २० जुलै आणि १० ऑगस्ट रोजी झालेल्या चर्चासत्राचा अहवाल ३६

*उपस्थित कार्यकर्त्यांची नावे व संपर्क पत्ते* ५०

# वंचितांच्या विकासासाठी पर्यायी व्यूहनीती

**प्रस्तावना**

महाराष्ट्रासारख्या प्रगत म्हणून ओळखल्या जाणाऱ्या राज्यातील विविध वंचित गटांपुढे दारिद्र व विकास या बाबतीतील अनेक गंभीर प्रश्न उभे आहेत. याचे काहीसे प्रतिबिंब नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या महाराष्ट्र राज्याच्या मानवी विकास विषयक अहवालामध्येही पडलेले दिसते. अहवालामध्ये म्हटल्याप्रमाणे आजही महाराष्ट्र राज्यामध्ये ५५% लोकांना पुरेसा उष्मांक असणारा आहार दररोज मिळत नाही.

स्वातंत्र्यानंतर स्वीकारलेल्या विकासाच्या रूढनीतीमुळे वंचित वर्गाचे प्रश्न सुटण्याऐवजी आणखीन गंभीर होत गेले. त्यानंतर १९९१ पासून देशामध्ये आर्थिक सुधारणा ह्या नावाखाली सुरू झालेल्या उदारीकरण, जागतिकीकरण व खाजगीकरण (उजाखा) ह्या धोरणांचे दुष्परिणाम विविध ठिकाणी तीव्रपणे दिसू लागले आहेत. बंद पडलेल्या कारखान्यांमुळे वाढलेली बेकारी, सरकारी दवाखान्यांची हलाखीची स्थिती व वाढलेले दर, रेशनवरच्या धान्याचे वाढते दर व कमी झालेली उपलब्धता, विजेचे वाढते दर, लोककल्याणाच्या इतर योजनांना लागलेली कात्री या साऱ्याच्या झळा समाजातील विविध वर्गांना तीव्रपणे जाणवत आहेत. साहजिकच समाजामध्ये ह्या धोरणाविरुद्ध व ती धोरणे राबवणाऱ्या सरकारांविरुद्ध असंतोष वाढतो आहे. ह्या असंतोषाची जाणीव होऊन सरकारे व राजकीय पक्ष आता मानवी चेहरा असणाऱ्या आर्थिक सुधारणेची भाषा करीत आहेत. या वर्षीचा महाराष्ट्र राज्य सरकारचा अर्थसंकल्प तर सामाजिक न्यायाच्या मुद्‌द्यांवर मांडला गेला होता.

आर्थिक सुधारणा व रूढ विकासनीतीबाबतचा हा असंतोष पसरत असला व समाजाच्या मुख्य प्रवाहातील बलिष्ठ गटांना त्याची धग जाणवत असली तरी त्या रूढ विकासनीतीला पर्याय ठरू शकणाऱ्या विकासनीतीची मांडणी मात्र अजून आवश्यक त्या तयारीने व जोमदारपणे झालेली नाही. महाराष्ट्रामध्ये अनेकविध पर्यायी प्रयोगांवर व उपक्रमांवर अनेक व्यक्ती/संस्था/ संघटनांनी काम केले आहे व करीत आहेत. मात्र यातून निर्माण होणाऱ्या माहिती, ज्ञान, व अनुभवाच्या जोरावर एका व्यापक विकासनीतीच्या सशक्त पर्यायाचे आव्हान रूढ विकासनीती व आर्थिक सुधारणांच्या समोर उभे करण्यामध्ये अजून यश आलेले नाही.

ह्या उणिवेच्या किंवा अपयशाच्या पार्श्वभूमीवर सध्या काही आंतरराष्ट्रीय संघटनांचे विकासनीतीची नवी मांडणी करण्याचे प्रयत्न अधिकच चिंताजनक वाटतात. ब्रिटिश सरकारचे आंतरराष्ट्रीय विकास खाते (डिपार्टमेंट फॉर इंटरनॅशनल डेव्हलपमेंट अथवा डीएफआयडी) ह्या बाबतीत पुढाकार घेते आहे. 'डीएफआयडी'च्या पुढाकाराने चाललेल्या ह्या कामातून विकासाच्या एका नव्या व्यूहनीतीची (स्ट्रॅटेजी) मांडणी केली जाते आहे. ह्या विकासाच्या नव्या व्यूहनीतीच्या गाभ्याचे सूत्र 'शाश्वत उपजीविका' हे आहे. ह्या मांडणीचा अभ्यास केला असता असे दिसते की आजवर रूढ विकासनीतीला विविध प्रकारचे सामाजिक, आर्थिक, राजकीय, व पर्यावरणीय पर्याय सुचवणाऱ्या पर्यायवाद्यांनी मांडलेल्या अनेक संकल्पना व तत्त्वे ह्या नव्या व्यूहनीतीमध्ये स्वीकारली गेली आहेत. त्या विकासनीतीचा केवळ आशयच नव्हे तर भाषाही पर्यायवाद्यांना आवडेल अशीच आहे. हे सारे स्वागतार्ह वाटले तरी जेव्हा व्यापक आर्थिक धोरणाचा प्रश्न येतो तेव्हा पर्यायी भासणारी विकास व्यूहनीतीची ही सारी मांडणी जागतिकीकरणाच्या धोरणाचा एक भाग म्हणून दाखवली जाते. वेगळ्या शब्दांत सांगायचे तर पर्यायवादी आशय व भाषा असणारी विकास व्यूहनीतीची ही मांडणी जागतिकीकरणाच्या धोरणाच्या समर्थनार्थ वापरली जाते आहे. हे एक प्रकारे पर्यायवादाचे 'हरण' किंवा गैरवापर ठरेल.

हे काहीतरी केवळ सैद्धांतिक पातळीवर व दूर ब्रिटनमध्ये घडते आहे असे नव्हे. तर ह्या नव्या विकास व्यूहनीतीवर आधारित मोठे (म्हणजे ४०० व ६०० कोटी रुपयांचे) 'लाईव्हलीहुड' ('पॉव्हर्टी एलिमिनेशन' नव्हे) प्रकल्प आता आंध्रप्रदेश व ओरिसातील राज्य सरकारे 'डीएफआयडी'च्या साहाय्याने राबवू लागली आहेत. आता लवकरच जागतिक बँकेपासून महाराष्ट्र सरकारपर्यंतच्या साऱ्या संस्था 'उजाखा' धोरणांच्या दुष्परिणामांवर मलमपट्टी करण्यासाठी डीएफआयडीचा कित्ता गिरवू लागतील. याची सुरवात UNDP सारख्या संस्थांनी आधीच केली आहे.

अशाप्रकारे एका बाजूने व्यापक अशा पर्यायी विकासनीतीची मांडणी करून 'उजाखा' धोरणांना सशक्त आव्हान उभे करण्यात पर्यायवादी अजून यशस्वी झालेले नाहीत. तर दुसऱ्या बाजूने डीएफआयडी सारख्या बलदंड, मुख्यप्रवाही संस्था पर्यायवादी संकल्पनांचा वापर जागतिकीकरणाच्या समर्थनासाठी करीत आहेत.

या परिस्थितीमध्ये रूढ विकासनीतीला, 'उजाखा' धोरणांना, व त्यांच्या दुष्परिणामांना विरोध करणाऱ्या साऱ्या पर्यायवाद्यांवर एक मोठी जबाबदारी येते. त्यांनी व त्यांच्या पूर्वसुरींनी मांडलेल्या पर्यायी विकासाच्या संकल्पना, तत्त्वे यावर त्यांनी आपला हक्क पुनर्प्रस्थापित केला पाहिजे. रूढ विकासनीतीला व 'उजाखा' धोरणांना सशक्त पर्याय देऊ शकणाऱ्या एका व्यापक आवाक्याच्या विकासविचाराची तसेच त्या विचाराची अंमलबजावणी करण्यासाठी एका सविस्तर व्यूहनीतीची मांडणी करण्याची जबाबदारी आज साऱ्या पर्यायवाद्यांवर आहे. अन्यथा 'उजाखा' समर्थक संस्थांनी सोडलेला अश्वमेधाचा वारु थोपविण्यासाठी लागणारे सैद्धांतिक व व्यूहात्मक बळ उभे करणे 'उजाखा'च्या विरोधकांना कठीण होईल.

पर्यायांची ही मांडणी एकट्या दुकट्या व्यक्ती अथवा संस्थेने न करता त्यासाठी अनेक व्यक्ती/संस्था/संघटना यांचा सहभाग असणारी चर्चेची प्रक्रिया ठिकठिकाणी सुरू झाली पाहिजे. अशा चर्चांमध्ये समाजातील विविध घटकांनी भाग घेतल्यास ह्या पर्यायी विकासनीतीचा प्रसार विविध क्षेत्रे, माध्यमे, व संस्थांमध्ये होऊन त्यामागे जनमताचे पाठबळ उभे राहील. अशा विकासविचारातील आशयाचे महत्त्व/प्रस्तुतता व त्यामागचे जनमताचे पाठबळ यांच्या समन्वयातून 'उजाखा' धोरणांना व डीएफआयडीसारख्या जागतिकीकरणवादी संस्थांच्या प्रयत्नांना जोमदार आव्हान उभे करता येईल.

अशा प्रयत्नांमध्ये आपला सहभाग असावा ह्या हेतूने प्रयासच्या 'उपजीविका व संसाधने' गटातर्फे पर्यायी विकासविचारांचा अभ्यास केला जात आहे. ह्या अभ्यासाच्या आधारे विकास व पर्यावरणाशी संबंधित विविध क्षेत्रांमधील अभ्यासक व कार्यकर्ते यांच्याबरोबर पर्यायी विकासावर चर्चा करण्याचे प्रयत्न आम्ही सुरू केले आहेत. या प्रयत्नांची सुरुवात म्हणून प्रयासतर्फे दि. १५ डिसेंबर २००२ रोजी पुणे येथे एक चर्चासत्र आयोजित केले होते. ह्या चर्चासत्रात उपस्थित असणाऱ्या पन्नासच्या वर कार्यकर्ते व अभ्यासकांनी अशा प्रकारच्या चर्चांची एक व्यापक प्रक्रिया सुरू होण्याची गरज मांडली. त्या चर्चासत्रामध्ये अशीही एक सूचना आली होती की विकासाच्या प्रश्नांवर काम करणाऱ्या तळागाळातील कार्यकर्त्यांना अशा प्रक्रियेत समर्थपणे सहभाग घेता यावा यासाठी वेगळे प्रयत्न केले पाहिजेत. त्यादृष्टीने विकासाच्या व्यूहनीतीसारख्या कार्यकर्त्यांच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नावर एक वेगळी चर्चाप्रक्रिया तळागाळातील कार्यकर्त्यांसाठी चालवली जावी. या सूचनेनुसार प्रयासतर्फे महाराष्ट्रातील कार्यकर्त्यांसोबत एक चर्चाप्रक्रिया सुरू करण्याचा प्रयत्न करीत आहोत.

कार्यकर्त्यांसाठीच्या ह्या चर्चाप्रक्रियेसाठी पर्यायी विकासविचाराच्या व्यूहनीतीची प्राथमिक मांडणी करणारे एक टिपण प्रयासतर्फे तयार केले आहे. त्याचे दोन भाग असून पहिल्या भागात पर्यायी विकासविचाराच्या संकल्पनात्मक गाभ्याची थोडक्यात मांडणी केली आहे. तर दुसऱ्या भागात त्या विचारानुसारच्या व्यूहनीतीचे प्राथमिक प्रारूप (कच्चा व प्राथमिक खर्डा) मांडला आहे. कार्यकर्त्यांच्या चर्चेतून ह्या प्राथमिक प्रारूपाला चांगला आकार येईल तसेच त्याची आशयघनता व व्यूहात्मक ताकत वाढेल असे खात्रीने वाटते. तळागाळात काम करणाऱ्या महाराष्ट्रातील अनुभवसंपन्न कार्यकर्त्यांकडून प्रयासच्या ह्या प्रयत्नांना भरघोस प्रतिसाद मिळेल अशी आशा वाटते.

# भाग १ : पर्यायी व्यूहनीतीचा संकल्पनात्मक गाभा

## रूढ विकासनीती : अपयशाची कारणमीमांसा

भारत आणि इतर अनेक विकसनशील देशातील गरिबांना भेडसावणाऱ्या भूक, गरिबी, आणि वंचनेच्या प्रश्नांनी तीव्र रूप धारण केले आहे. यावरून या देशांनी स्वातंत्र्योत्तर काळात अंगीकारलेल्या विकासाच्या व्यूहनीतीचे दारुण म्हणावे असे अपयश स्पष्ट होते. या देशांतील आर्थिक आणि राजकीयदृष्ट्या प्रस्थापित गटांनी स्वीकारलेली विकासाची पारंपरिक किंवा रूढ व्यूहनीती प्रामुख्याने दोन तत्त्वांवर आधारित आहे: (१) बृहत् स्तरावरील आर्थिक वृद्धी आणि (२) झिरपा सिद्धांत. बृहत्–आर्थिक वृद्धी (मॅक्रो–इकॉनॉमिक ग्रोथ) म्हणजे वस्तू आणि सेवा यांच्या राष्ट्रीय स्तरावरील उत्पादनामधील वाढ. ही वृद्धी साध्य करण्यासाठी रूढ विकासनीतीमध्ये मुख्यत: शहरी–औद्योगिक व्यवस्थेच्या वाढीवर आणि 'आधुनिक' (म्हणजे रसायनांच्या व स्वयंचलित यंत्राच्या मोठ्या प्रमाणावरील वापरावर अवलंबून असणारी) शेती–व्यवस्था विकसित करण्यावर भर दिला गेला. वेगळ्या शब्दात सांगायचे तर, बृहत् आर्थिक वृद्धीसाठी व पर्यायाने देशाच्या विकासासाठी उद्योगधंदे (त्यातही मोठे व मध्यम) व आधुनिक शेती यावर मुख्य भिस्त ठेवण्यात आली होती. त्यामुळे विकासाचे प्रयत्न मुख्यतः उद्योगधंदे व आधुनिक शेती यांच्या प्रसार व वाढीवर केंद्रित करण्यात आले.

रूढ विकासनीतीमागील दोन तत्त्वे

या रूढ व्यूहनीतीमध्ये बृहत् आर्थिक वाढीचे फायदे तळागाळातील लोकांपर्यन्त झिरपा प्रक्रियेने पोहोचतील असे गृहीत धरण्यात आले होते. या झिरपा प्रक्रियेसाठी दोन मार्गांवर भरवसा ठेवण्यात आला. पहिला मार्ग 'आर्थिक उपक्रमांच्या साखळी प्रक्रिये'चा. मोठे व मध्यम उद्योगधंदे व आधुनिक शेती यामुळे अनेक प्रकारचे पूरक आर्थिक उपक्रम चालू होतील. (उदा. आधुनिक शेतीमुळे ट्रॅक्टरचा पुरवठा, दुरुस्ती, इंधन पुरवठा, अशा पूरक उपक्रमांना गती मिळेल.) नंतर या प्रथम पातळीवरच्या आर्थिक उपक्रमांना पूरक ठरणारे दुसऱ्या व तिसऱ्या पातळीवरचे आर्थिक उपक्रम सुरू होतील. (उदा. ट्रॅक्टर दुरुस्ती करणाऱ्यांसाठी सुट्या भागांचा पुरवठा करण्याचा उद्योग; तो पुरवठा करण्यासाठी ट्रक, टेंपो आदींचा व्यवसाय; त्या ट्रक, टेंपो व्यावसायिकांच्या सोयीसाठी चहाच्या टपऱ्या असे आर्थिक उपक्रम आपोआप सुरू होतील.) अशा प्रकारे मोठे उद्योगधंदे व आधुनिक शेतीमधून प्रथम, द्वितीय, तृतीय स्तरावरील पूरक आर्थिक उपक्रमांची मालिकाच जणू साखळी प्रक्रियेने सुरू होईल. या उपक्रमांच्या साखळीतून नफा व उत्पन्न व त्यातून निर्माण होणारी खरेदी–क्षमता याद्वारे विकास समाजाच्या तळागाळापर्यंत पसरेल अशी रूढ विकासनीतीची अपेक्षा होती.

झिरप्याचा एक मार्ग : आर्थिक उपक्रमांची साखळी प्रक्रिया

झिरपा प्रक्रियेचा दुसरा मार्ग म्हणजे उत्पन्न व संपत्तीच्या फेरवाटपासाठी सरकारतर्फे चालवल्या जाणाऱ्या कार्यक्रमांचा. ज्या समाजगटांना आर्थिक वृद्धीचा फायदा होणार नाही किंवा आर्थिक उपक्रमात सहभागी होण्यासाठी आवश्यक क्षमता ज्यांच्याकडे नाहीत त्यांच्यासाठी हा मार्ग असेल. अशा 'दुर्बल' समाजगट व व्यक्तींना साहाय्य पुरवणे, तसेच त्यांच्या क्षमता–वर्धनासाठी प्रयत्न करून त्यांना आर्थिक वृद्धीच्या प्रक्रियेत सामील होण्याची संधी मिळवून देणे या उद्दिष्टांनी सरकार विविध कार्यक्रम व योजना आखीत असते. (निराधार योजना, आश्रमशाळा,

आदिवासी मुलांना शिष्यवृत्ती ही सारी अशा फेरवाटपाच्या उपक्रमांची उदाहरणे आहेत.) या उपक्रमांसाठीचा खर्च समाजातील उच्च उत्पन्न गटांना कर लावून त्यांच्याकडून मिळवला जातो. म्हणून त्यांना (संपत्तीच्या/उत्पन्नाच्या) फेरवाटपाचे उपक्रम असे म्हटले जाते. झिरपा प्रक्रियेचा हा दुसरा मार्ग होय.

झिरप्याचा दुसरा मार्ग : फेरवाटपाचे सरकारी कार्यक्रम

सत्तरीच्या दशकापासून या व्यूहनीतीमधील सैद्धांतिक आणि व्यावहारिक मर्यादा लक्षात येत गेल्या. मात्र त्यावरील उपाय म्हणून झिरपा प्रक्रिया जोरदार करण्यासाठी दारिद्र्याच्या प्रश्नाला सरळ भिडण्याच्या उद्देशाने दारिद्र्य-निर्मूलनाचे कार्यक्रम आखले जाऊ लागले. गेल्या पन्नास वर्षांमध्ये भारतामध्ये बऱ्यापैकी बृहत् आर्थिक वाढ झाली आणि सरकारी फेरवाटपाच्या तसेच दारिद्र्य-निर्मूलनाच्या कार्यक्रमावर प्रचंड पैसा खर्च झाला तरीही आजही कोट्यवधी लोक भूक, दीर्घ कुपोषण, आणि तीव्र वंचिततेने ग्रस्त आहेत. एवढेच नव्हे तर त्यांचे प्रमाण वाढते आहे.

रूढ विकासनीतीचे अपयश

देशादेशातील 'गरीब' लोक हे मुख्यत: त्या त्या समाजातील काही वंचित समाज-घटकांचे मिळून बनलेले असतात, हे आता सर्वमान्य आहे. भारतात अशा वंचित समाज घटकांमध्ये काही विशिष्ट मागास सामाजिक गट म्हणजे दलित, आदिवासी, आणि इतर मागासलेल्या जाती यांचा समावेश होतो. पण या मागास सामाजिक गटांतील विशेषतः लहान मुले, वृद्ध लोक आणि स्त्रिया यांच्या वाट्याला येणारी वंचना आणि अभावग्रस्तता कोणालाही शरमेने मान खाली घालायला लावेल अशीच आहे. ही अभावग्रस्तता इतर (म्हणजे तुलनेने कमी) मागास सामाजिक गटांतील स्त्रिया, वृद्ध, आणि लहान मुले यांचीही मुख्य समस्या आहे. त्यामुळे त्यांचाही समावेश वंचित समाज घटकांच्या यादीत करावयास हवा.

वंचित समाज घटक

हे सारे वंचित घटक कित्येक शतकांची आर्थिक नागवणूक, सामाजिक-सांस्कृतिक बहिष्कृतता, राजकीय सीमान्तीकरण आणि मानसिक कुंठितता यामुळे ग्रस्त आहेत. त्यांच्या सध्याच्या गरिबीच्या व वंचनेच्या मुळाशी असणारे हे बिगरआर्थिक घटक गरिबी निर्मूलनाचे प्रयत्न करताना लक्षात घ्यावे लागतील. वेगळ्या शब्दांत सांगायचे तर, समाजातील वंचित घटकांच्या दारिद्र्य / वंचनेचा वा विकासाचा विचार करताना नुसता रोजगार देण्याच्या (प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष) उपायावर विसंबून चालणार नाही. कारण त्यांच्या वंचनेच्या मुळाशी असणाऱ्या ह्या घटकांमुळे असे उपाय यशस्वी होणार नाहीत. तेव्हा एका बाजूने त्यांची आर्थिक विषमता दूर करताना दुसऱ्या बाजूने त्यांच्या सबलीकरणासाठी जोरदार प्रयत्न करावे लागतील.

वंचनेच्या मुळातील बिगर आर्थिक कारणे

रूढ विकासनीतीच्या तसेच दारिद्र्य-निर्मूलनाच्या कार्यक्रमाच्या ह्या दारुण अपयशामागे अर्थातच अनेक कारणे आहेत. त्यामध्ये सरकारी यंत्रणेतील भ्रष्टाचार, अनास्था यांसारखी कारणे तर आहेतच. परंतु अनेक अभ्यासकांच्या मते दारिद्र्य, वंचना याकडे तसेच दारिद्र्यनिर्मूलनाकडे पाहण्याचा चुकीचा व मर्यादित असणारा पारंपारिक किंवा रूढ दृष्टिकोन हे देखील ह्या अपयशामागील एक महत्त्वाचे व मूलगामी कारण आहे. रूढ विकासविचारामधील सैद्धांतिक चर्चांमध्ये दारिद्य्र व वंचनेला अनेक आयाम आहेत हे मान्य केले जाते. मात्र जेव्हा धोरणे व कार्यक्रम आखण्याची वेळ येते तेव्हा रूढ दृष्टिकोनातून पाहणारे अभ्यासक व मुख्यतः अर्थशास्त्रज्ञ दारिद्य्र व वंचनेचा अत्यंत मर्यादित अर्थ लावतात. मुख्यतः स्वतःच्या कामातील गुंतागुंत कमी करण्याच्या दृष्टीने म्हणजे सोय म्हणून 'दारिद्य्र म्हणजे कमी उत्पन्न' असे म्हटले जाते. पण उत्पन्न मोजणे कठीण असल्याने

शेवटी 'दारिद्र्य म्हणजे वस्तूसेवांचा कमी वापर/उपभोग' असा सोयीचा अर्थ लावला जातो. त्यातही प्रत्यक्ष मोजमाप करताना दारिद्र्याचा निकष म्हणजे 'विशिष्ट (बऱ्याचदा २२००) कॅलरी (उष्णतामूल्य) असणारा अन्नाचा वापर एवढा मर्यादित स्वीकारला जातो. थोडक्यात, रूढ अर्थशास्त्रीय दष्टिकोनाच्या दारिद्र्याकडे पाहण्याच्या दोन मूळ धारणा पुढीलप्रमाणे आहेत. (अ) 'अन्नपदार्थांचा किंवा वस्तूंचा अपुरा उपभोग म्हणजे दारिद्र्य' व (ब) 'पुरेसे अन्न मिळवण्यासाठी आवश्यक तेवढे उत्पन्न देणारा रोजगार उपलब्ध होणे' म्हणजे दारिद्र्य–निर्मूलन.

अपयशाचे मुख्य कारण : मर्यादित रूढ दृष्टिकोन

ह्या मूळ धारणांमध्ये आक्षेपार्ह म्हणाव्यात अशा अनेक उणिवा आहेत. मूळात दारिद्र्याचा व वंचनेचा 'अन्नपदार्थांची कमतरता' एवढा मर्यादित अर्थ स्वीकारणे हे फारच एकांगी व अपुरे आहे. दारिद्र्यामध्ये अन्नाबरोबरच उपजीविकेच्या इतर किमान गरजांचाही पूर्णांशाने विचार होण्याची गरज आहे. त्या किमान गरजांमध्ये पाणी, वस्त्र, निवारा याबरोबरच पुरेश्या वैद्यकीय/आरोग्यविषयक व शिक्षणाच्या सेवा सुविधा यांचा समावेश व्हायला हवा. उपजीविकेचा विचार करताना दारिद्र्य व अभावग्रस्ततेच्या (वंचनेच्या) मुळाशी असणाऱ्या सर्वच कारणांचा विचार करायला हवा. ह्या कारणांमध्ये आधी म्हटल्याप्रमाणे आर्थिक विपन्नतेबरोबरीनं सामाजिक–सांस्कृतिक बहिष्कृतता, राजकीय सीमान्तीकरण, व मानसिक कुंठितता यांचाही विचार व्हायला हवा.

दष्टिकोनातील उणिवा

रूढ दष्टिकोनातील सर्वात महत्त्वाची उणीव म्हणजे पारंपरिक अर्थशास्त्रीय दृष्टिकोनाच्या मुळाशी असणारे वंचितांच्या उपजीविका मिळवण्याच्या पद्धतीबाबतचे चुकीचे गृहीतक. या दृष्टिकोनातून दारिद्र्यनिर्मूलनाकडे पाहताना त्यासाठी प्रत्येक व्यक्तीला उपजीविकेचे साधन म्हणजे प्रामुख्याने एक काम (एक नोकरी किंवा व्यवसाय) पुरवावे असे मानले जाते. त्यातून पैशाच्या स्वरूपात मिळणाऱ्या ठराविक रोख उत्पन्नातून उपजीविकेच्या साऱ्या गरजा भागवण्याकरता आवश्यक त्या सेवा व वस्तू विकत घेऊन त्या व्यक्तीने आपल्या कुटुंबाची उपजीविका भागवावी असे मानले जाते. 'एकच रोजगार/व्यवसाय, त्यातून रोख उत्पन्न व त्यातून उपजीविकेसाठी आवश्यक वस्तू–सेवांची खरेदी' ही उपजीविका मिळवण्याची पद्धती खरेतर शहरी–औद्योगिक समाजाचे व त्यातही मध्यम किंवा उच्चवर्गीय घटकांचे वैशिष्ट्य आहे. मात्र रूढ दृष्टिकोनानुसार हीच उपजीविकापद्धती सार्वत्रिक म्हणून स्वीकारली जाते आणि गरीब वंचित कुटुंबांनाही लागू केली जाते. प्रत्यक्षात बऱ्याच शहरी भागातील व सर्वच ग्रामीण भागातील गरीब व वंचित कुटुंबांची उपजीविकापद्धती खूपच वेगळी व गुंतागुंतीची असते. ही कुटुंबे त्यांच्या उपजीविकेच्या विविध गरजा भागवण्यासाठी विविध साधनस्त्रोतांवर अवलंबून असतात आणि अनेकविध उपक्रमांमधून त्यांच्या उपजीविकेच्या वेगवेगळ्या गरजा भागवल्या जातात. उदाहरणार्थ, एखाद्या कुटुंबाचे अन्न शेतीमधून, कपड्यासाठीचे रोख पैसे मजुरीमधून, व सरपण जंगलामधून येते. बहुसंख्य वंचित कुटुंबांच्या उपजीविकेच्या वेगवेगळ्या गरजा अशा विविध उपक्रमांतून व विविध साधनस्त्रोतांपासून भागवल्या जातात. त्यामुळे 'रोजगारह्नह्नत्यातून रोख उत्पन्नह्नह्नत्यातून सेवा/वस्तूंची खरेदीह्नह्न त्यातून गरजांची पूर्ती' या ठराविक पारंपरिक, शहरी–औद्योगिक, व मध्यमवर्गीय साच्यात गरीब–वंचितांच्या जीवनाचे वास्तव बसविणे चुकीचे ठरते. या संदर्भात आता 'व्यवसाय/रोजगार व रोख उत्पन्न' यांवर आधारित पारंपरिक व्याख्यांच्या मर्यादा ओलांडून ग्रामीण गरिबांच्या वास्तवाला व अनुभवांना सामावून घेऊ शकेल अशी विकासाची संकल्पना व त्यावर आधारित विकास दष्टिकोन या दोन्हींच्या गरजेला आता वेगाने मान्यता मिळत आहे.

वंचितांची वेगळी उपजीविका पद्धती

## उपजीविका सुरक्षितता : पर्यायी विकासनीतीचे प्राधान्याचे उद्दिष्ट

ग्रामीण भागातील वंचित कुटुंबे (तसेच शहरी, निमशहरी भागातील अनेक वंचित कुटुंबे) आपल्या उपजीविकेच्या विविध गरजा भागवण्यासाठी वेगवेगळे उपक्रम करतात हे आपण पाहिले. त्या उपक्रमासाठी ते वेगवेगळ्या प्रकारची साधनसामग्री वापरतात. त्या साधनसामग्रीमध्ये अनेक भौतिक गोष्टींबरोबर इतर भौतिक नसणाऱ्या गोष्टींचाही समावेश होतो. उपजीविकेसाठीच्या भौतिक साधनसामग्रीमध्ये जमीन, जंगलासारखी नैसर्गिक संसाधने; लाकूड, धान्य यांसारख्या वस्तूंचे साठे; त्याचप्रमाणे घर, झाडे, सोनेचांदी यांसारख्या स्थावर व जंगम मालमत्ता ह्यांचा समावेश होतो. गैरभौतिक साधनसामग्रीमध्ये भोवतालच्या संसाधनांवरील कायदेशीर व इतर प्रकारचे (उदा. पारंपारिक) अधिकार किंवा समाजाला मान्य असलेल्या कुटुंबाच्या विविध प्रकारच्या अपेक्षा व दावे (क्लेम्स) यांचाही समावेश होतो. या साऱ्या साधनसामग्रीचा उपयोग करुन उपजीविकेचे उपक्रम करताना त्या कुटुंबातील विविध व्यक्तींच्या क्षमताही निर्णायक ठरतात. ह्या क्षमतांमध्ये शारीरिक, मानसिक, सामाजिक, शैक्षणिक, व राजकीय क्षमतांचा समावेश होतो. अशाप्रकारे बाहेरील साधनसामुग्री व स्वतःच्या क्षमता वापरून वंचित कुटुंबातील व्यक्ती विविध उपक्रम करतात व त्यातून आपल्या कुटुंबाच्या उपजीविकेच्या गरजांची पूर्ती करण्यासाठी आवश्यक त्या वस्तू/सेवा मिळवतात. अशाप्रकारे ग्रामीण वंचित कुटुंबांच्या उपजीविकेच्या गरजा भागवण्यामध्ये त्यांचे उपजीविकेचे उपक्रम, त्यांना उपलब्ध असणारी साधनसामग्री, व त्यांच्या क्षमता या तीन गोष्टींचा महत्त्वाचा वाटा असतो.

उपजीविकेचे उपक्रम, साधनसामग्री, व क्षमता

वंचित कुटुंबांचे दारिद्र्य अथवा वंचना दूर करण्याची पहिली पायरी म्हणजे त्यांच्या उपजीविकेच्या साऱ्या किमान गरजांची नियमित रूपाने पूर्ती होणे. मात्र एवढे पुरेसे नाही. कारण ग्रामीण भागातील वंचित कुटुंबांना अनेक आर्थिक, राजकीय, सामाजिक, नैसर्गिक, व कौटुंबिक समस्यांना/संकटांना सतत सामोरे जावे लागते. या संकटांमुळे त्यांच्या क्षमता, साधनसामग्री, किंवा उपजीविका उपक्रम यावर विपरीत परिणाम होऊन त्यांच्या गरजापूर्तीवरही विपरीत परिणाम होतात. परिणामी, त्यांची उपजीविका धोक्यात येते. उपजीविकेवरील ह्या संकटांमध्ये काही संकटे आकस्मिक धक्क्यांच्या रूपाची (उदा. वादळ, गारपीट, पूर, मृत्यू) तर काही दीर्घकालीन ताणतणावांच्या रूपातील (उदा. दीर्घ आजार, व्यसन, मोठे कर्ज) असतात. ह्या साऱ्या संकटांचा यशस्वी प्रतिकार केला जाऊन उपजीविकेच्या गरजांची पूर्ती सातत्याने होत राहील अशी परिस्थिती निर्माण होणे म्हणजे उपजीविकेची खात्री अथवा सुरक्षितता निर्माण करणे. येथे सुरक्षितता हा शब्द 'संकटे व ताणांच्या उपजीविकेवरील दुष्परिणामांपासून मुक्तता' या अर्थाने वापरला आहे.

संकल्पना : 'उपजीविका सुरक्षितता'

उपजीविका सुरक्षिततेची ही संकल्पना पर्यायी विकासविचारामध्ये फार महत्त्वाची आहे. याचे पहिले कारण म्हणजे गरीब, वंचित कुटुंबांना सतावणारी सर्वात मोठी चिंता 'उद्या (व भविष्यात) उपजीविकेच्या गरजा भागतील ना?' हीच असते. म्हणजेच 'उपजीविकेची सुरक्षितता' ही त्यांची प्राधान्याची चिंता असते. ह्या संकल्पनेच्या महत्त्वामागील दुसरे कारण म्हणजे कुटुंबाला उपजीविका सुरक्षितता मिळाल्यावर कुटुंबाचे मिंधेपण संपते, कुटुंब खऱ्या अर्थाने (भौतिक व मानसिक दृष्ट्या) स्थिरावते. पुढील विकासाचा विचार करणे व त्यासाठी प्रयत्न करणे ह्यासाठी आवश्यक ती उसंत मिळू लागते व विकास होणे शक्य कोटीतले वाटू लागते. परिणामी, त्या कुटुंबाची पुढील विकासाची प्रेरणा बळावू लागते. त्यासाठी लागणारा संघर्ष करण्याची क्षमता

उपजीविका सुरक्षितता या संकल्पनेचे महत्त्व

देखील वाढते. एका अर्थाने उपजीविका सुरक्षितता म्हणजे वंचित कुटुंबांना पुढील प्रगती साधण्याचा स्वावलंबी मार्ग उघडून देणारे दार आहे.

सुरक्षित उपजीविका ह्या संकल्पनेशी थोडेफार साम्य असणारी व सर्वांच्या परिचयाची अशी संकल्पना म्हणजे 'अन्न–सुरक्षितता' किंवा 'अन्न–सुरक्षा'. भारताच्या संदर्भात, अन्न–सुरक्षितता या संकल्पनेचा वापर दोन अर्थांनी केला जातो. विकासाच्या पारंपरिक संकल्पना आणि कार्यक्रम यावर विश्वास असणाऱ्या रूढ विकासवाद्यांच्या मांडणीनुसार देशातील सर्व जनतेला पुरेल इतक्या धान्याचे उत्पादन देशातच करणे व त्यासाठी परकीय राष्ट्रांवर अवलंबून न राहाणे यालाच राष्ट्रीय किंवा बृहत् (macro) स्तरावरील अन्न–सुरक्षितता असे म्हणतात. याउलट बरेच पर्यायवादी अन्न–सुरक्षितता ही संकल्पना कौटुंबिक स्तरावर वापरतात. त्यांच्या मांडणीनुसार कुटुंबातील सर्व सदस्यांना वर्षभर पुरेसे अन्न मिळणे यालाच अन्न–सुरक्षितता म्हणावयास हवे. या संकल्पनेच्या माध्यमातून विकासाच्या पारंपरिक संकल्पना आणि कार्यक्रम यांना वंचित कुटुंबांना अन्न–पुरवठा करण्यासारख्या मूलभूत कामात सातत्याने आलेले अपयश ते अधोरेखित करतात. त्यापुढे जाऊन अनेक पर्यायवादी ह्या संकल्पनेच्या मर्यादित आवाक्यावर बोट ठेवतात. त्यासाठी ते आग्रहाने सांगतात की केवळ पुरेसा व खात्रीचा अन्न पुरवठा म्हणजे किमान विकास नव्हे. अन्न–सुरक्षा (किंवा अन्न–सुरक्षितता) ही संकल्पना वेगवेगळ्या रीतीने वापरल्यामुळे तसेच तिच्या मर्यादित आवाक्यामुळे निर्माण होणारे दोष पाहता विकासप्रक्रियेचे प्राथमिक उद्दिष्ट म्हणून उपजीविकेची सुरक्षितता ही संकल्पना अधिक प्रस्तुत व अधिक उपयुक्त वाटते.

अन्न–सुरक्षितता : संकल्पनेच्या मर्यादा

उपजीविकेच्या सुरक्षिततेचा विचार करताना अर्थातच त्यात पर्यावरणीय शाश्वततेचा (किंवा चिरंजीवतेचा म्हणजे सस्टेनेबिलीटीचा) विचारदेखील महत्त्वाचा ठरतो. कारण बहुसंख्य ग्रामीण वंचित कुटुंबांची उपजीविका त्यांच्या सभोवतालच्या नैसर्गिक संसाधनांवरच अवलंबून असते. पर्यायाने, त्यांच्या उपजीविकांची सुरक्षितता भोवतालच्या पर्यावरणाच्या शाश्वततेवर अवलंबून असते. त्यामुळे उपजीविका सुरक्षिततेच्या संकल्पनेतील पर्यावरणीय शाश्वततेचा विचार अधोरेखित करण्यासाठी काही वेळा 'शाश्वत–सुरक्षित उपजीविका' असा जोडशब्द वापरला जातो. तर काही वेळा 'संकटे व ताणापासून मुक्तता' ह्या अर्थाने 'सुरक्षितता' हा शब्द न वापरता त्याच संकल्पनेलाच 'सामाजिक शाश्वतता' असे म्हंटले जाते व शाश्वत–सुरक्षित उपजीविका ह्या शब्दाऐवजी केवळ 'शाश्वत (पर्यावरणीय व सामाजिक दृष्ट्या) उपजीविका' हा शब्द वापरला जातो.

संकल्पना : शाश्वत उपजीविका

या साऱ्या विवेचनाच्या आधारे असे म्हणता येईल की, 'अन्न विकत घेण्याइतके उत्पन्न देणारा रोजगार पुरवणे' हे वंचितांच्या विकासाचे उद्दिष्ट असू शकत नाही. तर 'उपजीविकेच्या सुरक्षिततेची खात्री असणारी परिस्थिती निर्माण करणे' हेच वंचितांच्या विकासाचे प्राथमिक उद्दिष्ट असायला हवे. या उद्दिष्टामध्ये उपजीविकेच्या किमान गरजांच्या यथायोग्य पूर्तीबरोबरच उपजीविकेवरील संकटे आणि ताण यांवर यशस्वी रीतीने मात करण्यासाठी आवश्यक ती ताकत/ क्षमता निर्माण करणे याचाही समावेश आहे.

उपजीविका सुरक्षितता : विकासाचे प्राथमिक उद्दिष्ट

येथे हे नमूद करावयास हवे की, आजवरच्या विकास प्रक्रियेत वंचितांना किमान उपजीविकेची सुरक्षितता देण्याइतके किमान उद्दिष्टदेखील साध्य झालेले नाही. किंबहुना आर्थिक–

वृद्धीच्या पाठलागात ह्या उद्दिष्टांकडे दुर्लक्ष झाले एवढेच नव्हे तर अनेकवेळा आर्थिक वृद्धीच्या मागे धावताना वंचितांच्या उपजीविकेवरच गदा आणली गेली. हा सारा इतिहास पाहता उपजीविका सुरक्षिततेचे उद्दिष्ट पारंपारिक विकासाच्या उद्दिष्टांपासून वेगळे करून पाहण्याची व ते अशा रीतीने अधोरेखित करण्याची नितांत गरज दिसून येते. वेगळ्या शब्दांत सांगायचे तर उद्योगधंदे व आधुनिक शेतीच्या विकासासाठी तसेच त्याच्या झिरप्यासाठी प्रयत्न करून वंचितांचा विकास तर होणार नाहीच पण त्यांना उपजीविका सुरक्षिततादेखील मिळणार नाही. वंचितांना उपजीविकेची सुरक्षितता मिळण्यासाठी नेमक्या त्याच उद्दिष्टांवर विकासप्रयत्न केंद्रित करावे लागतील.

रूढ विकासापासून फारकतीची गरज

याबाबतीतला आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे उपजीविकेची सुरक्षितता हे वंचितांच्या विकासप्रक्रियेचे अंतिम उद्दिष्ट नाही. परंतू ते विकासप्रक्रियेचे एक प्राधान्याचे उद्दिष्ट मात्र आहे. म्हणजेच, विकास, आर्थिक वाढ यासाठी केल्या जाणाऱ्या सर्व प्रयत्नांमध्ये पहिले व कळीचे स्थान वंचितांच्या उपजीविका सुरक्षिततेच्या उद्दिष्टाला दिले गेले पाहिजे. याचा एक अर्थ असा की, जोपर्यन्त वंचित घटकांना उपजीविकेच्या सुरक्षिततेची हमी मिळत नाही तोपर्यन्त कितीही आर्थिक वाढ अथवा औद्योगिक विकास झाला तरी त्याला खऱ्या अर्थाने विकास म्हणता येणार नाही. या प्राधान्याचा दुसरा अर्थ असा की वंचितांना उपजीविकेची सुरक्षितता मिळवून देताना उद्योगधंद्याच्या व आधुनिक शेतीच्या विकासाच्या प्रयत्नांना आवश्यकता पडली तर मुरड घालावी लागेल. आज याबाबत नेमकी उलट परिस्थिती आहे. या दोन्ही अर्थांनी 'उपजीविकेची सुरक्षितता' हे विकासप्रक्रियेचे प्राधान्याचे उद्दिष्ट आहे.

विकासाप्रक्रियेचे प्राधान्याचे उद्दिष्ट

मात्र आधी म्हटल्याप्रमाणे 'उपजीविका सुरक्षितता' हे विकासाचे अंतिम उद्दिष्ट नाही. या उद्दिष्टावर न थांबता उपजीविकेच्या किमान स्तराची खात्री मिळाल्यानंतर आर्थिक समृद्धीच्या पुढील पायऱ्या चढून स्वत:ची सर्वांगीण उन्नती साधण्याची वाट वंचित घटकांना मोकळी करुन देणे हे विकास–प्रक्रियेत अभिप्रेत आहे. आर्थिक समृद्धीबरोबरच सामाजिक समता, राजकीय सहभाग, आणि सांस्कृतिक समृद्धी व विविधता या साऱ्या संपन्न आणि आत्मसन्मानपूर्ण असे मानवी आयुष्य जगण्यासाठी आवश्यक गोष्टी सर्वांना मिळणे हे विकासाचे अंतिम उद्दिष्ट असले पाहिजे. आणि ते उद्दिष्ट गाठण्याचे मार्ग पर्यावरणीयदृष्ट्या शाश्वत असायला हवेत. थोडक्यात, सुरक्षित उपजीविकेच्या उद्दिष्टावर भर देणे म्हणजे त्याहून उच्चतर अशा समतापूर्ण व संपन्न जीविकेच्या उद्दिष्टाच्या पूर्ततेला नकार देणे असा नाही. उपजीविकेच्या सुरक्षिततेच्या उद्दिष्टावर भर हा मुख्यत: व्यूहात्मक आहे. आज वंचितांच्या जगण्याचाही प्रश्न अत्यंत गंभीर व तीव्र बनला आहे तो प्रश्न सोडविण्यासाठी, त्यावर सर्वांचे लक्ष खेचून घेण्यासाठी आवश्यक असे ते पहिले पाऊल आहे.

समतापूर्ण व संपन्न जीविकेच्या अंतिम उद्दिष्टाला नकार नव्हे.

त्याचबरोबर हे देखील स्पष्ट केले पाहिजे की साऱ्यांना प्रथम उपजीविका सुरक्षितता व नंतर संपन्न जीविका पुरवण्यासाठी वस्तू/सेवांच्या उत्पादनात वाढ करावी लागणार. बहुसंख्य पर्यायवाद्यांचा अशा प्रकारच्या आर्थिक वृद्धीला विरोध नसतो. विरोध असतो तो बृहत्–आर्थिक वाढीच्या नावाखाली संपत्ती निर्मितीची प्रक्रिया काही मर्यादित ठिकाणी केंद्रित करण्याला. विरोध असतो तो बृहत्–आर्थिक वाढीला एकमेव उद्दिष्ट बनवून खऱ्या विकासाकडे आणि निसर्गाच्या शाश्वततेकडे दुर्लक्ष करण्याला. समतापूर्ण व पर्यावरणीय शाश्वत मार्गाने विकास घडवताना वस्तू/सेवांच्या उत्पादनामध्ये वाढ करण्यास पर्यायवाद्यांचा विरोध असण्याचे कारण नाही.

आर्थिक वाढीला विरोध नाही.

## पोषण सुरक्षिततेचे महत्त्व

पोषण सुरक्षितता

सुरक्षित उपजीविका या संकल्पनेत उपजीविकेच्या सर्व गरजांची खात्रीशीर पूर्ती होणे अभिप्रेत आहे. परन्तु वंचित घटकांतील स्त्रिया व मुले यांच्या दृष्टीने विचार करता प्रथम 'पोषणाची सुरक्षितता' म्हणजेच 'किमान पोषणयुक्त आहाराचा सातत्यपूर्ण व हमीपूर्ण पुरवठा' ह्या उद्दिष्टाला सर्वोच्च प्राधान्य द्यावे लागेल.

प्रथिन–ऊर्जा कुपोषण

राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षणामधून 'प्रथिन ऊर्जा' कुपोषणाचे (Protein Energy Malnutrition) वाढते प्रमाण समोर आले आहे. जागतिक आरोग्य संघटनेनुसार आशियातील जवळजवळ ८०% मुले अशा प्रकारच्या कुपोषणाने ग्रस्त आहेत. प्रथिनयुक्त पदार्थांचा वापर रोजच्या आहारात नसणे अथवा अत्यंत कमी प्रमाणात असणे यामुळे हे कुपोषण घडते. ग्रामीण भागातील गरीब लोकांच्या आहारामध्ये प्रथिनयुक्त पदार्थांचा, उदा. दूध व दुग्धजन्य पदार्थ, मासे, मांस, तेलबिया आणि काही प्रकारची कडधान्ये व तृणधान्ये, वापर अत्यंत कमी प्रमाणात असतो. 'प्रथिन–ऊर्जा' कुपोषणामुळे मुलांची शारीरिक आणि मानसिक वाढ खुंटण्याची शक्यता असते.

सूक्ष्मपोषकद्रव्य कुपोषण

आहारातील जीवनसत्त्वे आणि खनिजद्रव्यांच्या कमतरतेमुळे होणाऱ्या आजारांना 'सूक्ष्मपोषकद्रव्य कुपोषण' असे संबोधले जाते. 'सूक्ष्मपोषकद्रव्य कुपोषण' हे सामाजिक–आर्थिक विकासात एक महत्त्वाचा अडथळा ठरले असून आधीच वंचित असलेले समूह यामुळे दारिद्र्य व वंचनेच्या दुष्ट चक्रात अडकतात. याचा दूरगामी परिणाम आरोग्य, शिक्षणाची क्षमता, आणि उत्पादकतेवर होतो. सूक्ष्मपोषकद्रव्य कुपोषणाची सामाजिक आणि सार्वजनिक किंमत मोठी आहे. यामुळे होणारे मोठ्या प्रमाणावरील आजार आणि अपंगता यामुळे लोकांमधील काम करण्याची क्षमता नष्ट होते आणि इतरही मानवी क्षमतांचा ऱ्हास होतो. जलद आणि सुयोग्य विकास घडवण्याकरता सूक्ष्मपोषकद्रव्य कुपोषणावर मात करणे ही पूर्वअट आहे.

कोकणातील पोषण असुरक्षितता

प्रयासने कोकण विभागाचा जो अभ्यास केला त्यातून रूढ विकास कार्यक्रमांचे स्थानिक लोकांच्या पोषणावर होणारे परिणाम पुढे आले आहेत. या अभ्यासातून असे दिसून आले की शहरीकरण व औद्यागीकरण या प्रक्रियांमुळे होणाऱ्या बदलांचे तीव्र परिणाम स्थानिकांच्या आहारातील पोषणमूल्यावर झाले आहेत. उदाहरणार्थ, नद्या, ओहळ आणि खाडीच्या पाण्यातील प्रचंड प्रदूषणामुळे लोकांच्या आहारातील माशांची उपलब्धता व वैविधता घटली आहे. त्यामुळे वंचितांच्या आहारामध्ये प्रथिनांचा पुरवठा करणारा महत्त्वाचा (व बऱ्याचदा एकमेव) स्रोत नष्ट झाल्यात जमा आहे. तसेच जंगलांचा ऱ्हास झाला आहे आणि आदिवासी आणि स्थानिक लोकांच्या जंगलातील वावरावर निर्बंध घातले गेले आहेत. त्याचबरोबर जंगलातील वैविध्यपूर्ण जातींच्या झाडांची जागा आता कोणतेही खाद्य–उत्पादन न करणाऱ्या निलगिरी, सुबाभूळ आणि ऑस्ट्रेलियन बाभूळ या झाडांच्या एकांगी लागवडीने घेतली आहे. या साऱ्या कारणांमुळे जंगलातून पुरवठा होणाऱ्या विविध प्रकारच्या अन्नाचे लोकांच्या आहारातील प्रमाण कमी कमी होत चालले आहे. कोकणातील देवगड भागामध्ये असे आढळून आले की गेल्या काही दशकांपासून पीक–पद्धतीतही लक्षणीय बदल घडला आहे. निर्यात केल्या जाणाऱ्या आंब्याच्या लागवडीमुळे तेथील कडधान्य आणि तेलबिया यांच्या लागवडीचे प्रमाण प्रचंड घटले आहे. अशा विविध बदलांचा एकत्रित परिणाम होऊन कोकणातील वंचित व गरीब लोकांना, विशेषतः स्त्रिया व मुले यांना प्रथिने, खनिजद्रव्ये, आणि उर्जायुक्त पोषक आहार मिळणे दुरापास्त होत चालले आहे.

या साऱ्या माहितीवरुन हे स्पष्टपणे दिसते की देशात फक्त काही भागातून मधून मधून घडणारे भूकबळी म्हणजे हिमनगाचे केवळ एक छोटेसे टोक आहे. या भूकबळींना कारणीभूत असणारे तीव्र कुपोषण देशभरात सर्वत्र व मोठ्या प्रमाणावर पसरलेले आहे. या कुपोषणाच्या विशेषत: स्त्रिया व मुले यांच्या शारीरिक आणि मानसिक आरोग्यावर होणाऱ्या भीषण परिणामांकडे बऱ्याच वेळा दुर्लक्ष केले जाते. ते पाहता कुटुंबातील सर्वांना विशेषतः स्त्रिया व मुलांना पोषक आहार पुरेशा प्रमाणात व नियमित मिळण्याची हमी म्हणजेच कौटुंबिक पातळीवर पोषणाची सुरक्षितता निर्माण करणे हे विकास–प्रक्रियेचे महत्त्वाचे उद्दिष्ट असायला हवे. जागतिक आरोग्य संघटनेने केलेल्या अभ्यासातून हे स्पष्टपणे नोंदविण्यात आले आहे. या अभ्यासानुसार संसाधनांवरील हक्कांचा अभाव, अन्न–वाटपाबाबत असलेली कुटुंबांतर्गत विषमता, आणि खरेदी–क्षमतेचा अभाव या गोष्टी कुटुंबाच्या वाढत्या पोषण–असुरक्षिततेला आणि अंतिमत: कुपोषणाला जबाबदार ठरतात. त्यामुळे समाजातील वंचित घटकांमधील सर्व व्यक्तींसाठी पोषणाची सुरक्षितता मिळवणे हे वंचितांच्या उपजीविका सुरक्षिततेच्या संदर्भात प्राथमिक उद्दिष्ट असले पाहिजे.

पोषण असुरक्षितता : कारणे

## सुरक्षित–उपजीविकाकेंद्री विकास दष्टिकोन

अर्थात वंचितांसाठी पोषण–सुरक्षा हे ‘सुरक्षित उपजीविका’ या व्यापक उद्दिष्टाप्रत पोहोचण्यासाठीचे केवळ पहिले पाऊल (अथवा पहिला टप्पा) आहे. आधी म्हंटल्याप्रमाणे यापुढील दुसरे महत्त्वाचे पाऊल अथवा टप्पा म्हणजे कुटुंबातील सर्व व्यक्तींच्या उपजीविकेच्या साऱ्या किमान गरजांची सर्वसामान्य परिस्थितीमध्ये पूर्तता होईल अशी परिस्थिती निर्माण करणे म्हणजेच ‘उपजीविका पूर्ती’ हा होय. त्यानंतरचा तिसरा घटक म्हणजे ‘उपजीविकेची सुरक्षितता’. सारांशाने वंचितांच्या विकासाचे त्यांच्या सुरक्षित उपजीविकेपर्यंतचे पुढील तीन टप्पे सांगता येतील. पोषणाची सुरक्षितता, उपजीविकेच्या किमान गरजांची पूर्तता (उपजीविका पूर्ती), आणि संकटे आणि ताणापासून उपजीविकेचे संरक्षण (सुरक्षित उपजीविका). त्यानंतर अर्थातच समतापूर्ण, संपन्न, व शाश्वत जीविकेच्या उद्दिष्टासाठीच्या प्रयत्नांना सुरवात होईल.

उपजीविका सुरक्षितता :
तीन टप्पे

उपजीविकेच्या सुरक्षिततेच्या उद्दिष्ट–पूर्तीसाठी सर्वांना किमान उपजीविका वर्षभर मिळेल, आणि नैसर्गिक, सामाजिक वा कौटुंबिक संकटातही तिचा स्तर ढासळणार नाही हे पाहावे लागेल. कुटुंबाकडे संकटाच्या काळात वापरता याव्यात म्हणून स्थावर/जंगम मालमत्ता अथवा वस्तू वा साधनांचे राखीव साठे निर्माण करुन ही सुरक्षितता मिळवता येईल. हे साठे अथवा मालमत्ता निर्माण करण्यासाठी उपजीविकेच्या उपक्रमांमधून मिळणाऱ्या वस्तू–सेवांमध्ये लक्षणीय वाढ व्हायला हवी. त्यासाठी उपजीविकेचे नवीन उपक्रम सुरु करणे अथवा उपजीविकेचे जुने उपक्रम मजबूत करणे, याची गरज आहे. उपक्रमात वृद्धी करण्याच्या प्रयत्नात उपक्रमांची व त्यासाठी वापरण्यात येणाऱ्या संसाधनांची उत्पादकता वाढविणे हा कळीचा घटक राहील. त्याचबरोबरीने उपजीविका उपक्रमासाठी आवश्यक ती साधनसामग्री व क्षमता यामध्येही वाढ करण्याची गरज भासेल. अशाप्रकारे उपजीविका सुरक्षितता मिळवण्यासाठी उपजीविकेच्या उपक्रमांची संख्या, त्यांची उत्पादकता, साधनसामग्री, व क्षमता या साऱ्यामध्ये वृद्धी करावी लागेल.

सुरक्षिततेसाठी
उपजीविका वृद्धी

उपजीविकेची सुरक्षितता मिळवण्यासाठी पुरेशा प्रमाणात म्हणजे वाढावा (सरप्लस) राहील अशा तऱ्हेने वस्तू/सेवा/रोख रक्कम मिळवावे लागतील. त्यासाठी उपजीविका उपक्रमांची संख्या,

त्यांची उत्पादकता, आवश्यक साधन सामग्री व क्षमता या साऱ्या गोष्टींमध्ये वाढ करावी लागेल. मात्र यामुळे होणारे आर्थिक सबलीकरण उपजीविका सुरक्षिततेसाठी पुरेसे नाही. त्याबरोबरीनेच वंचित घटकांचे राजकीय, सामाजिक-सांस्कृतिक, व मानसिक सबलीकरण घडवून आणणे तेवढेच महत्त्वाचे आहे. किंबहुना असे सर्वांगीण सबलीकरण न घडवता केवळ आर्थिक सबलीकरणावर भर दिल्यास उपजीविका सुरक्षिततेचे उद्दिष्ट साध्य होणार नाही. ह्याचे कारण म्हणजे वंचितांच्या आजच्या अपुऱ्या व असुरक्षित उपजीविकेच्या मुळाशी असणाऱ्या कारणांमध्ये राजकीय सीमान्तीकरण (परिघीकरण), सामाजिक-सांस्कृतिक बहिकृतता, व मानसिक कुंठीतता ही महत्त्वाची कारणे आहेत. ही कारणे दूर करण्यासाठी वंचितांचे राजकीय, सामाजिक-सांस्कृतिक व मानसिक सबलीकरण करण्यासाठी त्यांच्या बरोबर काम करणाऱ्या संस्था/संघटना आजही प्रयत्न करित आहेत.

उपजीविका सुरक्षिततेसाठी विविधांगी सबलीकरण

अशा प्रकारे उपजीविका सुरक्षितता ह्या संकल्पनेबाबत स्पष्टता आल्यानंतर त्यापुढे जाऊन शाश्वत/सुरक्षित उपजीविकेच्या संकल्पनेवर आधारित असा दारिद्र्य व दारिद्र्य निर्मूलनाकडे पाहण्यासाठीचा पर्यायी विकास दष्टिकोन विकसित करता येईल. बृहत्-स्तरावरील अन्न-सुरक्षेच्या संकल्पनेवर किंवा 'अन्न-रोख उत्पन्न-रोजगार' या संकल्पनेवर आधारित पारंपरिक विकास दष्टिकोनाच्या मर्यादांवरील उतारा म्हणून ह्या पर्यायी दृष्टिकोनाकडे पाहता येईल. पारंपरिक दृष्टिकोन केवळ अन्नाच्या गरजेवर (उष्मांकाच्या प्रमाणावर आधारित) लक्ष केन्द्रित करतो आणि केवळ बृहत् (अथवा राष्ट्रीय) स्तराचा विचार करतो. हजारो टन धान्य सरकारच्या गोदामात सडत पडलेले असतानाही जुलै-ऑगस्ट २००१ मध्ये देशाच्या विविध भागांत गेलेल्या भूकबळींनी ह्या पारंपरिक 'बृहत् स्तरावरील अन्न-सुरक्षेच्या' दृष्टिकोनावर भले मोठे प्रश्नचिन्ह उभे केले आहे. तेव्हा अन्न-उत्पन्न-रोजगार केंद्री दारिद्र्य निर्मूलनाच्या पारंपारिक दृष्टिकोनाऐवजी ह्या 'सुरक्षित उपजीविका' केंद्री दृष्टिकोनातून भूक, गरिबी व वंचनेच्या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी प्रयत्न केले पाहिजेत हे आता हळूहळू सर्वमान्य होते आहे. 'सुरक्षित-उपजीविका केंद्री' पर्यायी विकास दृष्टिकोन हा कुटुंब अथवा छोट्या समूहांच्या स्तरावर लक्ष केंद्रित करील. तसेच गरीब लोकांच्या उपजीविकांमधील गुंतागुंतीचे आणि वैविध्यपूर्ण वास्तव ओळखून ते मान्य करील. अशाप्रकारे उपजीविकाकेन्द्री दृष्टिकोन हा पारंपरिक दारिद्र्यकेन्द्री दृष्टिकोनापेक्षा अधिक व्यापक आणि वंचित गटांच्या वास्तवाशी घट्टपणे जोडलेला असेल. या दृष्टिकोनानुसार वंचित घटकांची 'उत्पन्नातील गरिबी' कमी करण्याऐवजी त्यांच्या 'उपजीविकेची सुरक्षितता' वाढविणे हे विकासाच्या व्यूहनीतीचे प्राथमिक उद्दिष्ट बनेल.

'सुरक्षित उपजीविका' केंद्री विकास दृष्टिकोन

टिपणाच्या या भागातील चर्चा प्रामुख्याने पर्यायी विकासाच्या व्यूहनीतीचा संकल्पनात्मक गाभा स्पष्ट करणारी होती. या पुढील भागात पर्यायी व्यूहनीतीची एक मांडणी करण्याचा प्रयत्न केला आहे. दारिद्र्याच्या व वंचितांच्या प्रश्नांना हात घालताना सुरक्षित/शाश्वत उपजीविकेची संकल्पना व त्यावर आधारित विकास दृष्टिकोन हे निश्चितच एक पुढचे पाऊल असले तरी त्याची मांडणी अजूनही प्रामुख्याने संकल्पनात्मक पातळीवर राहिली आहे. तेव्हा या प्रकारच्या पर्यायी विकासविचारावर आधारित असणारी विकासाची सुरक्षित उपजीविकाकेंद्री व्यूहनीती उभी करणे हे यापुढचे महत्त्वाचे पाऊल असेल.

'सुरक्षित उपजीविका' केंद्री विकास व्यूहनीती

❒❒❒

# भाग २: उपजीविकाकेंद्री विकासाची व्यूहनीती

## रूढ विकासनीतीच्या अपशयावरील उतारा

विकासाच्या पारंपारिक व्यूहनीतीला पर्याय शोधण्याची सुरुवात करताना पारंपरिक विकासनीती व त्यानुसार केलेले दारिद्र्यनिर्मूलनाचे प्रयत्न का फसले? ह्याची मीमांसा करावयास हवी. पारंपरिक व्यूहनीतीमध्ये असे मानले जाते की आर्थिक वृद्धीची प्रक्रिया (मोठे/मध्यम उद्योग व 'आधुनिक' शेती यामार्फत) समाजातील काही ठिकाणी किंवा काही वर्गांमध्येच सुरू होईल व मग तेथून तिचा झिरपा समाजाच्या कानाकोपऱ्यामध्ये होईल. वंचितांच्या दृष्टिने पाहता विकासाचा हा दोन टप्प्यांचा मार्ग आडवळणी, परावलंबी, व म्हणूनच बेभरवशाचा ठरतो.

रूढ विकासाचा आडवळणी मार्ग

काही समाजघटकांमध्ये आवश्यक त्या क्षमता नसल्यामुळे त्यांच्यापर्यंत विकासाचा झिरपा पोचत नाही. कधीकधी त्यांना बाजूला टाकून तो पुढे जातो. त्यामुळे असे घटक झिरप्यापासून व विकासापासून वंचित म्हणजे दरिद्री रहातात. तेव्हा त्यांचे दारिद्र्य दूर करण्यासाठी त्यांना झिरप्याच्या प्रक्रियेत सामील करून घेणे आवश्यक आहे. त्यासाठी काही खास प्रयत्न करावे लागतील असे मानून दारिद्र्य निर्मूलनाच्या योजना आखल्या जातात. त्याचबरोबरीने अशा व्यक्तींना काही प्रमाणात ताबडतोबीची मदत देण्याचीही गरज असते. याशिवाय समाजात काही घटक (उदा. वृद्ध, अपंग, निराधार) असे असतात की त्यांना झिरपा प्रक्रियेत सामील करून घेणे फारच कठीण अथवा अशक्य असते. अशांचा उदरनिर्वाह चालावा यासाठी त्यांना सातत्यपूर्ण रीतीने सहाय्याची गरज असते. असे सहाय्य देखील दारिद्र्यनिर्मूलनाच्या कार्यक्रमातून दिले जाते. थोडक्यात, समाजातील दुर्बल घटकांना (तात्पुरती किंवा दीर्घ पल्ल्याची) दयाभावी मदत देणे व गरिबांना आर्थिक वृद्धीच्या प्रक्रियेमध्ये सामील करून घेण्यासाठी त्यांचे क्षमतावर्धन व साधनसामग्रीचा पुरवठा करणे ही दारिद्र्यनिर्मूलनाच्या कार्यक्रमाची मुख्य उद्दिष्टे असतात.

दारिद्र्य निर्मूलनाच्या कामाची उद्दिष्टे

विकासाचा हा मार्ग स्वीकारल्यावर वंचितांना प्रत्यक्षात त्यांच्या विकासासाठी समाजातील बलिष्ठ वर्गांच्या केवळ (आर्थिक वृद्धी करणाऱ्या) आर्थिक उपक्रमांवरच नव्हे तर त्यांच्या दातृत्त्वावर देखील अवलंबून राहावे लागते. ह्याचे मुख्य कारण म्हणजे झिरप्याच्या प्रक्रियेचे यशापयश समाजातील बलिष्ठ वर्गांच्याच हाती असते. सैद्धांतिकदृष्ट्या पाहता, समाजात काही ठिकाणी निर्माण झालेली वृद्धी/संपत्ती समाजाच्या कानाकोपऱ्यामध्ये झिरप्याच्या दोन मार्गांद्वारे पसरणे अपेक्षित असते. मात्र आजवरच्या अनुभवावरून असे दिसते की प्रत्यक्षात त्या झिरप्याच्या प्रक्रियेमध्ये विविध अडचणी उभ्या करून आर्थिक वृद्धीचे/ संपत्तीचे शक्य तितके सर्व फायदे स्वतःसाठी मिळवण्याचा जोरदार प्रयत्न समाजातील वेगवेगळे बलिष्ठ घटक करत असतात. आर्थिक उपक्रमांच्या साखळीतील उपक्रम आपल्या ताब्यात ठेवणे, त्यातला इतरांचा नफा/ उत्पन्न मर्यादित ठेवणे, फेरवाटप उपक्रमांकरता निधी उभारण्यासाठीच्या करपद्धतीला विविध प्रकारे (कर कमी करून, कर टाळून) विरोध करणे, फेरवाटपाचे फायदे वंचित गटाऐवजी आपल्याकडे वळवण्यासाठी फेरवाटप कार्यक्रमांच्या आखणीमध्ये घोटाळे करणे, त्या कार्यक्रमांच्या अंमलबजावणीमध्ये भ्रष्टाचार करणे असे अनेकविध प्रयत्न बलिष्ठ गटांकडून झिरपा स्वतःकडे वळवण्यासाठी केले जातात. अशा प्रयत्नांना विरोध करण्याची आर्थिक वा राजकीय ताकत वंचित

झिरपा प्रक्रियेचे राजकीय अर्थशास्त्र

गटांमध्ये अर्थातच नसते. झिरपा प्रक्रियेत गुंतलेल्या ह्या 'राजकीय' अर्थशास्त्रामुळे प्रत्यक्षात आर्थिक वृद्धीचा झिरपा समाजातील तळागाळापर्यंत पोहोचत नाही. रूढ विकासनीतीच्या सिद्धांतामध्ये प्रत्यक्षात निर्णायक ठरणाऱ्या ह्या घटकांची दखल घेतली जात नाही.

आर्थिक वृद्धीचे वंचिताच्या उपजीविकांवरील दुष्परिणाम

समाजाच्या वरच्या वर्गामध्ये ही आर्थिक वृद्धी करण्याकरता मोठे उद्योगधंदे व रासायनिक शेतीचा प्रसार केला जातो. त्याचे मात्र विविध सामाजिक व पर्यावरणीय दुष्परिणाम घडून येतात. यामध्ये धरणामुळे होणारे विस्थापन, प्रदूषणामुळे स्थानिकांच्या आरोग्यावर होणारे परिणाम, जल–जमिनीच्या प्रदूषणामुळे होणारी उपजीविका हानी, उच्च तंत्रज्ञानामुळे होणारी रोजगार हानी ह्या साऱ्या दुष्परिणामांचा समावेश होतो. या सामाजिक व पर्यावरणीय दुष्परिणामांचा फटका मुख्यतः वंचित घटकांच्या उपजीविकेला बसतो व जो त्यांच्या क्षीण उपजीविकांच्या दृष्टीने बव्हंशी अतीव विध्वंसक ठरतो हे आता सर्वमान्य झाले आहे.

रूढ विकासनीतीच्या अपयशाची मीमांसा

सारांशाने, बृहत् स्तरावर किंवा खरेतर समाजातील बलिष्ठ वर्गांमध्ये आर्थिक वृद्धी/संपत्ती निर्मिती झाली तरी त्याचा झिरपा तळातील वंचित गटांपर्यंत होत नाही. मात्र वरच्या वर्गातील आर्थिक वृद्धीचा जोरदार फटका वंचित गटाच्या उपजीविकांना बसतो. त्यातूनच टिपणाच्या सुरवातीस नमूद केलेले विकासनीतीचे व दारिद्र्यनिर्मूलनाच्या रूढ कार्यक्रमांचे दारुण अपयश आकाराला येते. रूढ विकासमार्गावर विश्वास ठेवणारी मंडळी तसेच त्यापेक्षा वेगळा विचार करणारी विविध गटातील पर्यायवादी मंडळी या अपयशाचे विश्लेषण कसे करतात व त्यावर कोणती उपाययोजना सुचवतात ते पाहूया.

**विकासनीतीच्या अपयशावरील रूढ उपाययोजनांच्या उणिवा**

'अन्न–उत्पन्न–रोजगार' केंद्री रूढ दृष्टिकोन मानणाऱ्या व्यक्ती/संस्थांच्या विश्लेषणानुसार रूढ दृष्टिकोनाच्या संकल्पनात्मक गाभ्यात काही दोष नाहीत. म्हणजे मुळात विकासाच्या मार्गाचा दोन टप्पी आडवळणीपणा, त्यातील परावलंबित्व, त्यातील राजकीय अर्थशास्त्र व या साऱ्यामुळे वंचितांपर्यंत विकास पोचण्यात येणाऱ्या अडचणी याचा विचार रूढ विकासनीतीमध्ये केला जात नाही. तसेच दारिद्र्यनिर्मूलन कार्यक्रमांच्या मुळाशी असणाऱ्या दोन उद्देशांचे (म्हणजे दुर्बलांना दयाभावी मदत व वंचितांना आर्थिक वृद्धीच्या प्रक्रियेत म्हणजे मुख्य प्रवाहात सामील करून घेण्यासाठी त्यांचे क्षमतावर्धन) अपुरेपणही लक्षात घेतले जात नाही. त्याऐवजी रूढ विकासनीतीच्या तसेच दारिद्र्य–निर्मूलनाच्या कार्यक्रमांच्या अपयशांचे मूळ मुख्यत: पुढील दोन कारणांमध्ये शोधले जाते : (अ) बृहत् स्तरावरील आर्थिक वाढीचा अपुरा वेग आणि, (ब) झिरपा प्रक्रियेसाठी आवश्यक उपायांच्या आखणीतील आणि अंमलबजावणीतील दोष. ह्यामधील पहिल्या कारणाचे निराकरण करण्यासाठी रूढ उपाययोजना नेहमीच बृहत् स्तरावरील आर्थिक वाढीचा केवळ वेग वाढवण्यावर (त्याचे दुष्परिणाम कमी करून त्याचा दर्जा वाढवण्यावर नव्हे) भर देते. त्या वेगाच्या वाढीसाठी मोठ्या उद्योगांची व आधुनिक शेतीची वाढ हा एकच मार्ग आहे, हे गृहीतक कायम ठेवले जाते.

बृहत् वृद्धीच्या अपयशावर अधिक वृद्धीचा उपाय

गेल्या दशकापासून आर्थिक वाढीचा वेग वाढविण्यासाठी राष्ट्रीय अर्थव्यवस्थेच्या उदारीकरण, जागतिकीकरण, आणि खाजगीकरण (संक्षेपाने 'उजाखा') करण्याच्या धोरणांवर भर देण्यात आला. त्या धोरणांतर्गत मोठा उद्योग व आधुनिक शेतीवरील आर्थिक, सामाजिक, पर्यावरणीय

बाबतीतील अनेक बंधने शिथिल केली गेली. परिणामी, ह्या उपक्रमांच्या आर्थिक, सामाजिक, पर्यावरणीय दुष्परिणामांमध्ये आणखी वाढ झाली. ह्या दुष्परिणामांमुळे ह्या धोरणांचा फार मोठा फटका वंचित वर्गाला बसतो आहे. वेगवान आर्थिक वाढीतील अडथळे दूर करण्याच्या उद्दिष्टाने प्रेरित झालेल्या 'उजाखा' धोरणांमुळे वंचित घटकांच्या उपजीविका नजिकच्या काळात उद्‌ध्वस्त होण्याचा धोका अनेक ठिकाणी स्पष्टपणे दिसत आहे. 'उजाखा' सुधारणांच्या सुरुवातीच्या काळामध्ये ज्याला केवळ 'संक्रमणकालीन' म्हणजे तात्पुरती आर्थिक मंदी म्हटले जाते त्या मंदीमुळे रोजगार मोठ्या प्रमाणात कमी झाले. त्याचवेळी 'उजाखा' धोरणांमुळे वंचितांना राज्यसंस्थेकडून दिल्या जाणाऱ्या विविध प्रकारच्या मदतीमध्ये व सहाय्यामध्ये जाणवण्याइतपत व वेगाने घट झाली. 'उजाखा' धोरणाचा मुख्य आघात वंचित घटकांच्या उपजीविकांशी निगडीत कार्यक्रमावरील सरकारचा खर्च आणि गुंतवणूक यांवर होतो आहे. या विविध कारणांमुळे 'उजाखा' धोरणाच्या सुरवातीच्या काळात वंचित वर्गांना असा फटका बसणे अनिवार्य आहे असे रूढ विकासवादाच्या समर्थकांकडून मान्य केले जाते. वंचितांना असा फटका न बसता बृहत् आर्थिक वृद्धीचा वेग वाढवा (मानवी चेहऱ्याच्या आर्थिक सुधारणा) असेही म्हटले जाते. पण 'उजाखा' धोरणाच्या समर्थकांकडून त्यासाठी प्रत्यक्षात फारशी उपाययोजना होताना दिसत नाही. अशा प्रकारे दारिद्र्यनिर्मूलनाच्या कामातील रूढ विकासनीतीच्या अपयशाच्या रूढ दृष्टिकोनातून केल्या गेलेल्या विश्लेषणाच्या आधारे केलेल्या उपाययोजनेमुळे परिस्थिती आणखीनच बिघडते.

रूढ वेगवान वाढीसाठीच्या आर्थिक धोरणांचे दुष्परिणाम

रूढ विश्लेषणाने दाखवलेल्या दारिद्र्यनिर्मूलनातील अपयशाच्या (वर उल्लेखिलेल्या) दुसऱ्या कारणाकडे म्हणजे झिरप्याच्या उपायांच्या आखणी व अंमलबजावणीतील दोषांकडे आता वळूया. रूढ विश्लेषणानुसार विकास आणि दारिद्र्य–निर्मूलनाच्या कार्यक्रमांची अंमलबजावणी करणाऱ्या सरकारच्या यंत्रणेमध्ये अनेक भ्रष्ट व विकृत वृत्ती बळावल्या आहेत हे मान्य केले जाते. मात्र त्यामागील 'राजकीय अर्थशास्त्र' लक्षात न घेता त्याच्या निराकरणासाठी प्रशासनिक सुधारणांसारखे निरुपयोगी उपाय सुचवले जातात. काही परिस्थितीमध्ये (बिहारसारख्या) प्रशासनिक स्तरावरच्या उपायांचा पोकळपणा अत्यंत स्पष्ट असतो. त्यावेळी सर्वच सरकारी उपक्रमांचे खाजगीकरण करावे असे सुचवले जाते. सामाजिक किंवा पायाभूत सुविधा पुरवणाऱ्या, दारिद्र्य निर्मूलनासारख्या योजना राबवणाऱ्या एवढेच नव्हे तर तुरुंगासारख्या सामाजिकदृष्ट्या संवेदनशील उपक्रमांचा देखील समावेश खाजगीकरणाच्या यादीत केला जातो. अशाप्रकारे केवळ आर्थिक वृद्धीचा वेग वाढवण्यासाठीच नव्हे तर झिरपा प्रक्रिया अधिक परिणामकारक करण्यासाठी देखील 'उजाखा' धोरणाची शिफारस रूढ विकासनीतीच्या बहुसंख्य समर्थकाकडून केली जाते. ह्या शिफारसी करताना रूढ उपाययोजना मांडणारी मंडळी या समस्येच्या मागील कळीच्या मुद्द्याची म्हणजे त्यामागच्या 'राजकीय अर्थशास्त्रा'ची दखल मात्र घेत नाहीत. बलिष्ठ गटांनी सरकारच्या कारभाराचा ताबा घेतल्यामुळे लोकनियंत्रणाचा अभाव निर्माण होतो व त्यामुळेच सरकारी यंत्रणेमध्ये भ्रष्ट व विकृती वृत्ती बळावतात हे लक्षात घेतले जात नाही. लोकांना कारभारात पुरेसा सहभाग घेता आला व कारभारात पारदर्शकता व उत्तरदायित्व आणले तरच लोकांना सरकारी कारभारावरील त्यांची पकड घट्ट करता येईल. मात्र हे घडून येण्यासाठी आवश्यक ते मूलगामी उपाय करून सत्तासमतोल बदलण्याची बलिष्ठ वर्गातील कोणाचीच तयारी नसते.

झिरपा प्रक्रिया सुधारण्यासाठी सुचवलेल्या रूढ उपायातील त्रुटी

परिणामी, यापुढे एका बाजूला कारभारावर कडक जन–नियंत्रण ठेवण्याच्या गरजेकडे सातत्याने केलेल्या दुर्लक्षामुळे विकास तसेच दारिद्र्यनिर्मूलनासाठीच्या कार्यक्रमांच्या आखणी व अंमलबजावणीतील भ्रष्टता आणि विकृती वाढत जातील. विकास–कार्यक्रम राबवणाऱ्या संस्थांची मालकी कोणाकडेही असली तरी (खाजगी, सार्वजनिक, सहकारी) त्या संस्थांना हे विधान लागू पडेल. दुसऱ्या बाजूला, 'उजाखा'ची धोरणे वंचित घटकांच्या उपजीविकेच्या सुरक्षिततेला हानी पोहचवण्याऱ्या नवीन प्रक्रियांना जन्म देतील (किंवा अशा तऱ्हेच्या जुन्या प्रक्रियांना बळकटी आणतील). परिणामकारक आणि कडक नियंत्रणाअभावी या हानिकारक प्रक्रिया आणखीनच तीव्र होत जातील. अशा प्रकारची एक अत्यंत चिंताजनक (आणि वाढत्या प्रमाणाची) प्रक्रिया म्हणजे शहरी–औद्योगिक व्यवस्थेतील हितसंबंधी गटांनी ग्रामीण भागातील स्थानिक नैसर्गिक संसाधने (ज्यावर वंचित घटकांच्या उपजीविका मोठ्या प्रमाणावर अवलंबून असतात) अतिक्रमित करण्याची आणि बळकावण्याची प्रक्रिया होय. या सर्वांचा विचार करता असे म्हणता येईल की रूढ विकासनीतीच्या अपयशावर रूढ विकासनीतीच्या समर्थकांकडून सुचवली जाणारी 'उजाखा' धोरणाची उपाययोजना वंचित घटकांना उपजीविकेची सुरक्षितता देण्याचे आव्हान पेलण्याच्या दृष्टीने उपयुक्त नाही.

रूढ दृष्टिकोनातील उपाययोजनेचे अपयश

## पर्यायवादी दृष्टीतून रूढ प्रतिमानाचे अपशय व त्यावरील उपाययोजना

पर्यायवादी दृष्टीतून काम करणाऱ्या अनेक व्यक्ती आणि संस्थांनी रूढ विकासनीतीच्या विश्लेषणाला आणि उपाययोजनांना छेद देणारे विश्लेषण आणि उपायांची मांडणी केली आहे. या पर्यायवाद्यांमध्ये प्रामुख्याने विविध प्रकारच्या स्वयंसेवी संस्था, पक्षांशी संलग्न नसणाऱ्या राजकीय संघटना, आणि अभ्यासकांचे काही गट यांचा समावेश होतो. या पर्यायवाद्यांनी रूढ विकास–प्रतिमानावर घेतलेले आक्षेप व रूढ प्रतिमानाच्या अपयशावर सुचवलेल्या उपाययोजना यांत बरेच वैविध्य आहे. या पर्यायी उपाययोजनांवर आधारित अनेक प्रकारचे उपक्रम आणि प्रयोगांची उभारणी पर्यायवादी करत आलेले आहेत. जरी यातील बरेच प्रयोग लहान आणि विलग स्वरूपाचे राहिले असले तरी अनेक यशस्वी प्रयोगांमधील संकल्पना, तंत्रे, वा कार्यक्रम यांना सरकारच्या छोट्या–मोठ्या योजनांमध्ये समाविष्ट करून घेण्यात आले आहे. परन्तु बऱ्याचदा अशाप्रकारे सरकारीकरण झाल्यानंतर पर्यायी संकल्पना व तंत्रे यांचा वापर करणाऱ्या सरकारी कार्यक्रमांमध्ये अनेक विसंगती वा विकृती निर्माण झालेल्या दिसतात. त्यामुळे अशा प्रयोगांवर आधारित सरकारी योजनांचा उपयोग वंचित घटकांच्या उपजीविका सुरक्षिततेसाठी झालेला नाही.

पर्याय संकल्पनांवर आधारित सरकारी योजनांच्या मर्यादा

वेगवेगळ्या पर्यायवाद्यांनी केलेली विश्लेषणे व सुचवलेल्या उपाययोजना यांचा विचार करता त्यामध्ये प्रामुख्याने तीन प्रवाह दिसून येतात. पर्यायवाद्यांच्या वेगवेगळ्या गटांच्या विश्लेषणानुसार वंचित घटकांची उपजीविका धोक्यात येण्यामागे तीन वेगवेगळी कारणे असतात. (अ) स्थानिक नैसर्गिक संसाधनांवरील हक्कांचा (आणि ती वापरण्याच्या संधींचा) अभाव. (ब) स्थानिक नैसर्गिक संसाधनांची घटती उत्पादकता आणि (क) वंचित घटकांमधील संघटनात्मक ताकदीचा आणि इतर क्षमतांचा अभाव. या तीन कारणांवर उपाय म्हणून या तीन प्रवाहांतील पर्यायवादी पुढील तीनपैकी अनुक्रमे एकेका गोष्टीवर लक्ष केन्द्रीत करतात : (अ) वंचित समूहांचा स्थानिक नैसर्गिक संसाधनांवर हक्क प्रस्थापित करण्यासाठी राज्यसंस्था (द स्टेट) आणि संसाधनांची मालकी/

ताबा असणाऱ्या समाजगटांविरुद्ध राजकीय संघर्ष व लढा. (ब) स्थानिक लोकांच्या सहभागाने स्थानिक संसाधनांचे व्यवस्थापन व विकास याकरता रचनात्मक उपक्रम, आणि (क) वंचित घटकांची संघटन–बांधणी आणि त्यांच्या विविध क्षमता वाढविण्याचे प्रयत्न (जाणीव–जागृती, प्रशिक्षण, आणि संस्था–बांधणी यांसारख्या कामांतून). पर्यायवाद्यांचे काही गट या तीनपैकी एकापेक्षा अधिक बाबींवरही काम करतात हे नमूद करायला हवे. पर्यायवाद्यांनी दारिद्र्य–निर्मूलनासाठी वा पर्यायी विकासासाठी केलेल्या प्रयत्नातील या तीन प्रवाहांची यापुढच्या भागात थोडक्यात चर्चा केली आहे.

पर्यायवाद्यांचे विश्लेषण व उपाययोजना : तीन प्रवाह

## संसाधनांवरील हक्कांसाठी राजकीय लढा

स्वातंत्र्य मिळाले तेव्हा भारतातील स्थानिक नैसर्गिक संसाधनांवर (जमीन, पाणी, जंगल यांसारख्या) वंचितांच्या हक्काचे प्रमाण अत्यंत मर्यादित होते. खाजगी मालकीची संसाधने प्रामुख्याने सामाजिक, आर्थिक आणि राजकीय अभिजनवर्गाच्या ताब्यात होती. त्याआधी वासाहतिक राज्यकर्त्यांनी परंपरेप्रमाणे सामुदायिक मालकीच्या असणाऱ्या संसाधनांवर (उदा. जंगल आणि सामुदायिक मालकीची जमीन) कब्जा मिळवला. त्या संसाधनांचा अतोनात वापर केला, त्यांच्या संवर्धनाकडे दुर्लक्ष केले, व कर मिळवण्यासाठी अभिजनवर्गाला त्याची खाजगी मालकी दिली. परिणामी, संसाधनांचा दर्जा खालावला, त्यांपैकी काही उद्ध्वस्त झाली. स्वातंत्र्य देताना वासाहातिक राज्यकर्त्यांनी त्यांच्या ताब्यातील संसाधने देशी अभिजन वर्गाचे प्राबल्य असणाऱ्या राज्यसंस्थेच्या ताब्यात दिली. त्यानंतर जमिनीचे व इतर संसाधनांच्या हक्कांचे हस्तांतरण वंचितांना करण्याचे सरकारी आणि संस्था/संघटनांच्या पातळीवर अनेक प्रयत्न झाले (उदा. जमीन–सुधारणा कायदा वा भूदान चळवळ). तरीही बहुसंख्य वंचित गट नैसर्गिक संसाधनांवरील (विशेषत: जमिनीच्या) हक्कांपासून वंचित राहिले. परिणामत:, स्वातंत्र्योत्तर काळात राज्यसंस्था आणि समाजातील श्रीमंत/अभिजन वर्गांविरुद्ध वंचितांच्या संघटनांनी जमीन, जंगल आणि पाण्यावरील हक्कांसाठी तृणमूल पातळीवर अनेक राजकीय संघर्ष केले व ते अजूनही चालूच आहेत.

संसाधनांवरील हक्कांचा अभाव व वंचितांचे लढे

विविध पातळ्यांवर काम करणाऱ्या संघटनांच्या नेतृत्त्वाखाली झालेले वंचितांचे जमीन व इतर संसाधनांसाठीचे झालेले लढे काही ठिकाणी आणि काही प्रमाणातच यशस्वी ठरले. परन्तु अशा यशस्वी लढ्यातून वंचितांना जी जमीन मिळाली ती बऱ्याचदा कमी प्रतीची आणि कमी उत्पादकता असलेली होती. तसेच मिळालेली जमीन विकसित करण्यासाठी आवश्यक ती साधने आणि क्षमता वंचितांकडे नसल्यामुळे ती जमीन कसणे व त्यातून पुरेसे उत्पादन मिळवणे कठीण होते. परिणामत: अनेक ठिकाणचा अनुभव असा आहे की दीर्घ आणि चिकाटीच्या संघर्षातून मिळालेली जमीन वंचितांना उपजीविकेची सुरक्षितता मिळवून देण्यास फारशी साहाय्यभूत ठरली नाही.

उपजीविका सुरक्षिततेचा अभाव कायम

या सर्व मर्यादा मान्य करूनही वंचितांना नैसर्गिक संसाधनावर हक्क मिळवून देणारे लढे अत्यंत महत्त्वाचे आहेत आणि ते अधिक बळकट करण्याची गरज आहे. याचे कारण म्हणजे संसाधनांवर केवळ हक्क मिळवल्यामुळे उपजीविकेच्या सुरक्षिततेची हमी जरी मिळत नसली तरी प्राप्त परिस्थितीत अशा प्रकारच्या हक्कांशिवाय उपजीविकेच्या सुरक्षिततेकडे जाण्याची प्रक्रिया सुरू होण्याची शक्यताही वंचितांबाबतीत संभवत नाही. संसाधनांवरील राजकीय संघर्षाचा आणखी एक महत्त्वाचा परिणाम म्हणजे नैसर्गिक संसाधनांच्या विकासासाठीच्या अनेक योजना व कार्यक्रम

यांचे मोठ्या प्रमाणावर झालेले विकेंद्रीकरण. सरकार आणि इतर रूढ संस्थांकडून राबवल्या जाणाऱ्या नैसर्गिक संसाधनांच्या सामुदायिक व्यवस्थापनाच्या कार्यक्रमाचा वाढता विस्तार आणि वाढते महत्त्व यामध्ये या गोष्टीची प्रचिती येते.

संसाधनांवरील हक्कांचे महत्त्व

## संसाधनांचे सामुदायिक व्यवस्थापन आणि उत्पादकता–वाढ

काही पर्यायवाद्यांच्या मते अविकसित अवस्थेतील स्थानिक नैसर्गिक संसाधने (किंवा संसाधनांची कमी अथवा घटती उत्पादकता) हा विकासातील व गरिबी निर्मूलनामधील मोठा अडथळा आहे. त्यामुळे पर्यायवाद्यांतील काही गट या मुद्द्यावर काम करीत आहेत. या मंडळींच्या मांडणीनुसार नैसर्गिक संसाधने किंवा त्यांची उत्पादकता अविकसित (किंवा कमी) राहण्यामागे दोन महत्त्वाची कारणे आहेत. पहिले म्हणजे स्थानिक नैसर्गिक संसाधनांचा (मुख्यत्वे जमीन) घटता दर्जा. दुसरे म्हणजे सिंचनाकरता पाण्याची कमतरता, जी शेती–बागायतीच्या उत्पादकतेवरील एक मुख्य मर्यादा मानली गेली आहे.

संसाधनांची घटती उत्पादकता : कारणे

या दुसऱ्या कारणामागील रूढ गृहीतक असे आहे की जर पाण्याबरोबर इतर बाह्य व आधुनिक निविष्टी (उदा. खते, कीटकनाशके, आणि यांत्रिकीकरण) वापरल्या तर शेतीबागायतीची उत्पादकता वाढून ग्रामीण अर्थव्यवस्था सुधारेल व वंचितांच्या उपजीविकेचा प्रश्न सुटेल. परन्तु या गृहीतकामधील अनेक त्रुटी काही पर्यायवादी मंडळी दाखवून देतात. हे पर्यायवादी या कारणामुळे पाण्याच्या कमी वापरावर भर देऊन स्थानिक नैसर्गिक संसाधनांचा विशेषतः जमिनीचा दर्जा सुधारण्यासाठी काम करतात. त्यासाठी कुठल्याही प्रकारच्या बाह्य्य वा आधुनिक निविष्टी न वापरता स्थानिक नैसर्गिक संसाधनांचा वापर करण्यावर ते भर देतात. अशाप्रकारे पर्यायवाद्यांनी भारतातील स्थानिक नैसर्गिक संसाधनांचा विकास करण्याच्या उद्देशाने चालवलेल्या उपक्रमांमागे दोन प्रमुख उद्दिष्टे आढळतात: (अ) स्थानिक पाणी स्रोतांचा विकास करणे आणि, (ब) स्थानिक मातीच्या प्राथमिक उत्पादकतेत वाढ करणे.

पर्यायवाद्यांच्या उत्पादकतावाढीच्या उपक्रमांमागील उद्दिष्टे

(प्राथमिक उत्पादकता म्हणजे सर्व प्रकारच्या बाह्य निविष्टी काढून घेतल्यावर स्थानिक नैसर्गिक परिसंस्था जी उत्पादकता साध्य करू शकते ती होय. रासायनिक खते, औषधे, सिंचनाचे पाणी ह्या बाह्य निविष्टी मोठ्या प्रमाणावर पुरवून जेव्हा शेती केली जाते त्यावेळी दुय्यम अथवा द्वितीयक उत्पादकता वाढते. आपल्याला जी अधिक उत्पादकता आणि उत्पादन दिसते ते बाह्य निविष्टींच्या आधाराने दुय्यम उत्पादकता वाढवून मिळालेले असते. ह्या बाह्यनिविष्टी काढून घेतल्यावर उत्पादकता लगेचच घटते. अशा प्रकारे ह्या बाह्य निविष्टींमुळे प्राथमिक उत्पादकता वाढत नाही. अनेकदा ह्या बाह्य निविष्टीमुळे प्राथमिक उत्पादकतेचा ऱ्हासच होताना दिसतो. प्राथमिक उत्पादकता ही त्यातून मिळणाऱ्या जैवमाल उत्पादनाच्या प्रमाणावरून मोजली जाते.)

प्राथमिक उत्पादकता

जे पर्यायवादी पाणी या संसाधनाच्या विकासावर काम करीत होते त्यांनी प्रामुख्याने पाणीस्रोत विकासाच्या प्रस्थापित/रूढ उपक्रमांतील अपुरेपणा, अविवेकी धोरण, असमानता, आणि पर्यावरणीय अशाश्वतता या मुद्द्यांकडे लक्ष वेधले. नोकरशाही आणि तज्ज्ञ मंडळींच्या आधिपत्याखाली आखल्या व चालवल्या जाणाऱ्या ह्या रूढ उपक्रमांचा भर प्रामुख्याने बृहत्–स्तरावरील पाणीनियोजन, मोठ्या धरणांचा पाठपुरावा, आणि पाण्याचे एका खोऱ्यातून दुसऱ्या खोऱ्यात वहन यावर असतो. रूढ उपक्रमातील चुका, अपयशे, आणि त्यांच्या हानिकारक परिणामांपासून धडा घेऊन पर्यायवादी उपक्रमांनी स्थानिक समुदायांच्या सहभागाने पाणी व्यवस्थापन व मुख्यत: स्थानिक पाण्याचे स्त्रोत विकसित करण्यावर लक्ष केन्द्रित केले. याचे

उत्तम उदाहरण म्हणजे १९८० च्या दशकात स्वयंसेवी क्षेत्राने हाती घेतलेले व्यापक पाणलोट क्षेत्र विकासाचे कार्यक्रम. एका बाजूने या पर्यायी उपक्रमांचे यश आणि कार्यक्षमता आणि दुसऱ्या बाजूने रूढ चौकटीतील कार्यक्रमाच्या अपयशामुळे त्यांना होणारा वाढत्या प्रमाणातील विरोध यामुळे सरकारी आणि इतर रूढ संस्थांनी हळूहळू पाणलोट क्षेत्र विकासाची संकल्पना व तंत्रे आपल्या कार्यक्रमात समाविष्ट करून घेतली. आता सरकारी पाणीस्रोत विकासाचे कार्यक्रम पाणलोट क्षेत्रविकासाच्या तंत्रावर भर देऊन व स्थानिक समुदाय आणि स्वयंसेवी संस्थांना सहभागी करून राबविले जातात. अशीच काहीशी परिस्थिती 'संयुक्त जंगल व्यवस्थापना' सारख्या इतर सामुदायिक व्यवस्थापन कार्यक्रमांची आहे. यापूर्वी म्हटल्याप्रमाणे वंचित लोक आणि त्यांच्या संघटनांनी दिलेल्या संसाधनांवरील हक्कांसाठीच्या लढ्यांमुळे जी राजकीय जागृती आणि दबाव निर्माण झाला त्यामुळे सरकारला आपल्या कार्यक्रमात जनसहभागी तत्त्वानुसारच्या सामुदायिक व्यवस्थापनाचा समावेश करावा लागला.

सरकारी कार्यक्रमात पर्यायी संकल्पनांचा समावेश

पाणीस्रोताचा विकास करण्याच्या बऱ्याच पर्यायवादी प्रयत्नांमध्ये गरीब, लहान, कोरडवाहू शेतकऱ्याला किमान व पीक सुरक्षित करणारे सिंचन मिळून त्याचा विकास व्हावा ही मूळ प्रेरणा होती. या प्रयत्नांच्या उद्गात्यांपैकी बऱ्याच जणांनी ग्रामीण समाजातील भूमिहीन घटकांना ह्या योजनांचे फायदे मिळाले पाहिजेत असा आग्रह धरला होता. परन्तु गेल्या दशकातील पाणी व जंगल यांसारख्या नैसर्गिक संसाधनांच्या सामुदायिक व्यवस्थापनाच्या सरकारी कार्यक्रमांच्या समीक्षेतून हे स्पष्टपणे दिसून येते की, स्त्रिया, आदिवासी, भटके, आणि दलित यांसारख्या वंचित घटकांना या कार्यक्रमांचा फारसा फायदा झालेला नाही. अशा प्रकारच्या उपक्रमांनंतरही त्यांच्या उपजीविका असुरक्षित, अशाश्वत आणि कमकुवत राहिल्या आहेत. याचे एक कारण म्हणजे बहुसंख्य वंचित घटकांना स्थानिक नैसर्गिक संसाधनांवर हक्क आणि ते वापरण्याची संधी (या संसाधनांचा विकास करण्याआधी आणि विकासानंतर) नसते. आणि त्यामुळे अशाप्रकारच्या सामुदायिक संसाधन विकास कार्यक्रमातून कुठल्याही प्रकारचे उपजीविकेचे प्रत्यक्ष आणि निश्चित असे लाभ मिळवण्याच्या परिस्थितीत ते नसतात. याचे उत्तम उदाहरण म्हणजे सरकारी पाणलोटक्षेत्र विकासाचे कार्यक्रम राबवल्यानंतर त्यातून सर्वात जास्त फायदा गावातील बलिष्ठ गटांना होतो कारण त्यांच्याकडे नदीनाल्याशेजारच्या गाळाच्या सुपीक जमिनी व तयार खोदलेल्या विहिरी असतात. पाणलोट कार्यक्रमानंतर क्षेत्रात साठणारे पाणी नदीनाल्याशेजारच्या विहिरीतून मोठ्या प्रमाणात उपलब्ध होते व त्याचा सर्वात जास्त फायदा ह्याच मंडळिंना होतो. याउलट ज्यांच्या जमिनी डोंगरउतारावर आहेत त्यांच्या जमिनीमध्ये पाणलोट क्षेत्र विकासासाठी विविध कामे केली जातात. त्यासाठी त्यांची जमीन वापरली जाते. मात्र त्यांना फारसे पाणी मिळत नाही. गावातील भूमिहीनांना तर ह्या कार्यक्रमांचा त्यांच्या उपजीविका सुरक्षिततेसाठी बव्हंशी काहीच फायदा होत नाही. काहीवेळा त्यांना मिळणाऱ्या मजुरीचे पैसे व दिवस वाढतात. मात्र अनेक वेळा बलिष्ठांच्या जमिनी बारमाही झाल्याने त्या जमिनींना कुंपणे पडतात. चराईबंदी, कुऱ्हाडबंदी येते. त्यामुळे भूमिहीन व वंचित घटकांना पूर्वी मिळणारे चारा, सरपण व पूरक अन्नपदार्थ देखील मिळेनासे होतात.

सामुदायिक व्यवस्थापन कार्यक्रमातील त्रुटींची कारणे : संसाधनावरील हक्कांचा अभाव

संसाधने विकासाच्या कार्यक्रमांचा वंचितांच्या उपजीविकांना फायदा होत नाही याचे दुसरे कारण म्हणजे आपल्या देशात वंचितांचे मोठ्या प्रमाणावर झालेले सीमान्तीकरण किंवा खच्चीकरण. अनेक शतकांच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय, आणि सांस्कृतिक वास्तवामुळे तयार झालेली विकृत सत्ता–समीकरणे नेहमीच वंचितांच्या हितसंबंधांच्या विरोधी काम करतात. पाणलोट क्षेत्रविकासासारख्या संसाधन विकास कार्यक्रमात सामील असणाऱ्या बाह्य घटकांना (बहुतेकदा सरकारी संस्था आणि मोठ्या स्वयंसेवी संघटना) ही सत्तासमीकरणे बदलण्यासाठी द्यावा लागणारा वेळ आणि पत्करावा लागणारा धोका परवडण्यासारखा नसतो. त्यामुळे वंचित लोक अशा कार्यक्रमांच्या कारभारात (गव्हर्नन्स) परिणामकारकरीत्या सहभागी होऊ शकत नाहीत. परिणामी, हे कार्यक्रम करणारे बाह्य घटक वंचितांच्या आकांक्षा, गरजा, आणि अग्रक्रम यांची योग्य ती दखल घेण्यात अपयशी ठरतात. उदाहरणार्थ, संयुक्त वन व्यवस्थापनाच्या कार्यक्रमांमुळे स्थानिक आदिवासीवर होणाऱ्या अन्यायाबाबत अनेकांनी तीव्र टीका केली आहे. परिणामी, जरी संसाधन विकासाचे हे कार्यक्रम भौतिक संसाधने विकसित करण्यात यशस्वी झाले तरी त्यातून स्थानिक वंचित घटकांच्या उपजीविकेच्या सुरक्षिततेमध्ये फारसा फरक पडत नाही.

सामुदायिक व्यवस्थापन कार्यक्रमातील त्रुटींची कारणे : वंचितांचे सीमान्तीकरण

अशाच प्रकारची परिस्थिती स्थानिक मातीची उत्पादन क्षमता शाश्वत रीतीने वाढविण्यासाठी पर्यायवाद्यांतर्फे केल्या जाणाऱ्या प्रयोगांची आणि उपक्रमांची आहे. हे प्रयोग बहुतांशी शहरी विचारवंत व पर्यावरणीय कार्यकर्त्यांनी हाती घेतले आहेत. यातील काही प्रयोग हे शेतीमधल्या महागड्या, पर्यावरणविनाशक, बाह्य निविष्टी कमी करण्याच्या (आर्थिक/पर्यावरणीय) गरजेतून तर काही प्रयोग आदर्शवादी, आध्यात्मिक, वैज्ञानिक, वा तात्त्विक प्रेरणांतून आकारास आलेले असतात. यातील बऱ्याच प्रयोगांमुळे अनेक नवीन रीती आणि तंत्रे याबाबत प्रचंड ज्ञाननिर्मिती झाली आहे. जमीन आणि माती यांची उत्पादकता मोठ्या प्रमाणावर वाढवण्याची तसेच वेगवेगळ्या प्रकारच्या (शेती, फळे व शेतजंगल) पिकांचा दर्जा व उत्पादन सुधारण्याची क्षमता या नव्या रीती व तंत्रांमध्ये आहे. या प्रकारच्या उपक्रमामध्ये प्रामुख्याने कमी बाह्य साधनांची शाश्वत शेती, नैसर्गिक शेती, सेंद्रीय शेती, पर्माकल्चर, आणि दहा गुंठे शेती अशा प्रयोगांचा समावेश होतो. परन्तु यातील बऱ्याच प्रयोग आणि उपक्रमांमध्ये दोन महत्त्वाच्या त्रुटी आहेत आणि त्यामुळे हे प्रयोग वंचितांच्या सुरक्षित उपजीविकेचे उद्दिष्ट गाठण्याच्या कामात भरीव योगदान देऊ शकलेले नाहीत. पहिली त्रुटी म्हणजे या प्रयोगांना प्रस्थापित संस्थांकडून हवे तेवढे आर्थिक, संशोधनात्मक, आणि व्यवस्थापकीय साहाय्य मिळत नाही. त्यामुळे त्यांचा प्रसार वंचित गटांपर्यंत होत नाही. दुसरी आणि सर्वांत महत्त्वाची त्रुटी म्हणजे या प्रयोग आणि उपक्रमांच्या मागील सैद्धांतिक मांडणीमध्ये समतेच्या मूल्यावर भर दिला जातो. मात्र त्याची आखणी व अंमलबजावणी करताना वंचितांच्या भौतिक, सामाजिक–सांस्कृतिक, राजकीय आणि आर्थिक परिस्थितीकडे विशेष लक्ष न दिल्याने वंचितांच्या मर्यादा व क्षमतांशी सुसंगत अशी तंत्रे आणि रीती निर्माण करण्यात या प्रयत्नांना अपयश आले आहे. परिणामी, त्यांच्यामध्ये उत्पादन वाढीची तांत्रिक क्षमता असूनही अशा प्रकारचे उपक्रम वंचितांच्या उपजीविकेच्या सुरक्षिततेच्या प्रश्नी फार मोठे योगदान देऊ शकले नाहीत. मात्र या उपक्रमातून पुढे आलेल्या ज्ञानाचा वापर आवश्यक ती साधने व बळ उपलब्ध असणाऱ्या पर्यावरणीय आणि आरोग्यदृष्ट्या जागृत अशा काही शहरी लोकांनी तसेच अनेक व्यावसायिक फळबागवाल्यांनी यशस्वीरीत्या करुन घेतला आहे.

मातीच्या उत्पादकता–वाढीच्या प्रयोगांमधील त्रुटी

## वंचितांची संघटनबांधणी आणि इतर क्षमता वाढविण्याचे प्रयत्न

भारतातील संसदीय लोकशाहीच्या (तुलनेने) यशस्वी ठरलेल्या प्रयोगानंतरही देशातील वंचित घटकांना सरंजामी आणि वासाहातिक इतिहासाचे परिणाम भोगावे लागत आहेत. स्वातंत्र्यानंतरही चालू राहिलेल्या वंचितांच्या सीमान्तीकरणाची प्रक्रिया चालूच राहिली आहे. याचे मुख्य कारण हे त्यांच्या समस्यांमागील कारणे ओळखण्यात आलेले अपयश नसून त्या कारणांवर मात करण्याकरता पुरेसे व प्रामाणिक प्रयत्न करण्यात आलेले अपयश हे आहे. वेगळ्या शब्दांत सांगायचे तर, वंचितांची परिस्थिती लक्षात घेऊन खऱ्या अर्थाने त्यांचे सक्षमीकरण करणाऱ्या प्रामाणिक धोरणांचा आपल्याकडे अभाव आहे. परिणामी, स्वातंत्र्यानंतरही सातत्याने राजकीय सीमान्तीकरण आणि वंचित गटांमधील फाटाफूट (मुख्यत: जाती व्यवस्थेमुळे) यामुळे वंचित घटक शक्तिहीन आणि सत्ताहीन राहिले आहेत. या सत्ताहीनतेचा मुख्य परिणाम म्हणजे वंचितांमधील विविध क्षमतांचा अभाव. अशाप्रकारे सीमान्तीकरण व क्षीण क्षमता या दोन घटकांच्या दुष्टचक्रामध्ये सापडलेल्या वंचितांना स्वत:च्या विकासामधील अंतर्गत आणि बाह्य अडथळ्यावर मात करणे शक्य होत नाही.

वंचितांच्या सीमान्तीकरणामागील कारणे

अनेक राजकीय स्वरूपाच्या संघटना आणि स्वयंसेवी क्षेत्रातील बरेच पर्यायवादी वंचितांबरोबर त्यांच्या क्षमतांचा विकास करण्यासाठी काम करीत आहेत. गेल्या काही दशकांत या पर्यायवाद्यांनी वंचितांच्या संघटनात्मक, व्यवस्थापकीय, आणि तांत्रिक क्षमता वाढविण्याच्या दृष्टीने लोकसमुदायाच्या पातळीवर वंचितांचे गट आणि संघटनांची बांधणी करण्याकरता विविध प्रयत्न केले. यामुळे गाव वा वाडी पातळीवरील वंचितांचे संघटित गट विविध स्वरूपात (मुख्यत: महिलांचे बचत गट, तरुणांचे गट, आणि लहान शेतकऱ्यांचे गट) उभे राहिले.

वंचितांमधील क्षमतांच्या विकासाचे प्रयत्न

या गाव/वाडी पातळीवरील गटांच्या बांधणीमुळे वैयक्तिक आणि सामुदायिक क्षमता विकसित तर झाल्याच पण त्याबरोबरच वंचिताच्या राजकीय, आर्थिक, आणि सामाजिक सक्षमीकरणासाठी मदत झाली. या गटांमुळे वंचिताना एक सामुदायिक दृष्टी आली आणि अनेक सामाजिक आणि आर्थिक स्वरूपाचे सामुदायिक सहकारी उपक्रम सुरू झाले. ह्या गटबांधणीमुळे वंचितांमध्ये मोठ्या प्रमाणावर एकता आणि समन्वय साधला जाऊन त्यांची इतर समाजगटांच्या तुलनेतील ताकत देखील वाढली. जरी यापैकी काही गट आर्थिक उपक्रम (मेणबत्त्या, उदबत्त्या, खडू, पापड–मसाले तयार करणे यासारखे) चालवीत असले तरी वंचितांच्या सुरक्षित उपजीविकेचे उद्दिष्ट गाठण्यासाठी या गटांचा आणि त्यांच्या क्षमतांचा परिणामकारक वापर झालेला नाही. याचे मुख्य कारण म्हणजे या संस्थांमार्फत वंचितांना करता येतील व त्यांना वाजवी आणि शाश्वत उपजीविका देतील अशा उत्पादक उपक्रमांची माहिती, त्यासाठीचे ज्ञान आज उपलब्ध नाही.

क्षमता–विकास प्रयत्नांमधील त्रुटी

## नव्या व्यूहनीतीच्या दिशेने

या टिपणाची सुरुवात मुख्यप्रवाही संस्थांतर्फे केल्या जाणाऱ्या विकास प्रयत्नांमागे असणाऱ्या रूढ विकास व्यूहनीतीबाबतच्या चर्चेने झाली. ही रूढ विकास व्यूहनीती बृहत् आर्थिक वाढ आणि झिरपा सिद्धांत या दोन घटकांची मिळून बनलेली असते. या विवेचनामध्ये म्हटल्याप्रमाणे या व्यूहनीतीच्या अनेक गंभीर मर्यादा, सैद्धांतिक उणिवा आणि प्रत्यक्षातील अपयशे आता मान्य केली गेली आहेत. विवेचनाच्या त्यानंतरच्या भागात या रूढ व्यूहनीतीच्या समर्थकांकडून

त्या व्यूहनीतीच्या अपयशावर जी उपाययोजना सुचविली जाते त्या उपाय योजनेच्या उपयुक्ततेविषयी चर्चा करण्यात आली. टिपणाच्या त्यानंतरच्या भागात विविध पर्यायवादी घटकांनी दारिद्र्य व विकासाचा प्रश्न सोडवण्यासाठी केलेल्या प्रयत्नांची चर्चा केली. या साऱ्या चर्चेमधून वंचितांच्या उपजीविकेच्या सुरक्षिततेला प्राधान्य देणारी पर्यायी विकास व्यूहनीती आखण्याची तातडीची गरज स्पष्टपणे पुढे येते. अशा प्रकारची विकासाची व्यूहनीती पर्यायवादी विकासप्रयत्नांना महत्त्वाचे मार्गदर्शन पुरवू शकेल. पर्यायी विकासाची अशी व्यूहनीती आखताना रूढ विकासनीतीच्या अपयशांमधून तसेच पर्यायवाद्यांच्या आधीच्या प्रयत्नांतून आपण अनेक धडे घेऊ शकतो.

नव्या विकास व्यूहनीतीची गरज

रूढ विकासनीतीनुसार विकासप्रक्रियेचे दोन टप्पे केले आहेत हे आपण पाहिले. त्यामध्ये समाजाच्या काही भागांमध्ये (घटकांमध्ये) केंद्रित झालेली (आर्थिक वृद्धीसाठी) वस्तू/सेवांच्या उत्पादनामध्ये भरीव वाढ व त्या वाढीचा समाजातील इतर घटकापर्यंतचा झिरपा. या दोन घटकांचा समावेश होतो. ह्या दोन घटकांच्या मर्यादा लक्षात आल्यावर रूढ विकासनीतीअंतर्गत (दयाभावी मदत व खास क्षमतावर्धन ह्या दोन उद्देशांनी) दारिद्र्यनिर्मूलनासाठी कार्यक्रम आखले जातात. तेव्हा रूढ विकासनीती थोडक्यात पुढील समीकरणातून दाखवता येईल.

रूढ विकासनीतीचे समीकरण

रूढ विकास(व्यूह)नीती = काही घटकांमध्ये आर्थिक वाढ + इतर घटकांपर्यंत झिरपा + झिरप्यातून बाजूला पडलेल्या मागास घटकांसाठी दारिद्र्यनिर्मूलनाचे कार्यक्रम

टिपणाच्या पहिल्या भागामध्ये पर्यायी विकासाच्या संकल्पनेची चर्चा करताना अशा विकासप्रक्रियेची उद्दिष्टे काय असावीत याचे विवेचन केले आहे. त्यानुसार पर्यायी विकासाचे प्राथमिक व प्राधान्याचे उद्दिष्ट वंचितांची उपजीविका सुरक्षितता हे असावे. मात्र ते पर्यायी विकासाचे अंतिम उद्दिष्ट असू नये असे म्हटले होते. तर समतापूर्ण, संपन्न, वैविध्यपूर्ण जीविका सर्वांना मिळावी व तीही पर्यावरणीयदृष्ट्या शाश्वत मार्गांनी मिळावी हे पर्यायी विकासप्रक्रियेचे अंतिम उद्दिष्ट असावे असेही मांडले होते. या दोन उद्दिष्टांचा विचार करता पर्यायी विकासनीतीचेही दोन टप्पे मांडता येतील. पहिल्या टप्प्यामध्ये किमान उपजीविकेची सुरक्षितता सर्वांना म्हणजे वंचितांना मिळावी (इतरांना ती मिळाली आहे असे गृहीत धरता येईल) यासाठीची व्यूहनीती आखावी लागेल. याला उपजीविका सुरक्षितता केंद्री व्यूहनीतीचा पहिला टप्पा असे म्हणता येईल. एकदा हे प्राधान्याचे उद्दिष्ट साध्य होऊ लागले की दुसऱ्या टप्प्याच्या उद्दिष्टाकडे जाता येईल. दुसऱ्या टप्प्यामध्ये वर म्हटल्याप्रमाणे समतापूर्ण, संपन्न, शाश्वत–मार्गी जीविका सर्वांनाच मिळावी यासाठीची व्यूहनीती आखावी लागेल. त्याला थोडक्यात सन्मानपूर्ण जीविकाकेंद्री व्यूहनीती असे म्हणता येईल. ही दोन टप्प्यांची पर्यायी विकासाची व्यूहनीती पुढील समीकरणाच्या माध्यमातून सारांशाने मांडता येईल.

पर्यायी विकास व्यूहनीतीचे दोन टप्पे

पर्यायी विकास व्यूहनीती = पहिल्या टप्प्यातील (वंचितासाठी) उपजीविका सुरक्षितता केंद्रीत व्यूहनीती + दुसऱ्या टप्प्यातील (सर्वासाठी) सन्मानपूर्ण जीविकाकेंद्री व्यूहनीती

पर्यायी विकासव्यूहनीती ही अशाप्रकारे जरी दोन टप्प्यांची असली तरी त्यामध्ये व रूढ विकासव्यूहनीतीमध्ये अनेक महत्त्वाचे फरक आहेत हे स्पष्टपणे दिसते. त्यामधील सर्वात

महत्त्वाचा फरक म्हणजे रूढ विकास व्यूहनीतीच्या टप्प्यांमध्ये वंचितांना तिसऱ्या व पूरक टप्प्यांमध्ये स्थान मिळते तर पर्यायी विकास व्यूहनीतीमध्ये वंचितांना पहिल्याच टप्प्यात प्राधान्याचे स्थान मिळते.

पर्यायी विकास व्यूहनीतीचे वेगळेपण

वरील समीकरणामध्ये दाखवलेल्या पर्यायी विकासाच्या व्यूहनीतीच्या केवळ पहिल्या टप्प्यातील व्यूहनीतीबद्दल म्हणजे वंचितांसाठीच्या उपजीविका सुरक्षितता–केंद्री व्यूहनीतीची चर्चा ह्या टिपणामध्ये करण्यात आली आहे. त्यास वंचितासाठी किंवा पर्यायी उपजीविकानीती असे मुद्दाम म्हटले आहे. दुसऱ्या टप्प्यातील सन्मानपूर्ण जीविका सर्वांना देण्यासाठीच्या व्यूहनीतीचा विचार वेगळा करावा लागेल. अर्थात दोन्ही टप्प्यांमध्ये अनेक गोष्टी समान असू शकतील.

पर्यायी उपजीविकानीतीचा वेगळा विचार

## वंचितांच्या संदर्भात हक्क, क्षमता आणि उत्पादकता यांचा एकत्र विचार करणारी व्यूहनीती

रूढ विकासनीतीच्या अपयशामधील वंचितांच्या दृष्टीने महत्त्वाची उणीव म्हणजे त्यातील आडवळणी, परावलंबी, व दोन टप्प्यांची विकास प्रक्रिया व त्या प्रक्रियेमध्ये वरिष्ठ समाजगटांच्या नियंत्रणाखालील आर्थिक उपक्रमांवरील वंचितांचे अवलंबित्व. अशा आडवळणी मार्गाऐवजी ज्यांचा 'विकास' करावयाचा त्या वंचिताच्या आर्थिक उपक्रमांवर विकासप्रयत्न केंद्रित करावेत हा या बाबतीतला पहिला धडा ठरेल. रूढ विकासनीतीच्या अपयशामागील दुसरे कारण म्हणजे त्यामध्ये उत्पन्न व रोजगारावर दिला जाणारा भर व वंचितांच्या उपजीविकेच्या वास्तवाकडे केले जाणारे दुर्लक्ष. हा मुद्दा लक्षात घेता विकास प्रयत्नांची सुरुवात वंचितांच्या सध्याच्या उपजीविकेच्या पद्धतीपासून करावी हा या बाबतीतला दुसरा धडा ठरेल. अशा प्रकारे वंचितांच्या सध्याच्या उपजीविका पद्धती व उपक्रमांशी विकासप्रयत्न जोडून घेतल्यास ते जास्त वास्तवपूर्ण, वंचितांच्या जीवनाशी नाळ जोडू शकणारे व म्हणूनच जास्त उपयुक्त व परिणामकारक ठरतील. वंचित गटांच्या सध्याच्या उपजीविकेपासून विकासप्रयत्नांची सुरुवात करताना त्या पद्धतीच्या प्रमुख घटकांवर काम करावे लागेल. वंचितांच्या उपजीविका पद्धतीमधील प्रमुख घटक असणाऱ्या वंचिताच्या क्षमता, साधनसामग्रीची उपलब्धता, व उपक्रमांची उत्पादकता या तीनही गोष्टी सुधारणे हा उपजीविकाकेंद्री विकासप्रयत्नांचा मुख्य भाग असायला हवा. तेव्हा रूढ विकासनीतीच्या अपयशातून असे लक्षात येते की वंचितांना उपयुक्त ठरणाऱ्या साधनसामग्रीची (यात मुख्यत: संसाधनांचा समावेश असेल) उपलब्धता वाढवणे, उपजीविकेसाठी उपयुक्त ठरणाऱ्या त्यांच्या क्षमतांचा विकास करणे व त्यांच्या उपजीविकेच्या सध्याच्या उपक्रमांची वृद्धी/सुधारणा करणे या तीन प्रकारच्या उपायांवर उपजीविकाकेंद्री विकासनीतीचा भर असायला हवा.

उपजीविकाकेंद्री विकासनीती : मुख्य घटक

आधीच्या विवेचनामध्ये आपण पाहिले की पर्यायवाद्यांमधील तीन भिन्न प्रवाहांनी वंचितांच्या सुरक्षित उपजीविकेच्या अभावामागील पुढील तीन भिन्न घटकांवर उपाययोजना करण्यामध्ये लक्षणीय यश मिळवले. (अ) उपजीविकेच्या उपक्रमांकरता आवश्यक संसाधनांवरील (मुख्यत: नैसर्गिक) हक्कांचा अभाव. (ब) नैसर्गिक संसाधनांची अत्यंत कमी उत्पादकता आणि त्यामुळे या संसाधनांवर आधारित उपजीविकेच्या उपक्रमांतून मिळणाऱ्या उत्पादनावरील मर्यादा (क) वंचितांना भेडसावणाऱ्या वेगवेगळ्या अंतर्गत आणि बाह्य समस्यांवर मात करण्यासाठी लागणाऱ्या संघटन क्षमता व इतर क्षमतांचा वंचितांमधील अभाव.

पर्यायवाद्यांची उपाययोजना

पर्यायवाद्यांच्या या तीनही प्रवाहांनी आपापल्या उद्दिष्टांच्या पूर्तीसाठी प्रयत्न करताना भरीव कामगिरीची नोंद केली. परन्तु वंचित घटकांच्या सुरक्षित उपजीविकेचे उद्दिष्ट गाठण्याच्या प्रयत्नात या कामगिरीमुळे फार मोठी प्रगती झाली नाही. या साऱ्या अनुभवांवरुन असा निष्कर्ष काढता येईल की वंचितांच्या सुरक्षित उपजीविकेचे उद्दिष्ट गाठण्यासाठी या तीन पैकी केवळ एकेका घटकावर काम करणे पुरेसे नाही. तर त्याऐवजी या तीनही घटकांवर एकाच वेळी काम करणे आवश्यक आहे. वेगळ्या शब्दांत सांगायचे तर, वंचितांच्या सुरक्षित उपजीविकेचे उद्दिष्ट गाठण्यात हे तीन भिन्न प्रवाह यशस्वी होऊ शकले नाहीत याचे कारण एका घटकावर लक्ष केंद्रिंत करताना तितक्याच महत्त्वाच्या असणाऱ्या इतर दोन घटकांकडे पुरेसे लक्ष दिले गेले नाही. यावरून पर्यायवाद्यांनी अंगीकारलेल्या तीनही दृष्टिकोनांचा एकत्रित विचार करण्याची गरज पुढे येते. म्हणजेच पर्याय विकासाची व्यूहनीती आखताना त्या अंतर्गत संसाधनांवरील हक्क, संसाधनांची व उपजीविका उपक्रमांची उत्पादकता, आणि वंचितांमधील विविध क्षमता या तीन घटकांवर एकत्रितरीत्या काम करण्याची गरज आहे.

पर्यायवादी प्रयत्नांतील त्रुटी

रूढ विकासनीतीच्या अपयशाच्या तसेच पर्यायवाद्यांच्या प्रयत्नांच्या समीक्षेतून आपण साधारपणे सारख्याच निष्कर्षापर्यंत येऊन पोचतो असे दिसून येते. या निष्कर्षानुसार वंचितांच्या उपजीविकेच्या सुरक्षिततेसाठी वरील तिन्ही मुख्य घटकांवर (म्हणजेच संसाधनांवरील हक्क, संसाधनांच्या व उपक्रमांच्या उत्पादकतेमध्ये वाढ आणि वंचितांचे क्षमतावर्धन यावर) एकाच वेळी लक्ष केंद्रिंत करावे लागेल. अशा तऱ्हेने प्रस्तावित पर्यायी विकासाच्या व्यूहनीतीचा गाभा म्हणजे वरील तीन घटकांचा (संसाधनांवरील हक्क, उपक्रमांची उत्पादकता–वाढ आणि वंचितांचे क्षमता वर्धन) एकत्रित विचार करून उपजीविकेच्या गरजांची पूर्ती करणे व उपजीविकेची सुरक्षितता मिळवणे हा होय. म्हणून या व्यूहनीतीला हक्क, उत्पादकता आणि क्षमता यांचा एकत्रित विचार करणारी व्यूहनीती किंवा त्रिसूत्री व्यूहनीती असे थोडक्यात म्हणता येईल. या साऱ्या निष्कर्षांचा एकत्रित विचार करणारी व्यूहनीती अशी आखली पाहिजे की ज्यामुळे वंचितांना ताबडतोब, भरीव, आणि प्रत्यक्ष असे उपजीविके संबंधित फायदे होतील.

पर्यायी व्यूहनीतीचा गाभा

सारांशाने सांगायचे तर, अशा पर्यायी विकासनीतीची महत्त्वाची मूलसूत्रे पुढीलप्रमाणे असतील.

१) वंचितांच्या उपजीविका पूर्तीसाठी व सुरक्षिततेसाठी आडवळणी मार्गाऐवजी त्यांच्यावर केंद्रित असणारे थेट विकासप्रयत्न.

२) वंचितांना नवीन प्रकारचे रोजगार/व्यवसाय पुरवण्याऐवजी त्यांच्या सध्याच्या उपजीविकेच्या पद्धतींना महत्त्व व त्या पद्धतींपासून विकासप्रयत्नांची सुरुवात.

३) उपजीविकेसाठीच्या उपक्रमांसाठी आवश्यक साधनसामग्रीची उपलब्धता व खात्री वाढवण्यासाठी वंचितांच्या नैसर्गिक व इतर संसाधनावरील हक्कांमध्ये वाढ.

४) उपजीविकेच्या गरजांची पूर्ती व उपजीविकेच्या सुरक्षिततेमधील वाढीसाठी उपजीविकेच्या उपक्रमांपासून मिळणाऱ्या लाभामध्ये वृद्धी.

५) या उपजीविका उपक्रमांना मिळणाऱ्या लाभांमध्ये वृद्धी होण्यासाठी उपजीविकेच्या सध्याच्या उपक्रमांची व्याप्ती व उत्पादकता यात वाढ व त्यानंतर उच्च उत्पादकता असणाऱ्या पण शाश्वत अशा उपजीविकेच्या नवीन उपक्रमांची सुरुवात.

पर्यायी विकासनीतीची मूलसूत्रे

६) उपजीविकेच्या उपक्रमांमध्ये वृद्धी करण्यासाठी आवश्यक त्या वेगवेगळ्या क्षमता वंचित कुटुंबांमध्ये विकसित करणे, क्षमतांची वृद्धी करणे.

## नव्या व्यूहनीतीची मुख्य वैशिष्टये

ह्या मूलसूत्रांवर आधारित पर्यायी व्यूहनीतीचे रूढ विकासनीतीपेक्षा वेगळेपण दर्शवणारी काही महत्त्वाची वैशिष्ट्ये सांगता येतील. ही पर्यायी त्रिसूत्री व्यूहनीती प्रामुख्याने तीन कारणांकरता स्थानिक नैसर्गिक संसाधनांवर लक्ष केन्द्रित करेल. एक म्हणजे वंचितांच्या वसतिस्थानापासून जवळ असल्याने या स्थानिक संसाधनांचा वापर करणे वंचितांच्या दृष्टीने सोपे आणि सोयीचे ठरते. दुसरे कारण म्हणजे ही संसाधने वंचित घटक कित्येक पिढ्यांपासून वापरीत असल्यामुळे या संसाधनांची निर्मिती करणाऱ्या आणि त्यांना टिकवून धरणाऱ्या स्थानिक नैसर्गिक परिव्यवस्थेतील गुंतागुंतीच्या बारकाव्यांचे त्यांना उत्तम ज्ञान असते. यामुळे संसाधने आणि त्यांना आधारभूत नैसर्गिक परिव्यवस्था याला धोका न पोहचवता संसाधनांचा उपजीविकेच्या गरजांसाठी उपयोग करणे वंचितांना शक्य होते.

पर्यायी विकासनीतीचे वेगळेपण

नवीन व्यूहनीतीमध्ये स्थानिक संसाधनांवर आधारित उपक्रमांवर भर देण्याचे आणखी एक कारण म्हणजे बाहेरील संसाधनावर आधारित उपक्रम केल्यास त्यांच्या नियमित खरेदीसाठी लागणारा वित्तपुरवठा वंचित कुटुंबाकडे नसतो. तसेच बाजारात 'पत' नसल्याने त्या वित्तपुरवठ्यासाठी ऋण मिळवणे त्यांना कठीण होते. ह्या अडचणी दूर करून त्यांनी उत्पादन केले तर त्यांच्या विक्रीसाठी त्यांना शहरी–औद्योगिक व्यवस्थेशी जोडलेल्या उत्पादनांच्या (अथवा त्या व्यवस्थेशी संबंधित श्रमकौशल्यांच्या) बाजारव्यवस्थेत सामील व्हावे लागते. मात्र ह्या बाजारव्यवस्थेचे तपशील, अनुभव, डावपेच याबाबतचे ज्ञान तसेच त्यामध्ये यशस्वीपणे वावरण्यासाठी लागणाऱ्या क्षमता व अनुभव वंचितांकडे नसतात. अशा विविध कारणांमुळे त्या बाजारव्यवस्थेत सामील होऊन त्यातून पुरेसे फायदे मिळवणे वंचितांना सामान्यत: अवघड जाते. (इतरही अनेक रूढ विकास योजनांमध्ये रोजगार/व्यवसाय यास मदत अथवा कौशल्यनिर्मितीच्या मार्गांनी वंचितांना थेट शहरी–औद्योगिक बाजारव्यवस्थेशी जोडण्याचा प्रयत्न असतो व तेथेच ह्या योजना फसतात.) ह्या बाजारव्यवस्थेत टिकाव न लागल्याने अनेकदा वंचितांना कर्ज–थकबाकीदाराचा शिक्का माथी लागण्या व्यतिरिक्त हाती काही लागत नाही. त्यातील धोके टाळण्यासाठी निदान सुरुवातीच्या काळात तरी वंचिताच्या उपजीविका सुरक्षिततेच्या उद्दिष्टपूर्तीसाठी स्थानिक संसाधनांवर आधारित उपक्रमांवर अवलंबून राहणे गरजेचे आहे. एकतर ती संसाधने मिळवण्यासाठी बाह्यवित्तपुरवठा लागत नाही आणि दुसरी गोष्ट म्हणजे बाह्य वित्ताचा उपयोग न केल्यामुळे बाहेरील बाजारव्यवस्था टाळून त्याऐवजी उत्पादनाचा वापर/विक्री प्रामुख्याने स्व–उपभोग, आपापसांतील वस्तुविनिमय आणि स्थानिक बाजारपेठेतील सहभाग या माध्यमातून केला जाऊन त्यातून जास्त लाभ वंचिताना मिळवता येतील.

स्थानिक संसाधनांवर भर

स्थानिक संसाधनांचा मुक्त आणि योग्य उपयोग करणे शक्य व्हावे यासाठी स्थानिक लोकांकडे आणि विशेषत: वंचितांकडे खऱ्या अर्थाने स्थानिक नैसर्गिक संसाधनांवरील नियंत्रण असले पाहिजे आणि त्यांना ते योग्य रीतीने वापरण्याची संधी मिळाली पाहिजे. म्हणून प्रस्तावित

पर्यायी व्यूहनीती वंचितांना नैसर्गिक संसाधने वापरण्याची संधी व त्यावरील नियंत्रण मिळावे म्हणून कायदेशीर हक्क मिळण्यावर भर देते. हे कायदे अशा रीतीने बनविले पाहिजेत की त्यामुळे स्थानिक लोकांचे संसाधने वापरण्याच्या कारभारावर परिणामकारक आणि खऱ्या अर्थाने नियंत्रण राहील. निर्णय घेण्याची प्रक्रिया, या निर्णयांची अंमलबजावणी आणि या दोन्ही गोष्टींचे नियमन (म्हणजे निर्णय नियमानुसार असण्याची काळजी घेणे) या तीनही कारभारप्रक्रियांवर वंचितांचे नियंत्रण असले पाहिजे. कारभारावरील अशा प्रकारच्या नियंत्रणासाठी सुयोग्य संस्थात्मक संरचना व कायद्याची चौकट, यांची आवश्यकता आहे. तसेच कारभारामध्ये स्वायत्तता, पारदर्शकता, उत्तरदायित्त्व, आणि जनसहभाग या गोष्टींकरता कार्यपद्धती आणण्यासाठी सुयोग्य अशा कामकाजपद्धती लागू करण्याची गरज आहे.

वंचितांचे कारभारावरील नियंत्रण आवश्यक

नवीन व्यूहनीतीमध्ये जमीन ह्या नैसर्गिक संसाधनाला केंद्रस्थानी मानले गेले तरी त्यामध्ये पाणी व ऊर्जा ह्या इतर दोन महत्त्वाच्या नैसर्गिक संसाधनाचाही समावेश आहे. नव्या व्यूहनीतीनुसार प्रयत्न केल्यानंतर एकदा जमिनीची उत्पादकता वाढली की त्यातून उपजीविकेसाठी उपयुक्त असे अनेक लाभ मिळू लागतात आणि हे लाभ टिकवण्याकरता आणि वाढवण्याकरता सिंचनाच्या पाण्याची गरज भासू लागते. असे झाले म्हणजे पाण्याचा प्रश्न वंचितांच्या आणि त्यांच्याबरोबरील कार्यकर्त्यांच्या कार्यक्रमपत्रिकेवर येईल. यानंतर जलस्त्रोतांचा व पाणीवाटप व्यवस्थेचा विकास करण्याची तंत्रेदेखील वंचितांच्या गरजांशी जुळवून घ्यावी लागतील. पाणी सर्वांपर्यंत पोचवण्यासाठी आवश्यक असणाऱ्या ऊर्जासाधनांचा विचार हा त्यानंतरचा टप्पा असेल. ह्या पर्यायी व्यूहनीतीच्या अंतर्गत वंचितांच्या गरजा व क्षमतांसाठी अनुकूल व उपयुक्त अशी ऊर्जातंत्रेच नव्हे तर ऊर्जानीतीदेखील विकसित करावी लागेल.

जमिनीबरोबरीने पाणी व ऊर्जा या संसाधनांचे महत्त्व

नवीन व्यूहनीतीचा तिसरा घटक वंचितांच्या क्षमता वाढविण्याशी निगडीत आहे. मात्र वंचितांच्या क्षमता वाढविण्याचे पर्यायवाद्यांचे प्रयत्न बव्हंशी दोन प्रकारचे असतात. पहिल्या प्रकारचे प्रयत्न हे वंचितांच्या हक्कांसाठी लढणाऱ्या संस्थांकडून होतात. हे प्रयत्न प्रामुख्याने वंचित घटक आणि त्यांच्या नेत्यांमध्ये संसाधनांवरील हक्कांसाठी लढण्याकरता जाणीवजागृती, संघटन–बांधणी आणि राजकीय क्षमता वाढवणे यांवर केन्द्रित झालेले असतात. दुसऱ्या प्रकारचे प्रयत्न हे व्यक्तींमध्ये विशेषत: तरुणांमध्ये, आर्थिक उपक्रमांत सहभागी होण्यासाठी आवश्यक अशी कौशल्ये विकसित करणे यावर भर देतात. मात्र यातील फारच थोडे प्रयत्न स्थानिक संसाधनाची उत्पादकता वाढवण्यासाठी आवश्यक किंवा वंचितांच्या सध्याच्या उपजीविकेच्या उपक्रमांची उत्पादकता वाढविण्यासाठी आवश्यक अशा क्षमता वाढवण्यावर भर देतात. याउलट, नवीन व्यूहनीती वंचितांच्या अशा प्रकारच्या क्षमता वाढविण्यावर भर देते की ज्याद्वारे त्यांच्या भोवतालच्या स्थानिक नैसर्गिक संसाधनांची तसेच त्यांच्या सध्याच्या उपजीविकेच्या उपक्रमांची उत्पादकता वाढेल.

उपजीविकेच्या दृष्टिकोनातून वंचितांचे क्षमता–संवर्धन

नवीन व्यूहनीतीचा एक महत्त्वाचा घटक म्हणजे विविध वंचित समाजांची भिन्नभिन्न असणारी भौतिक परिस्थिती आणि सामाजिक–सांस्कृतिक संदर्भ यांचा या व्यूहनीतीमध्ये होणारा सजग विचार. वंचितांना उपजीविकेचे प्रत्यक्ष आणि निश्चित असे फायदे मिळायचे असतील तर हक्क, उत्पादकता, आणि क्षमता या तीन मुख्य घटकांचे एकत्रीकरण हे वंचितांच्या प्राकृतिक, सामाजिक–सांस्कृतिक, आणि राजकीय सद्यःपरिस्थितीच्या संदर्भातच करावे लागेल. खरे तर पर्यायवाद्यांच्या

प्रयोगांतील संकल्पना व तंत्रांचा वापर करुन परिणामकारक योजना आखण्यात रूढ व्यवस्थेला आलेले अपयश हे प्रामुख्याने या उपक्रमांच्या संदर्भ–विशिष्टतेकडे (म्हणजे विशिष्ट संदर्भांशी असणाऱ्या घट्ट नात्यांकडे) संपूर्ण दुर्लक्ष झाल्याचा परिणाम आहे. या प्रयोगातून शिकण्याचा प्रयत्न करणाऱ्या रूढ संस्थांनी हे प्रयोग व त्याभोवतालची सामाजिक–सांस्कृतिक, भौतिक परिस्थिती यांचे घट्ट, जैविक असे नातेसंबंध लक्षात घेतले नाहीत. त्यामुळे या प्रयोगांचे रूढ विकास योजनांत रूपांतर करताना या प्रयोगातील पर्यायी रीती आणि तंत्रे त्यांच्या परिस्थितीच्या संदर्भापासून पूर्णत: तोडली गेली. यापुढे जाऊन पर्यायी कार्यक्रम आणि योजनांची नक्कल फारसा विचार न करता विविध ठिकाणी राबवताना वेगवेगळ्या प्रदेशांतील आणि वेगवेगळ्या समुदायांतील सामाजिक–सांस्कृतिक, प्राकृतिक आणि इतर संदर्भात असणाऱ्या विविधतेकडे पूर्ण दुर्लक्ष करण्यात आले. या चुकांपासून धडा घेऊन नवीन व्यूहनीती राबवताना संदर्भ–विशिष्टतेच्या मुद्द्याचा विचार गंभीरपणाने करणे अत्यंत आवश्यक आहे. वेगळ्या शब्दात सांगायचे तर, नवीन व्यूहनीतीमधील तंत्रे, पद्धती, व संरचना ह्या वंचितांच्या प्राकृतिक, सामाजिक–सांस्कृतिक, आर्थिक, आणि दररोजच्या जगण्याच्या संदर्भात रुजलेली असली पाहिजेत.

**पर्यायी व्यूहनीतीची संदर्भ–विशिष्टता**

प्राकृतिक अथवा संसाधनांच्या संदर्भात ही व्यूहनीती उत्पादकता वाढविण्याकरता (व कायम राखण्याकरता) दुय्यम वा बाह्य निविष्टींवर अवलंबून राहण्याऐवजी स्थानिक, नैसर्गिक परिसंस्थेची प्राथमिक (अंगभूत) उत्पादकता वाढविण्यावर भर देते. स्थानिक नैसर्गिक परिव्यवस्थेची संरचना आणि गतीनियम यात विविधता असल्याने प्राथमिक उत्पादकता वाढविण्याची व त्याचा उपयोग करण्याची पद्धती व तंत्रे देखील स्थानिक परिस्थितीनुसार बदलतील हे ह्या व्यूहनीतीमध्ये लक्षात घेतले जाते. ह्यालाच नव्या व्यूहनीतीची पर्यावरणीय/भौतिक संदर्भ विशिष्टता असे म्हणता येईल.

**पर्यावरणीय संदर्भ विशिष्टता: संसाधनांच्या प्राथमिक उत्पादकतेवर भर**

सामाजिक–सांस्कृतिक आणि आर्थिक संदर्भातही या व्यूहनीतीची संदर्भ–विशिष्टता महत्त्वाची ठरते. याचे मुख्य कारण म्हणजे ही व्यूहनीती तज्ज्ञ–मंडळी, नोकरशहा, अथवा बाहेरील संस्था यांच्याऐवजी स्थानिक व्यक्ती आणि स्थानिक संस्था यांच्या क्षमतांवर अवलंबून राहते. स्थानिक वंचित व्यक्ती आणि समूहांच्या सामाजिक–सांस्कृतिक, आर्थिक आणि दररोजच्या जगण्याच्या कौशल्ये व परिस्थितीमध्ये बरीच विविधता असल्यामुळे वंचितांच्या क्षमता वाढविण्यासाठी स्थानिक परिस्थितीला अनुरूप असे विविध अध्यापन–विषय व अध्यापन–पद्धती (Pedagogies) विकसित करण्याची गरज आहे. तसेच वेगवेगळ्या ठिकाणी, वंचितांमध्ये काम करणारे मुख्य कार्यकर्ते, त्यांच्या संघटनांच्या तात्त्विक भूमिका, रचना, आणि संस्कृती या भिन्न असतील. यामुळे स्थानिक परिस्थितीला अनुरूप आणि सर्व कार्यकर्त्यांमध्ये आघाडी आणि सहकाराची भावना निर्माण करू शकतील अशा प्रकारच्या संघटनाबांधणीच्या संरचना व तंत्राची गरज आहे.

**सामाजिक–सांस्कृतिक संदर्भ विशिष्टता**

विकासाच्या व्यूहनीतीचे एक महत्त्वाचे अंग म्हणजे तिची राजकीय बाजू. वंचितांचे खऱ्या अर्थाने सक्षमीकरण करणाऱ्या विकासाच्या व्यूहनीतीला विरोधक असणारच आणि त्यामुळे ह्या विरोधाला पुरून उरण्यासाठी खंद्या समर्थकांची गरज भासेल. वंचितांच्या संसाधनांवरील हक्कांसाठी लढणाऱ्या अनेक लोकपातळीवर काम करणाऱ्या संस्था/संघटनांना ही व्यूहनीती स्वीकारार्ह वाटेल अशी अपेक्षा आहे. या संस्था/संघटना या व्यूहनीतीमागे आपले राजकीय बळ उभे करतील असे वाटते. या व्यूहनीतीच्या वापराची सुरुवात या संघटनांच्या कार्यक्षेत्रापासून होणे

योग्य ठरेल. वंचितांच्या बऱ्याच संघटना वंचितांना संसाधने वापरण्याचे हक्क मिळवण्यात आणि/ किंवा वंचितांमध्ये काही क्षमता आणि संघटनात्मक संरचना उभारणीत यशस्वी ठरल्या आहेत. हक्क, उत्पादकता आणि क्षमता यांचा एकत्रित विचार करण्याच्या दृष्टीने सुरुवात म्हणून अशी परिस्थिती अत्यंत योग्य ठरेल.

वंचितांच्या संस्था/ संघटनांचे पाठबळ

संसाधनांवरील हक्क, क्षमता, व उत्पादकता यांचा ह्या व्यूहनीतीद्वारे प्राथमिक पातळीवर संयोग घडवून आणला की वंचितांना उपजीविकेचे काही वाढीव लाभ (उपजीविकेच्या गरजा भागविण्यासाठी काही वस्तू वा सेवा) मिळवून देता येतील. उपजीविकेचे असे थोडे का होईना पण प्रत्यक्ष आणि निश्चित लाभ मिळू लागल्यावर स्थानिक, नैसर्गिक संसाधनांवर आधारित उपजीविकेचे (म्हणजे उत्पादनाचे) उपक्रम वंचितांना अधिक उपयुक्त, खात्रीलायक आणि म्हणून काही प्रमाणात आकर्षक वाटू  लागतील. यामुळे वंचित आणि त्यांच्याबरोबर काम करणाऱ्या संघटनांचा या व्यूहनीतीचा पाठपुरावा करण्यातील रस टिकून राहील. अशाप्रकारे ह्या व्यूहनीतीवर आधारित कार्यक्रम चालू राहिल्यावर त्यातून मिळणारे उपजीविकेसंबंधी लाभ वाढत जातील व एका विशिष्ट पातळीवर पोचतील. लाभांची ही विशिष्ट पातळी गाठल्यावर उपजीविकेच्या बाबतीत वंचित कुटुंबे हळूहळू स्वावलंबी व सुरक्षित व्हायला लागतील. या पायरीवर पोचल्यावर वंचितांना त्यांची उपक्रमशीलता व धाडस नष्ट करणाऱ्या परावलंबित्त्व आणि वंचिततेच्या दुष्टचक्राला भेदण्याची शक्ती प्राप्त होईल. अशा प्रकारे या व्यूहनीतीमुळे तांत्रिक, व्यवस्थापकीय, आणि संघटनात्मक क्षमतांबरोबरच भौतिक व मानसिक अवलंबित्त्वातून वंचिताना मुक्ती मिळेल. परिणामी, स्थानिक नैसर्गिक संसाधनांवरील अधिक हक्कांची आणि उपजीविका उपक्रमासाठी आवश्यक त्या इतर घटकांची (उदा. वित्तीय सहाय्य) मागणी अधिक जोरदार व आग्रहीपणाने करण्यास वंचित घटक उद्युक्त होतील.

उपजीविकेचे प्रत्यक्ष व वाढीव लाभ

परावलंबित्व व वंचनेच्या दुष्टचक्राचा भेद

याच कारणांमुळे वंचित समाजघटक आणि त्यांच्या संघटनांना संसाधनांची उत्पादकता आणि त्यांच्या स्वत:च्या क्षमता वाढवून पुढच्या टप्प्यावर नेण्यासाठी आणखी जोमाने प्रयत्न करण्यासाठी प्रेरणा व प्रोत्साहन मिळेल. अशाप्रकारे संसाधनांवरील व्यापक हक्क, तसेच उपक्रमांची उत्पादकता, आणि क्षमता यामध्ये झालेली वाढ ह्या साऱ्या घटकांच्या संयोगामुळे वंचितांना मिळणाऱ्या उपजीविकेच्या लाभात वाढ होईल. लाभात होणाऱ्या ह्या वाढीमुळे पुढच्या टप्प्यातील क्षमतावर्धन, संघटना शक्ती, व उत्पादन क्षमतेत वाढ साधण्यासाठी आवश्यक ते प्रयत्न करण्याची प्रेरणा, शक्ती मिळेल. अशा तऱ्हेने हक्क, क्षमता, आणि उत्पादकता यांचा एकत्रित विचार करणारी ही पर्यायी व्यूहनीती एका स्वावलंबी, स्वचलित, आणि चक्राकार प्रक्रियेला जन्म देईल. प्रथम टप्प्याचे लाभ व त्यातून शक्ती आणि प्रेरणा, त्यातून पुढच्या टप्प्यावरचे लाभ अशी ही प्रक्रिया असेल. त्यामुळे वंचितांना प्रथम उपजीविकेची सुरक्षितता गाठणे आणि नंतर समृद्ध जीविकेकडे वाटचाल करणे शक्य होईल. अशाप्रकारे प्राथमिक पातळीवरील पोषण सुरक्षिततेपासून सुरुवात करुन समृद्ध उपजीविकेच्या टप्प्यापर्यंत जाण्याचा मार्ग वंचित घटकांसाठी खुला करण्याची शक्ती ह्या पर्यायी व्यूहनीतीमध्ये आहे.

व्यूहनीतीची स्वचलित गती

❒❒❒

## भाग ३ : त्रिसूत्री व्यूहनीतीवर आधारित कृतीकार्यक्रमाची रूपरेषा

तिसरा टप्पा : कृतीकार्यक्रम

पर्यायी विकासविचाराचा संकल्पनात्मक गाभा, त्या गाभ्यावर आधारित व्यूहनीती ह्या दोन टप्प्यांनंतरचा टप्पा असेल त्या व्यूहनीतीची प्रत्यक्षात अंमलबजावणी करणाऱ्या कृतीकार्यक्रमाचा (ॲक्शन प्लॅन). ह्या कृतीकार्यक्रमाचे एक उद्दिष्ट असेल व अनेक प्रकारच्या उपक्रमांचा मिळून हा कृतीकार्यक्रम बनलेला असेल. ह्या उपक्रमांमुळे कृतीकार्यक्रमाच्या उद्दिष्टाची पूर्ती करण्यासाठी आवश्यक ते विविध घटक/गोष्टी तयार होतील, अशी कल्पना आहे.

कृतीकार्यक्रमाच्या आरेखनाची रूपरेषा देण्यामागचा उद्देश

याआधीच्या भागामध्ये वर्णन केलेल्या पर्यायी, त्रिसूत्री व्यूहनीतीची अंमलबाजावणी करणाऱ्या कृतीकार्यक्रमाची (म्हणजे त्याअंतर्गत करावयाच्या उपक्रमांची) आखणी वेगवेगळ्या प्रकारे करता येईल. विविध संस्था/संघटना त्यांच्या भोवतालच्या परिस्थितीनुसार पर्यायी त्रिसूत्री व्यूहनीतीचा वापर वेगवेगळ्या रीतीने करू शकतील. त्यामुळे पर्यायी त्रिसूत्री व्यूहनीतीवर आधारित कृतीकार्यक्रमाचे एकच विशिष्ट आरेखन (डिझाईन) तयार करणे योग्य ठरणार नाही. ह्या टिपणाच्या यापुढील भागात कृतीकार्यक्रमाच्या आरेखनाच्या एका नमुन्याची (केवळ) रूपरेषा दिली आहे. मात्र, त्यामागचा उद्देश सर्वंकष रीतीने वापरता येईल असे किंवा सर्वोत्तम असे कृतीकार्यक्रमाचे एक आरेखन तयार करण्याचा नाही. याउलट, त्याचा उद्देश हा त्या आरेखनाच्या एका उदाहरणातून पर्यायी त्रिसूत्री व्यूहनीतीचे आणखी खोलात जाऊन स्पष्टीकरण करण्याचा आहे.

कृतीकार्यक्रमाचे उद्दिष्ट

त्रिसूत्री व्यूहनीतीवर आधारित ह्या कृतीकार्यक्रमाचे उद्दिष्ट कोणते असावे? तर, वंचितांच्या उपजीविका सुरक्षिततेचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी त्रिसूत्री व्यूहनीतीनुसार आखल्या गेलेल्या योजना/कार्यक्रमांना प्रत्यक्षातील व्यापक विकासप्रयत्नांमध्ये (म्हणजे मुख्यतः सरकार व इतर प्रस्थापित संस्थांच्या विकासप्रयत्नांमध्ये) महत्त्वाचे स्थान मिळणे हे ह्या कृतीकार्यक्रमाचे उद्दिष्ट असायला हवे. सध्याच्या सरकारी विकास योजना वंचितांना उपजीविका सुरक्षितता देऊ शकत नाहीत. त्रिसूत्री व्यूहनीतीवर आधारलेल्या ह्या पर्यायी योजना/कार्यक्रमांनी सध्याच्या सरकारी विकास योजनांची जागा घ्यायला हवी (सोयीसाठी त्यांना आपण विकास–योजनांऐवजी उपजीविका–योजना म्हणूया). थोडक्यात सांगायचे तर, पर्यायी उपजीविका (सुरक्षिततेच्या) योजना सरकारला अंमलात आणावयास लावणे हा ह्या कृतीकार्यक्रमाचा मुख्य उद्देश असेल.

सरकारीकरण : विकृतींचा धोका

पर्यायी विकास व्यूहनीतीचा व्यापक प्रसार होण्यासाठी त्यावर आधारित उपजीविका योजनांचा स्वीकार सरकार व इतर मुख्यप्रवाही संस्थांना करावयास लावणे केवळ महत्त्वाचे नव्हे तर अत्यावश्यक आहे यात दुमत होण्याचे कारण नाही. अर्थातच हे करत असताना योग्य ती काळजी घ्यायला हवी. पर्यायी संकल्पनांवर आधारित याआधीच्या सरकारी विकास योजना आखताना/ अंमलात आणताना ज्या चुका केल्या गेल्या त्या कटाक्षाने टाळायला हव्यात. तेव्हा ह्या नव्या योजनांमध्ये कोणत्याही जनविरोधी विकृती निर्माण होणार नाहीत ही काळजी घेणेही महत्त्वाचे आहे.

पर्यायी त्रिसूत्री व्यूहनीतीवर आधारित कृतीकार्यक्रमाच्या ह्या उद्दिष्टाची पूर्ती करण्यासाठी पाच कळीच्या घटकांची आवश्यकता असेल. हे कळीचे/महत्त्वाचे घटक कृतीकार्यक्रमातील विविध

उपक्रमांमधून सिद्ध व्हावेत अथवा तयार व्हावेत अशी अपेक्षा असेल. कृतीकार्यक्रमाच्या उद्दिष्टाची पूर्ती करण्यासाठी आवश्यक ते पाच घटक पुढीलप्रमाणे असतील: (अ) वंचितांच्या उपजीविका सुरक्षिततेचे उद्दिष्ट साध्य करता येईल अशा **पर्यायी योजना/कार्यक्रमांचे आरेखन (डिझाईन)**, (ब) उपजीविका सुरक्षिततेच्या अशा पर्यायी योजनांसाठी विविध **वंचितगटांकडून एकत्रितपणे जोरदार मागणी**, (क) विविध **निर्णयकर्त्या तसेच त्यांच्यावर** (थोड्या फार प्रमाणात का होईना) अंकुश असणाऱ्या **प्रभावशाली समाजघटकांची या योजनांना संमती/साथ**, (ड) वंचितविरोधी हितसंबंधियांकडून पर्यायी योजनांना होणारा विरोध निर्णायकरीत्या मोडून काढण्यासाठी आवश्यक ते सक्रिय राजकीय पाठबळ पुरवणारी **समविचारी संस्था/संघटनाची व्यापक आघाडी**. (ई) पर्यायी योजनांच्या आखणी/अंमलबजावणीमध्ये सहभागी होणाऱ्या, पुढाकार घेणाऱ्या संस्था/संघटनेतील **कार्यकर्त्यांचे क्षमतावर्धन**. या पाच कळीच्या घटकांच्या एकत्रित परिणामामधून कृतीकार्यक्रमाच्या आधी उल्लेखलेल्या उद्दिष्टाची पूर्ती होईल व वंचितांच्या उपजीविकेच्या सुरक्षिततेच्या योजनांचा व्यापक स्तरावर प्रसार होईल.

पाच कळीचे घटक

उद्दिष्टपूर्तीसाठी आवश्यक पाच कळीच्या घटकांपैकी पहिला व अत्यंत महत्त्वाचा घटक म्हणजे वंचितांच्या उपजीविका सुरक्षिततेसाठी उपयुक्त अशा त्रिसूत्री व्यूहनीतीवर आधारित योजना/कार्यक्रमांचे आरेखन (डिझाईन). पर्यायी उपजीविका योजनांच्या आरेखनामध्ये त्या योजनांच्या तांत्रिक, आर्थिक, वित्तीय, प्रशासकीय व व्यवस्थापकीय अशा विविध घटकांचे सविस्तर व सखोल चित्रण असेल. उदाहरणादाखल पाहायचे तर, तांत्रिक घटकांच्या वर्णनामधे ह्या योजनेसाठी कोणते तंत्रज्ञान लागणार? ते कोण, कसे पुरवणार? ते वंचितापर्यंत कसे पोचणार? वंचितांना सातत्याने तांत्रिक सल्ला कोण व कसे पुरवणार? ह्या मुद्द्यांचा समावेश असेल. योजनेच्या आर्थिक/वित्तीय घटकांच्या वर्णनामध्ये योजनेतील कोणत्या बाबींसाठी व किती आर्थिक तरतूद करावी लागणार? त्यासाठी आवश्यक निधी कोणाकडून मिळवणार? तो वंचितांना कोणत्या अटीवर कोणत्या माध्यमातून पुरवला जाणार? या साऱ्या गोष्टींचा समावेश असेल. त्या योजनांची अंमलबजावणी करताना त्यातील प्रशासनिक बाबी म्हणजे योजनेची मंजुरी व अंदाजपत्रकापासून ते हिशोब व झालेल्या कामगिरीच्या परीक्षणापर्यंतच्या जबाबदाऱ्या कोण घेणार? ह्या साऱ्या व अशा अनेक बाबींची सविस्तर स्पष्टता योजनांच्या आरेखनामध्ये असणे महत्त्वाचे ठरेल.

पर्यायी योजनांच्या आरेखनामधील विविध घटक

पर्यायी उपजीविका योजनांचा आशय (कंटेंट) हा ह्या योजनेच्या आरेखनामधून आकाराला येईल. अर्थातच हा आशय सर्वत्र एकसारखा असणार नाही. त्रिसूत्री व्यूहनीतीमधला सामाजिक व पर्यावरणीय/भौतिक संदर्भांच्या विशिष्टतेचा मुद्दा येथे लक्षात घ्यायला हवा. तेव्हा पर्यायी उपजीविका योजनांचा आशय त्या त्या ठिकाणच्या त्या त्या वंचित गटाच्या आर्थिक, सामाजिक–सांस्कृतिक, राजकीय, व मानसिक परिस्थितीशी मिळताजुळता असावा लागेल.

योजनांच्या आशयातील विविधता

पर्यायी उपजीविका योजनांच्या ह्या आशयाइतकीच महत्त्वाची आहे ती ज्या प्रक्रियेतून हा आशय ठरवला जाईल ती प्रक्रिया. सध्याच्या सरकारी योजनांचा आशय देशाच्या/राज्याच्या राजधानीमधल्या सरकारी कार्यालयात अथवा संशोधन संस्थांमध्ये बसून सरकारी अधिकारी, संशोधक, व व्यावसायिक सल्लागार यांच्याकडून ठरवला जातो. पर्यायी उपजीविका योजनांची

आखणी ह्याच पद्धतीने करणे अर्थातच चुकीचे ठरेल. संदर्भ–विशिष्टतेचा मुद्दा डावलून, वंचिताच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक, व मानसिक परिस्थितीशी जोडून न घेता, त्यांच्या क्षमता/मर्यादा यामधील विविधतेचा सजग विचार न करता सध्याच्या विकास योजना आखल्या जातात हे आपण पाहिलेच. त्याचप्रमाणे त्यांच्या आखणीमध्ये, अंमलबजावणीमध्ये ज्यांचा विकास साधावयाचा त्या वंचितांना कोणतेच स्थान वा भूमिका नसते. पर्यायी उपजीविका योजनांच्या आखणी व अंमलबजावणीच्या प्रक्रियामध्ये हे सारे दोष टाळले पाहिजेत. पर्यायी योजनांचा आशय स्थानिक वंचितांच्या परिस्थितीच्या विविध अंगांशी मिळताजुळता असला पाहिजे. ह्याची निश्चिती/खात्री करण्यासाठी त्या आशयाच्या आखणी/निर्मितीची प्रक्रिया स्थानिक स्तरावरच घडली पाहिजे. त्या आखणीत तज्ज्ञ, सरकारी अधिकारी याचबरोबर स्थानिक वंचित समाज घटक, त्यांच्याबरोबर काम करणारे कार्यकर्ते/संस्था/संघटना, इतर अभ्यासक/संशोधक यांचाही सहभाग असायला हवा. किंबहुना अशा योजनांच्या आशयाची आखणी स्थानिक ठिकाणी होणाऱ्या जनसहभागी प्रक्रियेतूनच झाली पाहिजे. एवढेच नव्हे तर, वंचित घटकांच्या क्षमतांवरील विविध मर्यादा लक्षात घेता त्यांचा सक्रिय व अर्थपूर्ण सहभाग ह्या प्रक्रियेमध्ये असावा ह्यासाठी विशेष असे प्रयत्न करावे लागतील. ह्या साऱ्या बाबी केवळ योजनांच्या आखणी प्रक्रियेबाबतीतच नव्हे तर योजनांची अंमलबजावणी व परीक्षण करण्याच्या प्रक्रियांच्या बाबतीतही खऱ्या आहेत. या तीनही प्रक्रियांमध्ये तज्ज्ञ, सरकार यांच्याबरोबरीची किंबहुना त्याहून वरचढ अशी भूमिका वंचित समाज घटक व त्यांच्याबरोबरच्या संस्था/संघटनांना दिली गेली पाहिजे हे मुद्दाम नमूद करावयास हवे.

पर्यायी योजनेच्या आखणी/अंमलबजावणीची प्रक्रिया

कृतीकार्यक्रमामागील उद्दिष्टांच्या पूर्तीसाठी कळीचा ठरणारा दुसरा घटक म्हणजे अशा पर्यायी योजनांसाठी वंचित घटकांकडून होणाऱ्या जोरदार मागणीचा. पर्यायी उपजीविका योजनांना प्रस्थापित संस्थांची मान्यता मिळवण्यासाठी (ज्यांच्यासाठी ह्या योजना चालवायच्या आहेत त्या) वंचित घटकांकडून त्या योजनांची जोरदार मागणी होणे आवश्यक आहे. अशी जोरदार मागणी केली जाणे दोन मुख्य कारणांमुळे महत्त्वाचे ठरते. प्रथम म्हणजे ह्या योजनांच्या यशस्वितेसाठी त्यांची आखणी, अंमलबजावणी, व परीक्षण प्रक्रियांमध्ये वंचित घटकांचा सक्रिय सहभाग असणे गरजेचे आहे हे आपण पाहिले. तेव्हा वंचितांकडून होणारी या योजनांसाठी जोरदार मागणी वरील तीन प्रक्रियांमधील त्यांच्या सहभागाबद्दल खात्री देईल. दुसरे कारण म्हणजे नव्या पर्यायी योजना सध्याच्या विकास योजनांची जर जागा घेणार असतील तर सध्याच्या विकास योजनांमधून ज्यांचा फायदा होतो ते हितसंबंधीय नव्या योजनांना विरोध करणार हे उघड आहे. हितसंबंधियांचा हा विरोध मोडून काढण्यासाठी व निर्णयकर्त्यांवरील त्यांचा दबाब कमी करण्यासाठी वंचितांकडून होणारी जोरदार मागणी महत्त्वाची ठरेल. अशी जोरदार मागणी ही एखाद् दुसऱ्या संस्था/संघटनेकडून अथवा एखाद्या तालुक्यातील वंचित गटांकडून न होता ती व्यापक प्रमाणावर, जिल्ह्याच्या व मग राज्याच्या स्तरावर तरी केली गेली पाहिजे.

वंचितांच्या जोरदार मागणीचे महत्त्व

या मालिकेतील तिसरा कळीचा घटक म्हणजे प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष निर्णयशक्ती ज्यांच्या हातात आहे अशा प्रस्थापित संस्थेमधील समाजघटकांचे प्रबोधन, व त्यातून या योजनांना मिळणारी

त्यांची संमती/साथ. ह्या प्रत्यक्ष निर्णयकर्त्यांमध्ये संबंधित खात्यांचे विविध स्तरांवरील सरकारी सेवक, स्थानिक व वरच्या स्तरावरील राजकीय पुढारी, या विषयातील तज्ज्ञ/सल्लागार या साऱ्यांचा समावेश करायला हवा. ह्या समाजघटकांच्या हातात विकास योजनांबाबतचे निर्णय घेण्याचे प्रत्यक्ष अधिकार असतात. पण त्याचबरोबर विविध माध्यमे (वर्तमानपत्रे/रेडिओ/टीव्ही इ.) व ज्यांच्या मताला/आवाजाला किंमत दिली जाते असे समाजातील प्रभावशाली (व्होकल) समाजघटक (मध्यमवर्ग, बुद्धिवादी, इ.) यांचाही प्रभाव ह्या प्रत्यक्ष निर्णयकर्त्यांद्वारे होणाऱ्या निर्णयप्रक्रियेवर पडत असतो. त्यामुळे त्यांचा समावेश अप्रत्यक्ष निर्णयकर्त्यांच्या यादीत करायला हवा. रूढ विकासनीतीच्या समर्थकांच्या तसेच त्यातून लाभ घेणाऱ्या हितसंबंधियांच्या विचार–प्रचाराचा प्रभाव हा प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष निर्णयकर्त्यांवर पडत असतो. हा प्रभाव दूर करून त्यांचे प्रबोधन करणे गरजेचे असते. त्यासाठी रूढ विकासनीतीचे अपयश व त्याबरोबरीनेच पर्यायी व्यूहनीतीची व उपजीविका योजनांची वरचढ असणारी गुणवत्ता त्यांना दाखवून व पटवून द्यायला हवी. ह्या प्रबोधनातूनच त्यांच्या मतामध्ये अनुकूल बदल होऊन पर्यायी योजनांना त्यांची संमती व प्रसंगी साथ मिळण्यासाठी आवश्यक ती मानसिकता तयार होईल.

प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष निर्णयकर्त्यांची संमती/साथ

कृतीकार्यक्रमामागील उद्दिष्टांच्या पूर्तीसाठी कळीचा ठरणारा चौथा घटक म्हणजे, राजकीय पाठबळ देणारी व्यापक आघाडी. उपजीविकेच्या या पर्यायी योजनांना अनेकांचा, विशेषतः ज्यांचे रूढ सरकारी योजनांमध्ये हितसंबंध गुंतले आहेत अशांचा, विरोध होणार हे निश्चित. त्यामध्ये काही प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष निर्णयकर्त्या समाजघटकांचादेखील समावेश असणार. दारिद्र्यनिर्मूलन व विकासयोजनांवर सध्या होणारा महाप्रचंड खर्च व त्यासाठी निर्माण केल्या गेलेल्या महाकाय संस्था पाहता हा विरोध तीव्र असणार व ह्या विरोधकांची आर्थिक राजकीय ताकत मोठी असणार हे उघड आहे. ताकतवान घटकांचा हा विरोध मोडून काढण्यासाठी माध्यमांचा व जनमताचा रेटा तसेच वंचितांची जोरदार मागणी ह्या गोष्टी साहाय्यकारक ठरल्या तरी कदाचित निर्णायक ठरणार नाहीत. हितसंबंधियांचा हा जोरदार विरोध निर्णायकरीत्या मोडून काढण्यासाठी या योजनांमागे जाणीवपूर्वक व बांधिलकीच्या भावनेतून सक्रिय राजकीय पाठबळ उभे करणाऱ्या समविचारी संस्था/संघटनांची एक व्यापक आघाडी निर्माण करावी लागेल. असे राजकीय पाठबळ देणाऱ्या आघाडीमध्ये विविध भौगोलिक भागात विकासाच्या वेगवेगळ्या प्रश्नांवर काम करणाऱ्या संस्था, संघटनांचा समावेश असेलच. पण त्याचबरोबरीने समविचारी व वंचितांशी बांधिलकी मानणाऱ्या पण इतर क्षेत्रांत काम करणाऱ्या व्यक्ती/संस्था/संघटना यांचाही सक्रिय सहभाग ह्या आघाडीत असावा लागेल.

राजकीय आघाडीच्या पाठबळाचे महत्त्व

कृतीकार्यक्रमाच्या उद्दिष्टपूर्तीसाठी कळीचा ठरणारा शेवटचा घटक म्हणजे पर्यायी योजनांच्या आखणी/अंमलबजावणी/परीक्षणामध्ये पुढाकार घेणाऱ्या संस्था/संघटनांमधील कार्यकर्त्यांच्या विविध क्षमता. पर्यायी योजनांचा आशय रूढ विकास योजनांच्या आशयापेक्षा वेगळा असेल तसेच त्यांच्या आखणी/अंमलबजावणीच्या प्रक्रियांतही वेगळेपण असेल. परिणामी, रूढ विकासनीती मानणाऱ्या मुख्यप्रवाही संस्थातील तज्ज्ञ किंवा सरकारी अधिकारी पर्यायी योजनांच्या आखणी/अंमलबजावणीची संपूर्ण जबाबदारी पेलू शकणार नाहीत. ह्याचा अर्थ ह्या तज्ज्ञ व

अधिकाऱ्यांना दूर सारायचे असा नसून त्यांच्याकडे या स्थित्यंतराच्या तसेच पर्यायी योजनांच्या आखणी/अंमलबजावणीच्या प्रक्रियांचे नेतृत्त्व देता येणार नाही असा आहे. तेव्हा रूढ योजनांकडून पर्यायी योजनांकडे जाण्याच्या ह्या स्थित्यंतराचे तसेच पर्यायी योजनांच्या आखणी/अंमलबजावणीच्या प्रक्रियांचे नेतृत्त्व स्थानिक वंचितांबरोबर काम करणाऱ्या कार्यकर्ते/संस्था/संघटनांना करावे लागणार. ही जबाबदारी पार पाडण्यासाठी या संस्था/संघटनांच्या कार्यकर्त्यांकडे विविध प्रकारचे ज्ञान व क्षमता असाव्या लागतील. त्यातील काही क्षमता (उदा. प्रबोधनाच्या, संस्थाबांधणीच्या, धोरणवकिलीच्या, प्रशिक्षणाच्या) या संघटनांतील कार्यकर्त्यांकडे असतातच. त्यांना इतर म्हणजे तांत्रिक, व्यवस्थापकीय, प्रशासनिक क्षमतांची जोड द्यावी लागेल. पर्यायी उपजीविकेच्या योजना मान्य होऊन त्यांची व्यवस्थित आखणी/अंमजबजावणी होण्यासाठी संस्था/संघटनांकडे प्रशिक्षित कार्यकर्त्यांचा तसेच तांत्रिक/व्यावसायिक सहाय्यकांचा संच असणे महत्त्वाचे ठरेल. त्याशिवाय पर्यायी योजनांच्या यशस्वितेची ग्वाही देणे कठीण होईल.

संस्था/संघटनांच्या क्षमता

यापुढचा मुख्य प्रश्न आहे की हे सारे कळीचे घटक सिद्ध करण्यासाठी कृतीकार्यक्रमामध्ये कोणत्या प्रकारच्या उपक्रमांचा समावेश असणे आवश्यक आहे? हे सारे कळीचे घटक उभे करण्यासाठी वेगवेगळ्या उपक्रमांचा एकत्रित परिणाम साधावा लागेल. कृतीकार्यक्रमाच्या उद्दिष्टप्राप्तीसाठी कळीच्या ठरणाऱ्या घटकांची यादी पाहिल्यास कृतीकार्यक्रमातील उपक्रमांच्या आखणीची सुरवात करता येईल. यामधील 'वंचित घटकांकडून जोरदार मागणी', 'निर्णयकर्त्यांची संमती/साथ', व 'व्यापक राजकीय आघाडी' या घटकांच्या सिद्धतेसाठी जाणीवजागृतीच्या व प्रबोधनाच्या प्रयत्नांची गरज आहे. त्यादृष्टीने कृतीकार्यक्रमामधील तीन प्रकारचे उपक्रम महत्त्वाचे ठरतील. (अ) जाणीवजागृतीसाठी जनजागरण मोहिमा, (ब) नव्या पर्यायी योजनांची परिणामकारकता/उपयुक्तता दर्शवण्यासाठी त्या योजनेतील तांत्रिक बाबींचे प्रत्यक्षदर्शन (डेमॉन्स्ट्रेशन), (क) या पर्यायी योजनांची अनुदानित प्रकल्पांच्या माध्यमातून पथदर्शी पातळीवर अंमलबजावणी. या तीनही प्रकारच्या उपक्रमांच्या एकत्रित परिणामांमुळे वंचित घटक, निर्णयकर्ते, व समविचारी संघटना यांच्या मनात पर्यायी योजनांच्या उपयुक्ततेबद्दल विश्वासच नव्हे तर उत्साह निर्माण करणे शक्य होईल.

जनजागरण, प्रत्यक्षदर्शन, पथदर्शी प्रकल्प

यातील जनजागरण मोहिमांमध्ये दोन प्रकार असू शकतील. पहिला प्रकार म्हणजे व्यापक जनजागरण मोहिमा, ज्या समाजातील सर्वच व विशेषतः प्रभावशाली घटकांना समोर ठेवून आखल्या जातील. यामध्ये विविध माध्यमांचा वापर करता येईल. जनजागरण मोहिमांच्या दुसऱ्या प्रकारामधील मोहिमा ह्या खास वंचित घटकांना उद्देशून असतील. दोन्ही प्रकारच्या मोहिमांमध्ये रूढ योजनांचे अपयश, पर्यायांची गरज व उपयुक्तता, आणि त्यासाठी करावयाच्या प्रयत्नांची/संघर्षाची तयारी ह्या बाबींवर भर दिला जाईल. तांत्रिक बाबीच्या प्रत्यक्षदर्शनातून ह्या साऱ्या मंडळींच्या मनात पर्यायी योजनांच्या तांत्रिक घटकांसंबंधी विश्वास निर्माण करणे हा उद्देश असेल. अशा दृश्यरूप प्रत्यक्षदर्शनाची परिणामकारकता लक्षात घेऊन तसे प्रयत्न ठिकठिकाणी व गांभीर्याने केले जातील अशी अपेक्षा आहे. पर्यायी योजनांच्या उपयुक्ततेबाबत काही संघटनांना विश्वास वाटून त्या पुढाकार घ्यायला तयार होतील. त्यांच्या नेतृत्त्वाखाली प्रकल्प–अनुदानाचा वापर करून पर्यायी योजना

छोट्या किंवा पथदर्शी स्तरावर अंमलात आणणे हा देखील एक महत्त्वाचा उपक्रम असेल. विशेषतः, वंचित घटक व निर्णयकर्त्यांना या योजनांची परिणामकारकता पटवण्यासाठी हा एक परिणामकारक उपाय ठरू शकेल.

उपक्रमांची काही वैशिष्ट्ये


याशिवाय कृतीकार्यक्रमातील उपक्रमांचा चौथा प्रकार म्हणून धोरणवकिलीच्या (ॲडव्होकसी) उपक्रमाकडे पाहता येईल. मुख्यतः (प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष) निर्णयकर्त्यांशी संवाद साधून त्यांच्या मनातील शंका दूर करून त्यांना या पर्यायी योजनांची उपयुक्तता/परिणामकारकता पटवणे हा धोरणवकिली मागचा मुख्य उद्देश असेल. व्यापक पायावरील व सक्रिय राजकीय पाठिंबा देणारी आघाडी निर्माण करण्यासाठी समविचारी संस्था/संघटनांबरोबर सतत संवाद चालू ठेवावा लागेल. त्यासाठी करावयाचे बैठका/परिषदा यांसारखे उपक्रम हा कृतीकार्यक्रमाचा पाचवा घटक असेल.

धोरणवकिली, संघटनांशी संवाद

आधी म्हटल्याप्रमाणे या स्थित्यंतराचे नेतृत्त्व करण्यासाठी व पर्यायी योजनांच्या आखणी/अंमलबजावणीमध्ये वंचितांबरोबर काम करणाऱ्या संस्था संघटनांना पुढाकार घ्यावा लागेल व त्यासाठी वेगळी व भरपूर तयारी करावी लागेल. त्या तयारीमध्ये मोठा भाग असेल कार्यकर्त्यांच्या क्षमतावर्धनाचा. या क्षमतावर्धनासाठी व्यापक प्रशिक्षण कार्यक्रमांची गरज असेल. व असे प्रशिक्षण कार्यक्रम हा कृतीकार्यक्रमातील उपक्रमांचा सहावा महत्त्वाचा प्रकार असेल.

कार्यकर्ता प्रशिक्षण

कृतीकार्यक्रमाच्या उद्दिष्टपूर्तीमध्ये सर्वात महत्त्वाचा घटक म्हणजे पर्यायी योजनांचे सर्वांगीण व सखोल असे आरेखन. ह्या आरेखनाच्या आशयातील घटक व त्यांच्या निर्मितीसाठीची जनसहभागी प्रक्रिया याबद्दलची चर्चा आधीच्या विवेचनामध्ये केली आहेच. ह्या योजनांचे आरेखन त्या त्या ठिकाणच्या वंचित गटांच्या व त्यांच्याबरोबर काम करणाऱ्या संघटनांच्या सक्रिय व सजग अशा सहभागातून होणे महत्त्वाचे आहे. ठिकठिकाणी घडून यावयाची आखणीची ही प्रक्रिया पर्यायी उपजीविका योजनेतील एक घटक म्हणून पाहावी लागेल. प्रस्थापित (म्हणजे मुख्यतः सरकारी) संस्थांनी ह्या प्रक्रियेचे यजमानपद स्वीकारले तरी त्यांचा त्या प्रक्रियेवर गैरवाजवी प्रभाव असून चालणार नाही. मात्र वंचितांच्या जीवनाच्या प्रत्यक्ष परिस्थितीचे, त्यांच्या प्राधान्यक्रमांचे, त्यांच्या चिंतांचे/काळज्यांचे, त्यांच्या इच्छा/अपेक्षांचे नेमके प्रतिंबिब योजनांच्या आरेखनामध्ये पडावे यासाठी आखणीच्या जनसहभागी प्रक्रियेला आवश्यक ती माहिती व विश्लेषण उपलब्ध असणे गरजेचे आहे. (उदाहरणार्थ, विशिष्ट वंचित गटांच्या कोणत्या उपजीविका गरजांची पूर्ती होत नाही? त्या गटांकडे कोणती संसाधने, क्षमता आहेत? ह्याबद्दलच्या नेमक्या सखोल माहितीशिवाय उपजीविका योजनांचे आरेखन करता येणार नाही.) आखणीच्या प्रक्रियेच्या यशासाठी आवश्यक असा दुसरा घटक म्हणजे जनसहभागी पद्धतीने पर्यायी योजनांचे आरेखन विकसित करण्यासाठी आवश्यक त्या संशोधनपद्धती (मेथॉडॉलॉजी) व अध्यापनपद्धती (पेडॉगॉगी). तेव्हा योग्य व पुरेशी माहिती व विश्लेषण तसेच सुयोग्य संशोधनपद्धती व अध्यापनपद्धती यांच्या निर्मिती व विकसनावर कृतीकार्यक्रमांमध्ये जोर द्यावा लागेल. त्यासाठी कृतीकार्यक्रमांमध्ये विविध प्रकारचे संशोधन, माहितीसंकलन, विश्लेषण यासाठीचे अभ्यास करावे लागतील. अर्थातच ह्यातील बहुसंख्य अभ्यास हे संघटना व वंचितगट ह्यांच्या सहभागातून होतील. तेव्हा हे संशोधनात्मक, विश्लेषणात्मक, व माहितीसंकलनाचे सहभागी पद्धतीचे अभ्यास हा ह्या




**आकृती १: कृतीकार्यक्रम, त्यासाठीचे कळीचे घटक, व उपक्रमांचे प्रकार यातील नातेसंबंध**

कृतीकार्यक्रमातील उपक्रमांचा सातवा व अत्यंत महत्त्वाचा प्रकार असेल. हे मुद्दाम नमूद करावयास हवे की कृतीकार्यक्रमाच्या इतर घटकांना आशयात्मक पाया पुरवण्याचे कामही ह्या विविध अभ्यासांमधून होईल. (उदाहरणार्थ, जनजागरण मोहिमांचे वाङ्मय व प्रसार साहित्य यांचा आशय ह्या अभ्यासातून निर्माण होईल.) कृतीकार्यक्रमातील विविध घटक, उद्दिष्टप्राप्तीसाठीचे कळीचे घटक व कृतीकार्यक्रमाचे उद्दिष्ट यांतील नातेसंबंध सोबतच्या आकृतीमध्ये स्पष्ट केले आहेत.

संशोधन, माहितीसंकलन व विश्लेषणात्मक अभ्यास

अशाप्रकारे कृतीकार्यक्रमामध्ये प्रमुख सात प्रकारच्या उपक्रमांचा समावेश असेल. त्या उपक्रमांच्या यशस्वी अंमलबजावणीमधून आधी वर्णन केलेल्या सहा कळीच्या घटकांची सिद्धता होऊन त्यातून या कृतीकार्यक्रमाचे उद्दिष्ट साध्य होईल. या उद्दिष्टपूर्तीतून म्हणजे पर्यायी उपजीविका योजनांचा स्वीकार सरकार व इतर प्रस्थापित संस्थांनी केल्यावर पर्यायी व्यूहनीती व त्यामागचा पर्यायी विकासविचार प्रत्यक्षात अंमलात येईल. यातूनच या साऱ्या पर्यायी विचार–व्यूहनीतीच्या मागील प्रमुख उद्देश म्हणजे वंचित गटांना उपजीविका सुरक्षितता पर्यावरणीय शाश्वत मार्गाने मिळण्याचे उद्दिष्ट साध्य होईल.

समारोप

आता या कामामध्ये पुढाकार अर्थातच वंचितांबरोबर काम करणाऱ्या संस्था/संघटनांना घ्यावा लागेल. कदाचित हे काम एकट्यादुकट्या संघटनेकडून होणार नाही असे वाटल्यास अशा संस्था/संघटनांची जी समन्वयाची व्यासपीठे आज देशामध्ये व राज्यामध्ये कार्यरत आहेत त्यांनी यात पुढाकार घ्यायला हवा. यासाठी आवश्यक ते तांत्रिक, व्यावसायिक, प्रशासकीय बाबीतले पाठबळ वंचितांशी बांधिलकी मानणाऱ्या व्यक्ती/संस्था/संघटनांकडून त्यांना मिळू शकेल. विकासाच्या आघाडीवर सरकार व रूढ विकासवादी आज एका कुंठितावस्थेत आहेत व म्हणूनच बचावाच्या पवित्र्यात आहेत. त्यामुळे कदाचित हीच वेळ पर्यायी व्यूहनीतीच्या बाबतीत पुढाकार घेण्यास योग्य ठरेल.

संस्था/संघटना समन्वय व्यासपीठांचा पुढाकार

❒❒❒

# प्रयास आयोजित
# वंचिताभिमुख विकासविचार, व्यूहनीती व कृतीकार्यक्रम
# या विषयावरील चर्चासत्राचा अहवाल
## दिनांक २० जुलै व १० ऑगस्ट २००३

### प्रास्ताविक

प्रथम प्रयासतर्फे सुबोध वागळे यांनी प्रयासच्या वेगवेगळ्या प्रकारची कामे करणाऱ्या चार गटांविषयी माहिती दिली. त्यापैकी 'संसाधने व उपजीविका' या गटाचे काम कसे सुरू झाले, हा गट कोणत्या परिप्रेक्ष्यातून काम करतो आणि या गटाने आत्तापर्यंत काय काम केले याची माहिती प्रयासतर्फे देण्यात आली. त्यांच्या निवेदनाचा सारांश पुढीलप्रमाणे होता.

'१९९७-९८ मधे मी आणि मिलिंद बोकील यांनी रायगड-रत्नागिरी जिल्ह्यांमध्ये जो अभ्यास केला तेथून कामाला सुरुवात झाली. 'नैसर्गिक संसाधने आणि उपजीविकेवर शहरीकरण आणि औद्योगीकरण यांचा होणारा परिणाम' या विषयाचा अभ्यास आम्ही विविध संस्था, संघटनांच्या मदतीने केला. सुरुवातीपासून आम्ही तळागाळात काम करणाऱ्या संस्था-संघटनांच्या मदतीने आणि त्यांच्या अपेक्षा/निकड लक्षात घेऊन काम उभे करण्याचा प्रयत्न केला आहे.

विकासाच्या प्रश्नांच्या अभ्यासातून असे लक्षात आले की विकासाच्या प्रतिमानाचे (model) चार मुख्य स्तर आहेत. १) सैद्धांतिक बैठक (theory), २) सैद्धांतिक बैठकीचा संकल्पनात्मक गाभा (conceptual core), ३) व्यूहनीती (strategy) आणि, ४) कार्यक्रम/योजना (action plan). आपल्याला जर विकास आणि पर्यावरणावर काम करायचे असेल तर या चारी स्तरांचे भान ठेवायला हवे असे आमच्या लक्षात आले. या चारी स्तरांवर फार मोठे काम करायची आमची ताकद नाही. पण प्रयासच्या 'ऊर्जागटा' च्या कामातून असे दिसून आले की एखाद्या क्षेत्रात जरी खूप तज्ज्ञ काम करीत असले आणि आपली ताकद मर्यादित असली, तरी आपण योग्य वेळ, स्थळ, काळ निवडला आणि आपल्या क्षमतांचा नेटाने वापर केला, तर आपले काम अन्य संस्था/संघटनांना पूरक ठरू शकते. प्रयासचे काम हे पूरक पाठबळ देण्याचे काम आहे. प्रत्यक्ष लोकांबरोबर ज्या संस्था-व्यक्ती काम करीत आहेत त्यांच्या कामाची परिणामकारकता/धार वाढवण्यासाठी आमच्या क्षमता, ज्ञान, कौशल्ये उपयोगी पडली पाहिजेत असे जाणीवपूर्वक ठरवूनच आम्ही काम सुरू केले.

विकास प्रतिमानाच्या 'संकल्पनात्मक गाभ्या'वर काम करताना ब्रिटिश सरकारच्या DFID (Department For International Development) च्या कामाशी प्रथम ओळख झाली. त्या संस्थेतर्फे करण्यात येणाऱ्या शाश्वत उपजीविकेच्या सूत्राभोवतीच्या विचारव्यूहाच्या बांधणी व अंमलबजावणीत तळागाळातील मंडळींना कोणतेच स्थान नाही, हा आम्हाला मिळालेला पहिला धक्का होता. त्यावर विचार करताना असे वाटले की संकल्पनात्मक पातळीवर काम करताना ते काम केवळ संकल्पनात्मक पातळीवर राहता कामा नये. लोकांच्या प्रश्नांच्या संदर्भात लोकांबरोबर राहून काम करणाऱ्या संस्था/संघटनांबरोबरच हा विषय पुढे नेला गेला पाहिजे. या भूमिकेचा पाया तयार करण्यासाठी आम्ही काही अभ्यास व उपक्रम केले.

दुसरा मुद्दा म्हणजे आजच्या विकासाच्या किंवा दारिद्र्यनिर्मूलनाच्या ज्या योजना आहेत त्यातील त्रुटी आणि फोलपणा आपणा सर्वांना माहीत आहे. पण त्याला पर्याय म्हणून असणाऱ्या योजना/कार्यक्रम कसे असतील? या पर्यायी योजना परिणामकारकपणे मांडायच्या असतील तर त्यांचे आरेखन सुस्पष्ट असणे आवश्यक आहे. पर्यायी योजनांचे आरेखन करणे ही आमच्या कामाची सुरुवातीची पायरी असू शकते असे आम्हाला वाटले. आम्ही आरेखनापासून सुरुवात केली कारण आमच्या असे लक्षात आले की यावर फारसे काम झालेले नाही आणि आमच्यासारख्या शहरातल्या, पाठबळ देऊ इच्छिणाऱ्या संस्था हे काम चांगल्या प्रकारे करू शकतील जे तळागाळात काम करणाऱ्या संस्था/संघटनांना पूरक होऊ शकेल. या संघटनांशी सतत संपर्क ठेवून त्यांच्याशी चर्चा करूनच या सर्व गोष्टी ठरविण्यात आल्या. इथे उपस्थित असलेल्यांपैकी काहींनी आम्हाला यात मदत केली आहे. पर्यायी योजनांच्या आरेखनाचे दोन भाग आहेत: (१) वित्तीय/व्यवस्थापकीय/प्रशासकीय अंगांचे आरेखन आणि, (२) तांत्रिक -आर्थिक अंगांचे आरेखन. आम्ही सध्या यावर काम करीत आहोत.

अशाप्रकारे संसाधने व उपजीविका गट सध्या तीन गोष्टींवर काम करत आहे. (१) विकास विचारव्यूहाचा (डिस्कोर्स) संकल्पनात्मक भाग, (२) पर्यायी योजनांच्या वित्तीय/व्यवस्थापकीय/प्रशासकीय अंगांचे आरेखन आणि, (३) पर्यायी योजनांच्या तांत्रिक अंगांचे आरेखन.'

*यानंतर विकास विचारव्यूहाच्या संकल्पनात्मक गाभ्यावरच्या कामाविषयी कल्पना दीक्षित यांनी, पर्यायी योजनांच्या वित्तीय/व्यवस्थापकीय/प्रशासकीय आरेखनाच्या कामाविषयी रामचंद्र कौलगी यांनी आणि तांत्रिक आरेखनाच्या कामाविषयी सचिन वारघडे यांनी थोडक्यात माहिती दिली.*

## सत्र पहिले

## वंचिताभिमुख विकासविचार: संकल्पनात्मक गाभा

*सुरुवातीला प्रयासतर्फे कल्पना दीक्षित यांनी 'पर्यायी व्यूहनीतीचा संकल्पनात्मक गाभा' (चर्चासत्रासाठी तयार केलेल्या टिपणातील भाग १) यावर मांडणी केली. या सत्रातील चर्चेतून जे मुद्दे पुढे आले त्यांचा थोडक्यात गोषवारा पुढे दिला आहे.*

*हा गोषवारा लिहिताना सहभागी मंडळींनी मांडलेले मुद्दे, सूचना, आक्षेप, प्रतिक्रिया या ('बुलेट' फॉर्मचा वापर करून) थोडक्यात मांडल्या आहेत. ज्या ठिकाणी या मुद्द्यांना प्रतिसाद दिला गेला तेथे प्रतिसादातील मुद्दे वेगळ्या परिच्छेदात मांडले आहेत.*

### चर्चा

- उपजीविका सुरक्षिततेच्या संकल्पनेची मांडणी रॉबर्ट चेंबर्सची म्हणून तुम्ही केली आहे. पण ही प्रचलित मांडणी आहे. संघराष्ट्राच्या पूर्ण कल्पनेत, तसेच आर्थिक वाढीच्या सिद्धांतामध्ये सुद्धा ही मांडणी आहे. मग ती रॉबर्ट चेंबर्सची म्हणून का मांडली?
- साठ आणि सत्तरीच्या दशकांमधेही हे मांडले गेले की विकासाची रूढ संकल्पना बरोबर नाही.

### प्रतिसाद :

'उपजीविका सुरक्षितता' ही संज्ञा रॉबर्ट चेंबर्स ने प्रथम वापरली. म्हणून तो संदर्भ देणे आवश्यक वाटले. रॉबर्ट चेंबर्सनेही मान्य केले आहे की त्याच्याआधीही अनेक लोकांनी ही संकल्पना मांडली आहे.

१९५० च्या दशकात अर्थशास्त्रीय दृष्टीने विकासाची कल्पना मांडली गेली. साठीच्या दशकात त्यातील सामाजिक विकासाकडे झालेले दुर्लक्ष दाखवून दिले गेले. सत्तरीच्या दशकानंतर त्यातील पर्यावरणीय बाबींकडे झालेले दुर्लक्ष लक्षात आले. त्यातून शाश्वत विकास ही संकल्पना मांडली गेली. पण त्यात प्रचंड सुधारणावाद आला. स्त्रीवाद, पर्यावरणवाद यांनी विकासाची विविध अंगानी समीक्षा केली. शाश्वत विकासाच्या संकल्पनेत सामाजिक, राजकीय गोष्टींकडे झालेले दुर्लक्ष इ. गोष्टी शाश्वत उपजीविकेच्या (Sustainable Livelihoods) माध्यमातून मांडण्याचा प्रयत्न काहीजण करत होते. त्यातील एक रॉबर्ट चेंबर्स होता. ही सगळी मांडणी भाषा आणि आशय या दोन्ही दृष्टींनी पर्यायवाद्यांना जवळची होती. ती डीएफआयडीने अलगद उचलली, त्यावर प्रचंड काम केले आणि आता ती जागतिकीकरणाच्या समर्थनासाठी वापरली जात आहे.

- शाश्वत उपजीविका ही कल्पना जागतिकीकरणाबरोबर डीएफआयडीने कशी जोडली हे स्पष्ट करावे नाहीतर संभ्रम निर्माण होईल.
- डीएफआयडी जागतिकीकरणाच्या समर्थनासाठी पर्यायवाद्यांची भाषा कशी वापरते हे आणखी स्पष्ट होणे आवश्यक आहे.

### प्रतिसाद :

शाश्वत उपजीविका आणि जागतिकीकरण या संकल्पना एकमेकांशी जोडून घेणे खरेच अवघड आहे. त्या जोडण्याचा डीएफआयडीने केलेला प्रयत्न अतिशय ढिसाळ आहे. डीएफआयडी एका बाजूने संभ्रम निर्माण करीत आहे तर दुसऱ्या बाजूने पर्यायवाद्यांच्या मांडणीतील (सैद्धांतिक पायापासून ऱ्हेटोरिकपर्यंत) जोर काढून घेण्यासाठी फक्त त्यांच्या संज्ञा वापरत आहे. शाश्वत उपजीविका आणि जागतिकीकरण यात सांधाजोड शक्यच नाही. ते शेळीने वाघाचे कातडे पांघरण्यासारखे आहे. ओरिसा, आंध्रप्रदेश या राज्यांमध्ये डीएफआयडीने मोठमोठे लावलीहूड प्रोजेक्टस् (४०० आणि ६०० कोटी रू. चे) सुरू केले आहेत. तेथील स्वयंसेवी व सरकारी संस्थांना त्यांनी विश्लेषणासाठी व अंमलबजावणीसाठी एक अतिशय उत्तम अशी सैद्धांतिक व संदर्भ चौकट (frame work) दिली आहे. पण ही चौकट अभ्यासली तर असे आढळते की ही घेऊन वंचितांपर्यंत जाताच येणार नाही.

'मिलेनियम–गोल' मधील उद्दिष्ट म्हणजे २०१५ पर्यत जगातील गरिबी अर्ध्यापर्यंत खाली करणे. हे उद्दिष्ट डीएफआयडीला मान्य आहे. प्रत्येकाला १ डॉलर इतके उत्पन्न मिळायला हवे असे त्यांचे म्हणणे आहे. तेव्हा एका बाजूने डीएफआयडी दारिद्र्याच्या रूढ संकल्पनेला पर्याय ठरू शकेल असे 'लावलीहूड फ्रेमवर्क' वापरते आणि दुसऱ्या बाजूने रूढ 'उत्पन्नकेंद्री' गरिबीची संकल्पनाही वापरते.

- सर्व पर्यावरण एकच आहे, म्हणून उपजीविका–सुरक्षिततेसाठी पर्यावरणीय सुरक्षिततेची गरज आहे हे व्यक्त होणे आवश्यक आहे. विकास ही एक राजकीय प्रक्रिया आहे हे लक्षात घेणे आवश्यक आहे. वंचितांच्या विकासाचा/उपजीविकेचा विचार करताना चार घटक लक्षात घेणे गरजेचे आहे. १. तंत्रज्ञान, २. बाजारव्यवस्था, ३. जातीव्यवस्था आणि, ४. लिंगभेद (कुटुंबातील विषमता). दलित, आदिवासींच्या उपजीविकेसाठी भाकरीइतकाच (आर्थिक बाजूइतकाच) आत्मसन्मानही महत्त्वाचा आहे. उपजीविका मिळाली म्हणून त्यामागोमाग आत्मसन्मान आपोआप येणार नाही.
- जातीव्यवस्था आणि लिंगभेद हे मुद्दे उपजीविकेच्या संकल्पनेत विचारात घ्यावेच लागतील. नैसर्गिक आपत्तीपेक्षाही मुरवत ठेवलेला सामाजिक प्रश्न जास्त अवघड असतो. ग्रामीण भागात उपजीविकेची जबाबदारी स्त्रियांवरच जास्त प्रमाणात असते. तसेच शहरी–ग्रामीण असा स्पष्ट भेद आहे का? तालुक्याच्या ठिकाणी लोकांचे आचार, विचार, आकांक्षा, वस्तूंचा वापर हा शहरी लोकांपेक्षा वेगळा नसतो. अगदी एखादे आदिवासी गाव घेतले तरी त्यातील किती जणांना जंगल/जमीन/पाणी या नैसर्गिक संसाधनांवर आधारित आपली उपजीविका असावी असे वाटेल, किंवा तसे शक्य आहे?
- गावात/जंगलात राहणाऱ्या माणसाला तेथे राहायचे आहे का हा प्रश्न महत्त्वाचा आहे. त्यांच्यातील नवी पिढी प्रश्न विचारते आहे की आमचेच पाणी नेऊन तुम्ही शहराला देणार आणि आमच्या पाणीवापरावर मात्र मर्यादा घालणार. ते असाही प्रश्न विचारतात की आमचे जगणे तुम्हाला भाकरीपुरतेच वाटते का? आमची संसाधने जे खेचून नेतात त्यांना मात्र पार माहिती तंत्रज्ञानापर्यंत सर्व उपलब्ध आहे.
- ग्रामीण भागातील नैसर्गिक संसाधने कमीकमी होत चालल्यामुळे माणसे शहराकडे स्थलांतरित होत आहेत. शहरात उपजीविका–सुरक्षितता असते अशी समजूत होती. पण पुण्या–मुंबईसारख्या शहरात स्थलांतरित मोठ्या प्रमाणावर झोपडपट्ट्यांमधे राहतात. त्यांना कोणतीही उपजीविका सुरक्षितता नसते. पर्यावरणाच्या असंतुलनामुळे त्यांचे जीवन जास्तच असुरक्षित होत आहे.
- ग्रामीण, शेतीवर आधारित उपजीविका म्हणजे शारीरिक श्रम आले. शारीरिक श्रम न करणे म्हणजे प्रतिष्ठेचे अशी समजूत आपल्या मनांमध्ये रुजली आहे. तसेच शहरी, ग्रामीण किंवा आदिवासी भागात रोजगार उपलब्ध होऊ शकतो का? भंगीकामासारखी कामे किंवा नांगर चालवणे ही कामे उच्चजातीय करतील का? जर यांत्रिकीकरणाला आपला विरोध असेल तर शरीर श्रमाला प्रतिष्ठा हवी. म्हणजेच शरीर श्रमाला जास्त पैसा मिळायला हवा.
- ग्रामीण उपजीविकेत 'जंगलप्रधान' उपजीविका हाही प्रकार असतो.
- उपजीविका सुरक्षिततेसाठी गाव हे एकक (Unit) धरता येईल का?
- उपजीविकेवरील संकटांमध्ये प्रकल्पांमुळे होणारे विस्थापन, प्रकल्पांमुळे उपजीविकेच्या साधनांशी संपर्क तुटणे (धरणामागील लोक) यांचा विचार व्हायला हवा.
- आपले राजकीय परिप्रेक्ष्य कोणते हे स्पष्ट करणेही महत्त्वाचे आहे.
- आज महाराष्ट्रात विविध परिप्रेक्ष्यातून काम करणारे गट आहेत. मुख्य प्रवाहाचे अस्तित्वंच न मानणारे, मुख्य प्रवाहाचे स्वरूप समजावून घेऊन त्याच्यावर मात करू इच्छिणारे इ. आपली मांडणी त्यात कोठे बसते?
- आपली उपजीविका कशी असावी हे ठरविण्याचा हक्क वंचितांना हवा. हा राजकीय मुद्दा मांडणीत येण्याची गरज आहे. उदाहरणार्थ, विस्थापितांचे काय करायचे हे ठरवण्याचा हक्क त्यांनाच हवा. तसेच 'वंचित' म्हणजे काय? फक्त आर्थिकदृष्ट्या वंचित की ज्ञानापासूनही वंचित? त्यांचे ज्ञान कमी दर्जाचे हा वसाहतवादी दृष्टिकोन टाकून देणे महत्त्वाचे आहे. आपण त्यांना 'inputs' देणे अशा दृष्टीने विचार करतो आहोत, त्याऐवजी 'ते स्वतःच ठरवतील' असा विचार हवा.
- पर्यायी विकासाच्या संकल्पनात्मक गाभ्याच्या मांडणीमध्ये पुन्हा पुन्हा वंचित करण्यामागचे जे राजकारण आहे, ते यायला हवे. म्हणजे रूढ विकासाच्या पोटात दडलेले विषम विनिमयाचे तर्कशास्त्र उघड करायला हवे – मग ते ग्रामीण, शहरी, शेतीतील, औद्योगिक किंवा आंतरराष्ट्रीय अशा कोणत्याही पातळीवर असो.
- शेती हा आपल्या मांडणीत वंचितांच्या उपजीविकेचा मुख्य मार्ग गृहीत धरला आहे. शेतीमालाच्या भावावर नेहमी नियंत्रण ठेवले जाते, पण अन्य वस्तूंच्या नाही; हे राजकारण समजावून घेणे महत्त्वाचे आहे.
- जेथे संसाधने मर्यादित आहेत, तेथे ती कोणी कशी वापरायची हे ठरवावेच लागेल.
- जर ग्रामीण अर्थव्यवस्था वर न्यायची, तर शहरी भांडवली अर्थव्यवस्था खच्ची करावीच लागेल.
- ग्रामीण भागात अतोनात संसाधने आहेत. पण ती संसाधनेच नाहीत किंवा आहेत ती संसाधने मातीमोल आहेत असे बिंबवणे

हे राजकारण आहे. आम्ही एका शाश्वत शेतीच्या प्रयोगातून, पैशाच्या स्वरूपात किती बचत करता येते हे शेतकऱ्यांना दाखवून दिले. गावातली संसाधने आणि त्यांची किंमत याबाबत सातत्याने प्रशिक्षण देणे आवश्यक आहे.

- संकल्पनात्मक पातळीवर उपजीविका प्रक्रियेचा विचार करताना शोषणव्यवस्थेचा उल्लेख करायलाच हवा. शोषणव्यवस्थेविरुद्धचा झगडा हा प्राथमिक उद्दिष्टांमध्येच असायला हवा.
- उपजीविका प्रक्रियेचा विचार करताना आपण आकस्मिक धक्के आणि दीर्घकालीन ताणतणावांचा विचार करतो. त्यापेक्षाही समाजातील शोषणव्यवस्था जास्त महत्त्वाची आहे. त्यामुळे उपजीविकेवरील संकटांच्या मांडणीत समाजातील शोषणव्यवस्था सुद्धा मांडली पाहिजे. तसेच उपजीविका–सुरक्षिततेमध्ये 'शोषणव्यवस्थेविरुद्ध झगडण्याची ताकद' हा प्राथमिक उद्दिष्टांचा भाग असायला हवा.
- आपण फक्त वंचितांच्या उपजीविका–सुरक्षिततेबद्दल बोलत आहोत. एकूण विकासप्रक्रियेबद्दल नाही.
- या मांडणीत एक धोका दिसतो. 'तुमचे अधिकार सोडा, आम्ही तुम्हाला उपजीविका देतो' असा तर उपजीविकेचा अर्थ होणार नाही ना? उदा. संयुक्त जंगल व्यवस्थापनाचे असे झाले आहे.
- वंचितांच्या विकासाचा वेगळा विचार करणे योग्य होईल का? ही चर्चा उपजीविकेपुरतीच मर्यादित का ठेवली?

**प्रतिसाद :**

वंचितांच्या विकासाचा विचार इतर समाजाच्या विकासापासून तोडून करता येणार नाही हे बरोबर आहे. तसेच उपजीविका सुरक्षिततेच्या प्राथमिक उद्दिष्टांच्या पुढे जाऊन सन्मानपूर्ण जीविकेचा विचार महत्त्वाचा ठरतो. परंतु उपजीविका–सुरक्षिततेचे उद्दिष्ट हे आमच्या मांडणीचे एक बलस्थान आहे असे आम्हाला वाटते. संपूर्ण व्यवस्था बदलायचे उद्दिष्ट मोठे आहे, पण उपजीविका–सुरक्षितता या संकल्पनेचे व्यूहात्मक महत्त्व मोठे आहे. उपजीविका–सुरक्षिततेचे उद्दिष्ट किमान असल्याने ते नाकारण्याला काहीही नैतिक/राजकीय अधिष्ठान असणार नाही. त्यामुळे ते नाकारणे राजकीयदृष्ट्या जड जाईल. उपजीविका सुरक्षिततेला हानिकारक किंवा धोकादायक असे व्यवस्थेत आज जे जे घडत आहे ते थांबवण्यासाठी याचा उपयोग होईल. वंचितांना उपजीविका सुरक्षिततेचा हक्क मिळाला की वंचितता आणि परावलंबित्व यांचे दुष्टचक्र भेदणे, म्हणजेच त्या शोषणव्यवस्थेतून बाहेर पडणे हा पहिला टप्पा असेल. सुरक्षित उपजीविकेमुळे वंचित घटकांमध्ये ताकद आली की वंचित म्हणतील की आता व्यवस्थेचा अन्य भागही बदलला पाहिजे. कारण आम्हाला त्याचा त्रास होत नसला तरी आमच्या पुढच्या पिढ्यांना त्याचा त्रास होणार आहे. यासाठी सर्वांना सन्मानपूर्ण जीविका मिळाली पाहिजे. असे टप्प्याटप्प्याने जाणे हा आमच्या व्यूहनीतीचा विचार आहे. या ठिकाणी प्रामुख्याने सुरक्षित उपजीविका या पहिल्या टप्प्यातील उद्दिष्टाची आर्थिक बाजू मांडण्यावा एक प्रयत्न केला आहे. याचबरोबर जी सामाजिक आणि राजकीय बाजू आहे ती तिथेतिथे जोडून घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

- सामाजिक विश्लेषण त्या त्या ठिकाणी जोडत गेले तर त्याला अधिक बळकटी येईल.
- या मांडणीतील राजकीय भाग अधोरेखित करावाच लागेल. कारण आपण ज्या मांडण्यांना विरोध करतो आहोत, त्या मांडण्यांमधे नेमका राजकीय भागच नेहमी वगळला जातो.
- वंचित घटकांच्या दृष्टीने आर्थिक बाबींबरोबरच अन्य मुद्देही खूप महत्त्वाचे आहेत. राजकीय आणि सामाजिक सबलीकरणाशिवाय आर्थिक सबलीकरण टिकणारच नाही.
- आजच्या वास्तवात मुख्य उद्योग शेती आहे. गावातील जमिनीचे वाटप हा मूलभूत प्रश्न आहे. जमिनीच्या वाटपाचा प्रश्न जोपर्यंत आपण निश्चित करत नाही, तोपर्यंत सगळे प्रश्न तसेच राहतील. संसाधनांच्या वितरणाविषयी आधी निश्चिती केली पाहिजे.
- उपजीविकेच्या साधनांचे जे नियंत्रण आहे, त्याच्या सातत्याची हमी काय? जमिनीचा इतिहास बघितला तर ब्रिटिश काळापूर्वी कसणाऱ्याच्याच मालकीची जमीन होती. त्यानंतर जमिनीच्या मालकीची शाश्वती कधीही शासकीय यंत्रणेने दिली नाही. 'नैसर्गिक संसाधनांच्या हमी'चा उल्लेख कोठेतरी हवा. त्यातून एक प्रकारची सुरक्षितता आणि उपजीविकेचं सातत्य येईल.
- मानवाने कसे जगावे याबद्दलच्या त्याच्या इच्छाआकांक्षांना आकार देणे हा सुद्धा विकासप्रक्रियेचा भाग आहे. रूढ विकासप्रक्रियेत हा आकार देण्यातही मोठी विकृती शिरलेली आहे. हा मुद्दा आपल्या मांडणीत येण्याची गरज आहे. उदा. कातकरी माणसाकडे जेव्हा पैसा येतो, तेव्हा तो टेपरेकॉर्डर खरेदी करतो, मुलासाठी दूध नाही. रूढ विकासकल्पनेतून

विकास घडला नाही, एवढेच तिचे अपयश नाही, तर देशातील बहुसंख्य जनतेला या विकासाने वंचित बनविले. जे वंचित नव्हते त्यांनाही वंचित केले गेले. रूढ विकासनीतीचे अपयश केवळ आर्थिक नसून त्यातून निर्माण झालेल्या मानवी प्रवृत्ती हेही आहे. मोठी भांडवली गुंतवणूक बंद झाल्याशिवाय उपजीविका–सुरक्षिततेवर गुंतवणूक होणे शक्यच नाही. कारण या दोन गोष्टी परस्परविरोधी आहेत. उपजीविका–सुरक्षिततेला लुबाडूनच ही गुंतवणूक शक्य आहे.

- रूढ विकासनीती मांडताना एक गोष्ट लक्षात घ्यायला हवी. दारिद्र्यरेषेचा पुनर्विचार करण्यासाठी नेमण्यात आलेल्या लकडावाला समितीने मांडले होते की फक्त किमान आर्थिक साधनांची उपलब्धता होणे म्हणजे दारिद्र्यनिर्मूलन नव्हे. आर्थिक साधनांबरोबरच अन्य गरजांचाही – उदा. वैद्यकीय, सामाजिक – विचार झाला पाहिजे. दहाव्या पंचवार्षिक योजनेत जंगलावरचा, जमिनीवरचा अधिकार या सर्वांचा अंतर्भाव अन्नसुरक्षेचा विचार मांडताना केला पाहिजे अशी मांडणी आहे. म्हणजे निदान मांडणीच्या पातळीवर तरी रूढ विकासनीतीत काही बदल झाले आहेत याची दखल आपण घ्यायला हवी. हे सर्व प्रत्यक्षात किती येते हा मुद्दा वेगळा.
- विकासप्रक्रियेत निवडीचा प्रश्न महत्त्वाचा आहे. रूढ विकासात एका वर्गाचे हितसंबंध जपण्याच्या दृष्टीनेच निवड केली गेली आणि ते हितसंबंध अन्य लोकांना वंचित करूनच जपणे शक्य होते. उदा. जर आपल्या देशातील बहुसंख्य जनता शेतीवर अवलंबून होती, तर विकासनीतीने शेतीला गौण स्थान देऊन शहरी उद्योगधंद्यांना जास्त महत्त्व का दिले? पुन्हा शहरी औद्योगीकरणातही निवड आहेच. विकास हा श्रमशक्तीला डावलून आणि भांडवलशक्तीवर भर देऊनच झाला. औद्योगिक उत्पादनातही निवड आहे. मूठभर लोकांसाठी चैनीच्या वस्तू निर्माण करण्यावर भर आहे, बहुसंख्य जनतेच्या गरजेच्या वस्तू उत्पादित करण्यावर नाही. खेड्यात टी.व्ही.–टेपरेकॉर्डर येतो आणि तेथील दूध आणि फळे बाहेर जातात. शहरी मध्यमवर्गीयांसारखे जीवन म्हणजे विकास असे वंचिताला वाटते कारण तीच जीवनपद्धती उपलब्ध आहे. जी जीवनपद्धती उपलब्धच नाही ती त्याने स्वीकारावी असे आपण कसे म्हणू शकतो? आपल्या देशाला श्रमाधिष्ठित तंत्रज्ञान आवश्यक आहे भांडवलाधिष्ठित नाही, असे आपण म्हणतो. पण आपल्यापासून सुरुवात करायची आपली तयारी आहे का? पोस्ट आणि ई–मेल यात पोस्ट हे श्रमाधिष्ठित आहे. मग आपण संस्था–संघटना तरी ते निवडायला तयार आहोत का?
- हे वाद अनेक वर्षे चालू आहेत. जशी उत्पादनसाधने वाढत गेली तसे हेच वाद पुन्हापुन्हा होत राहिले. आज आपली लढण्याची ताकद वाढवणे हा मुख्य प्रश्न आहे. त्यासाठी जी आवश्यक ती साधने वापरायलाच हवीत.
- लढाईचे तंत्र आणि एकूण चंगळवाद यात फरक केला पाहिजे. ज्यांच्याकडे लढाईची प्रगत साधने आहेत, त्यांच्यापुढे बाकीचे टिकूच शकत नाहीत हा इतिहास आहे.
- आपल्या मांडणीत एक धोका जाणवतो आहे. रूढ विकासनीतीतील रोजगाराबाबतचे गृहीतक आपण काढून टाकू पाहतोय का? रोजगाराचे साधन मिळाल्यावर गरिबी दूर होईल अशी रूढ विकासनीतीची मांडणी होती. आपण जेव्हा 'फक्त रोजगाराची उपलब्धता' पुरेशी नाही असे म्हणतो, तेव्हा आणखी एक पायरीने खाली येतो आहे का?

**प्रतिसाद :**

रोजगाराचा अधिकार आणि उपजीविका सुरक्षिततेचा अधिकार यातील फरक महत्त्वाचा आहे. दांडेकर आणि रथ यांच्या पिढीतील अर्थतज्ज्ञांची रोजगाराच्या अधिकाराच्या पूर्ततेची कल्पना म्हणजे लँड आर्मी तयार करणे होय. ते मत अजूनही ग्राह्य धरले जाते. म्हणजे ज्यांना रोजगार हवा, त्यांनी मजूर म्हणून भरती व्हायचे आणि जिथे काम असेल तिथे त्यांना पाठवले जाईल. अशा तऱ्हेने त्या माणसाला पगारी विस्थापित करायचे. या लँड आर्मीच्या कल्पनेला आपले उपजीविका–सुरक्षितता हे उत्तर आहे. उपजीविका–सुरक्षिततेमध्ये संसाधनांवरील हक्कांबरोबर संसाधनांना उत्पादक करण्याचा हक्क आणि त्या उत्पादनाचा वापर करण्यासाठी क्षमता मिळवण्याचा हक्क येतो. यामधे रोजगाराचा हक्कही येऊ शकेल. परंतु हा रोजगार वंचित व्यक्तींचे ॲसेट्स् विकसित करण्यासाठी असेल. उदा. बड्या शेतकऱ्यांच्या फळबागा लावण्यासाठी रोजगार हमी योजना वापरण्यात येते. मग जर वंचित लोक कष्ट करून स्वत:च्या जमिनीची प्रत सुधारणार असतील तर त्यासाठी रोजगार हमीतून त्यांना पैसे मिळायला हवेत. रोजगाराचा हक्क हा उपजीविका–सुरक्षिततेचा हक्क मजबूत करण्यासाठी वापरावा.

- हीच भाषा सर्व दारिद्र्यनिर्मूलनाच्या योजनांमधेही वापरली आहे. त्यात ज्या रोजगार हमी योजना आहेत त्यात 'रोजगार हा संसाधन निर्मितीसाठी असेल, जो लोकांच्या भविष्याची तरतूद करेल' असे म्हटलेले असते. आपले म्हणणे स्पष्ट करण्यासाठी 'कायम स्वरूपाच्या संसाधनांची निर्मिती होईल अशाच प्रकारच्या रोजगाराला प्राधान्याने हाती घेतले जाईल' असे म्हणावे.

**प्रतिसाद :**

आपण म्हणतो की संसाधनांवरील हक्क व वंचितांच्या मालकीच्या संसाधनांची उत्पादकता वाढवण्यासाठी सरकारने पैसे दिले पाहिजेत. रोजगार हमी योजना म्हणते की संसाधने आणि पायाभूत सोयी या समाजाच्या मालकीच्या आहेत आणि त्या झिरपा पद्धतीने वंचितांकडे येतील. हे चुकीचे आहे.

- संसाधनांवरच्या वाढीव उत्पादकतेवरच्या हक्काची गोष्ट जेव्हा केली जाते तेव्हा वंचित तो हक्क मिळवू शकतील का याचा विचार करायला हवा. उदा. पाणलोटविकासाच्या कार्यक्रमात चराईबंदीमुळे शेळ्या असणाऱ्यांचे नुकसान होते. पाणी वाढले तर ते कोणाला मिळते? अशा वेळी राजकीय स्वरूपाचे प्रश्न निर्माण होतात.

**प्रतिसाद :**

नैसर्गिक संसाधनांच्या हक्कांच्या लढाईची कल्पना पुढीलप्रमाणे करता येईल. सुरुवात जमिनीसाठीच्या संघर्षापासून होईल. सुरुवातीलाच जर आपण संघर्षातून मिळालेल्या जमिनीची उत्पादकता वाढवण्याची क्षमता वंचित घटकांच्यात आणली तर त्यातून उपजीविकेला आवश्यक असे लाभ त्यांना मिळतील. हे लाभ मिळाले की त्यांच्यात भांडण्याची ताकद येईल आणि त्यांना दिसेल की जर आपल्याला याच्यापलीकडे उत्पादकता वाढवायची असेल तर गावातील पाण्यावरच्या अधिकारासाठी झगडावे लागेल. जर आपल्याला सर्वांना पाणी हवे असेल तर ऊर्जा लागेल. म्हणजे पाणी मिळवण्यासाठी ऊर्जेच्या मागणी व त्यासाठी संघर्ष करावा लागेल. अशा तऱ्हेने हा लढा पुढे जाईल. या लढ्याला सर्वांचा पाठिंबा अर्थातच मिळणार नाही. वंचित लोक जेव्हा जमीन/पाण्याची मागणी करायला लागतील, तेव्हा विरोध होणारच. त्यासाठी संघटनांना जमीन, पाणी, उर्जा यावरील हक्कांची लढाई लढायला लागणार आहे.

- ज्याला (चराईबंदीमुळे) शेळ्या सोडून द्याव्या लागणार आहेत, त्याला तुला पाण्याचा लाभ होणार आहे अशी हमी आपल्याला द्यावी लागेल. तुला काहीतरी मिळणार आहे आणि त्यासाठी सर्वांनी मिळून काहीतरी करायचे आहे असा विश्वास त्याला मिळाल्याशिवाय तो कार्यक्रमात सहभागी होणार नाही.
- 'बाजारव्यवस्थेवरील नियंत्रणा'चा मुद्दा आपल्या टिपणातील प्राथमिक आणि अंतिम उद्दिष्टांमधेही असायला हवा.
- पूर्वीच्या बलुतेदारीत जे परस्परावलंबित्व होते, त्या प्रकारे स्थानिक बाजारव्यवस्था विकसित करता येईल का? उदा. गावातले शेतकरी आणि शेतमजूर जर परस्परावलंबी झाले, तर शेतमजुराला गावाबाहेर जायची गरज उरणार नाही.
- स्थानिक बाजारात काय येते, आणि स्थानिक पातळीवरचे काय बाहेर जाते याच्या अभ्यासावरून असे दिसते की आजच्या नफाकेंद्री व्यवस्थेत, शहरी भांडवलदार वर्ग बेमालूमपणे उपजीविकेच्या साधनांचे शोषण करतो आहे. त्यामध्ये सामान्य शेतकरी हतबल होतो. उपजीविकेच्या साधनांचे प्रतिमान काय असेल? त्याचे भान कसे निर्माण करता येईल? याचा तपशीलवार विचार करायला हवा. प्रत्येक भागातली संसाधने वेगळी आहेत. उदा. मराठवाड्यात उपजीविकेची साधनेच नाहीत.

**प्रतिसाद :**

संसाधनांच्या उत्पादकतेतून जे आर्थिक मूल्य निर्माण होते त्यावर वंचितांचा ताबा राहणे महत्त्वाचे आहे. हे कसे करायचे यावर तयार उत्तरे नाहीत. पण काही शक्यता असू शकतील. वंचित घटकांची जी अंतर्गत अर्थरचना आहे (स्थानिक अर्थव्यवस्थेच्या आतील) त्यातच हे विनिमय मूल्य रिचवता येईल का? आपण आतल्याआत विनिमयाच्या रचना (exchange/barter mechanisms) विकसित करू शकलो तर हे शक्य होईल का? उदा. आठवडी बाजारात बाहेरून येणाऱ्या टोमॅटोच्या तुलनेत स्थानिक पातळीवर उत्पादित होणाऱ्या टोमॅटोला भाव मिळत नाही. पण त्याच टोमॅटोचा उपयोग वंचित घटकांपैकी जे संध्याकाळी उपाशी राहणार आहेत, त्यांच्यासाठी करता येईल का? अशा तऱ्हेच्या अंतर्गत विनिमयाच्या रचना विकसित करता येतील का? आपल्या स्थानिक अर्थव्यवस्थेच्या बाहेर जे वंचित घटक आहेत त्यांच्याशी या exchange mechanisms द्वारे आपण जोडून घेऊ शकू का? उदा. शहरातील मोलकरणी आणि कोकणातील वंचित घटकांतील स्त्रिया यांच्या संघटना आपण बनवू शकतो का? त्यांच्यात वस्तू–वस्तू अथवा वस्तू–पैसे विनिमयाच्या प्रणाली उभ्या करू शकतो का? अशा प्रकारची मॉडेल्स आपल्याला बनवावी लागतील.

- 'उपजीविकेच्या निवडीची क्षमता' हा मुद्दा उपजीविका–प्रक्रियेच्या मांडणीत घालायला हवा.
- निवडीच्या स्वातंत्र्याचा सुटा विचार करता येत नाही. सर्व पर्यायांची माहिती आणि सर्व पर्यायांची उपलब्धता (access) या दोन गोष्टींच्या पायावरच निवडीचे स्वातंत्र्य उभे राहू शकते. पर्यायांची माहिती आणि उपलब्धता नसेल तर निवडीच्या स्वातंत्र्याला काही अर्थ राहत नाही.

- श्रीमंतांची मुले घरातील पोषक जेवण टाकून फास्ट फूडची निवड करतात, तेव्हा त्यांचेही प्रबोधन करायला हवे. हा मुद्दा फक्त वंचितांनाच लागू आहे असे नाही. सगळे पर्याय उपलब्ध असताना त्यातून निवड करणे हा फक्त आर्थिक भाग नाही, त्यात सामाजिक भागही आहे.
- यासाठी पर्यायवादी गटांच्या व्यूहनीतीमधील प्रवृत्तीच्या भागावरही भाष्य करावे लागेल. उदा. सार्वजनिक आणि खासगी दळणवळण व्यवस्था यापैकी आपण काय निवडणार? लोकांना जेव्हा आपण हे करा, ते करा असे म्हणतो, तेव्हा लोक आपण काय करतो आहोत ते बघणारच ना?
- इथे मुद्दा तो नाही. निवडीचा मुद्दा बघताना पर्यायांची माहिती आणि उपलब्धता यांच्याशी ताडूनच तो बघितला पाहिजे. ज्यांच्याजवळ पर्यायांची माहिती आणि उपलब्धता या दोन्ही गोष्टी आहेत, त्यांना दुसऱ्यांनी कोणती निवड करावी हे सांगण्याची गरजच नाही. ज्यांच्याजवळ त्या नाहीत, त्यांच्यापर्यंत त्या घेऊन जाण्याची गरज आहे. पर्यायांची माहिती आणि उपलब्धता नसण्याचे बळी आज फक्त वंचितच आहेत असे नाही, मध्यमवर्गीयही आहेत.
- सजगपणे पर्याय वापरण्याची क्षमता असायला हवी.
- ही क्षमता वाढवणे हा जाणीवजागृतीचा भाग असायला हवा.
- माणसाला कोणत्या वस्तू महत्त्वाच्या आणि विकत घ्याव्याशा वाटतात आणि का हे तपासणे महत्त्वाचे आहे.
- उपजीविकेमध्ये क्षमतावर्धनाचा मुद्दाही महत्त्वाचा आहे. उदा. शिक्षण. जर क्षमताच मिळाली नाही, तर उपजीविका मिळणार नाही याची व्यवस्था आपोआप होत राहते.
- क्षमताविकासात वृत्ती आणि दृष्टीच्या क्षमता वाढवणे हेही असावे.

**प्रतिसाद :**

आर्थिक बाजूच्या मांडणीवरही तुमच्या सूचना हव्या आहेत. उदा. 'उपजीविकेची पूर्ती' म्हणजे कुटुंबातील सगळ्यांच्या किमान गरजा भागायला हव्यात अशी मांडणी केली तर किमान गरजा म्हणजे काय हे ठरवायला लागेल. 'किमान उपजीविके'ची नेहमीच आर्थिक व्याख्या करण्याचा प्रयत्न केला गेला आहे. उदा. दांडेकरांच्या मते प्रत्येक माणसाला २२०० कॅलरीज मिळायला हव्यात. त्यानंतर सामाजिक वास्तव खूप बदलले आहे. पण पर्यायी मांडणीतही किमान उपजीविकेची चर्चा केली गेलेली नाही. हे सगळे आपण आपल्या मांडणीत आणायला हवे. अमर्त्य सेन एका टप्प्यापर्यंत पोचले आहेत. ते म्हणतात की नुसते अन्न, पाणी, निवारा या किमान गरजा नाहीत. त्यात आरोग्य आणि शिक्षणही यायला हवे. आपण 'किमान उपजीविके'ची व्याख्या कशी करायची याचा विचार करायला हवा.

- किमान उपजीविकेच्या व्याख्येचा अट्टहास नको. निवडीचे स्वातंत्र्य हा खरा महत्त्वाचा मुद्दा आहे.
- शास्त्राने ज्या मूलभूत गरजा सांगितल्या आहेत, त्याशिवाय सध्याच्या काळातील शक्यतांच्या चौकटीत माझ्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी जे काही मला आवश्यक वाटते, शक्य आहे ते सर्व आणि सन्मानपूर्ण जीवन जगण्यासाठी आवश्यक ते सर्व असे यात समाविष्ट असावे.
- 'आर्थिक समृद्धी' म्हणजे काय हाही मुद्दा इथे महत्त्वाचा आहे.
- सामाजिक सुरक्षिततेचा विचार कुटुंबाच्या आणि शासनाच्याही पातळीवर केला जात नाही. शासनाच्या योजना एकमेकाला छेद देणाऱ्याही असतात आणि त्यात असणारा सामाजिक सुरक्षिततेचा विचार विस्कळीत आहे. वृद्धत्वाकडे गेलेली पिढी किंवा कुटुंब यांचे पुढे काय होणार हा भयानक प्रश्न आहे. याबाबतीत युरोपिअन देशांमधे ज्या प्रकारच्या सामाजिक सुरक्षिततेच्या योजना आहेत, त्यांचा आपण विचार करू शकतो का?
- स्वयंसेवी संस्थांचे हेतू काय आहेत हे तपासणेही महत्त्वाचे आहे. उदा. लातूरमधल्या संस्थांचा कार्यक्रम फंडींग एजन्सीच्या अग्रक्रमानुसार बदलतो असे नसावे. निरंतर बांधिलकी असावी. आता मराठवाड्यात DFID जमिनीच्या प्रश्नावर काम सुरू करते आहे. तेथे ट्रॅक्टर मिळाला की झाले, अशी भावना आहे. लातूर जिल्ह्यात गावांची संख्या ८५०, तर काम करणाऱ्या संस्थांची संख्या १७,०० अशी परिस्थिती आहे.
- समाजासाठी योगदान देणाऱ्या माणसाचे उत्तरदायित्व समाजाने स्वीकारावे. त्यासाठी फंडींग एजन्सीवर अवलंबित्व नसावे.
- पर्यायी विचारसरणी असणारे कार्यकर्ते जर एकत्र आले, तर एक ताकद निर्माण होईल.

## सत्र दुसरे

### पहिल्या टप्प्यातील उपजीविका–केंद्री व्यूहनीती

*प्रयासतर्फे सुबोध वागळे यांनी 'पहिल्या टप्प्यातील उपजीविका–केंद्री व्यूहनीती'ची (चर्चासत्रासाठी तयार केलेल्या टिपणातील भाग २) मांडणी केली. यात प्रामुख्याने रूढ विकासनीतीच्या अपयशाची कारणे, पर्यायी विकासनीतीचे तीन प्रवाह आणि उपजीविकाकेंद्री व्यूहनीतीची मूलसूत्रे व वैशिष्ट्ये या मुद्द्यांचा समावेश होता.*

### चर्चा

- रूढ विकासनीतीच्या अपयशांबरोबर यशही पाहिले पाहिजे. ज्या काळात रूढ विकासनीती विकसित झाली त्या काळाचा संदर्भ महत्त्वाचा आहे. रोजगार, उपासमार, सरंजामी संबंध हे प्रचंड प्रश्न स्वातंत्र्य मिळाल्यावर होते. त्यावेळी पायाभूत रचना निर्माण करण्यासाठी आधुनिक शेती आणि उद्योगधंदे उभे करणे ही क्रांतीच होती. नवीन उद्योगधंद्यामुळे जे लोक बलुतं सोडून शहरात आले त्यांना शिकायला मिळाले. दलितांबद्दलची सरकारी धोरणे, सहकारी चळवळ यातूनही बरेच काही साध्य झाले. लोकसंख्यावाढीचा प्रश्नही आपण लक्षात घ्यायला हवा.
- प्रयासच्या टिपणातील उपजीविकाकेंद्री व्यूहनीतीच्या वैशिष्ट्यांमधे 'स्थानिक संसाधनांवर भर' हा मुद्दा आला आहे. त्याबरोबर 'स्थानिक गरजांची पूर्तता करण्यावर भर' हा मुद्दा सुद्धा असायला हवा. नाहीतर पर्यायी विकासनीतीमधील दोष तसाच राहील. तो दोष म्हणजे शाश्वत पद्धतीची शेती स्वीकारायची, पण उत्पादन बाहेर विकायचे/निर्यात करायची. यामधून पुन्हा आपण त्याच चक्रात अडकू. वनौषधींची माहिती गोळा करायची, तर हेतू असा हवा की स्थानिक लोकांचे डॉक्टरवरचे अवलंबित्व कमी व्हावे.
- नैसर्गिक संसाधनांचा हक्क, त्याचे आरक्षण, त्यांच्या उपभोगाची खात्री आणि त्यावरचे नियंत्रण या गोष्टींना उपजीविकाकेंद्री व्यूहनीतीमधे प्राधान्य हवे आणि याचे लाभ प्रथम वंचितांनाच मिळतील अशा प्रकारचेच कार्यक्रम घ्यायला हवेत. उदा. आदिवासी क्षेत्रातून हमरस्ता जातो, त्याचे लाभ आदिवासींना जाताजाता झाले तर झाले, असा दृष्टिकोन नसावा.

  तसेच 'हक्कांमधे भरीव वाढ' असे शब्द टाळावेत. येथे कोणी कोणाला काहीतरी देते आहे अशी भावना नको. अशी परिस्थिती उपभोगता येईल अशी व्यवस्था निर्माण करण्याचा आपण प्रयत्न करतो आहोत अशी भावना हवी.
- 'व्यूहनीतीची मूलसूत्रे' यात मूल्यांची चर्चा सुद्धा हवी.
- उपजीविका परावलंबी नको. पण स्वावलंबी उपजीविका म्हणजे तरी काय? मानवी जीवन हे खरे तर परस्परावलंबी असते. एकाची उपजीविका धोक्यात आली, तर दुसऱ्यावरही त्याचा ताण पडला पाहिजे अशी व्यवस्था आपल्याला निर्माण करता येईल का हे बघितले पाहिजे.
- उपजीविका या संकल्पनेचे आपण जास्त काटेकोरपणे मोजमाप करू शकू का?
- आपली व्यूहनीती वंचितांना केंद्रस्थानी ठेवते. पण त्यांना मदत करू शकतील किंवा तटस्थ राहतील असे गावात कोणते समूह आहेत याचाही व्यूहनीतीत विचार हवा. असे समूह असू शकतात की जे केव्हाही वंचित गटात ढकलले जाऊ शकतात.
- संसाधनांच्या विकासाला (regeneration) कोणाचाच विरोध असण्याचे कारण नाही. पण संसाधनांचा विकास झाल्याने उपजीविकेचा प्रश्न सुटत नाही. यासाठी स्थानिक संसाधनांचा जगण्यासाठी मर्यादित वापर करणारा वंचित वर्ग आणि चंगळवादी, भोगवादी संस्कृतीसाठी त्यांचा वापर करणारा वर्ग यात फरक करायला हवा. आपल्याकडे याबाबत करण्यासाठी काहीच नसेल तर आपण जुन्याच मार्गाने जात राहू.
- आपली पर्यायवादी मांडणी स्वयंसेवी संस्थांप्रमाणे आहे. पण अन्य प्रकारचेही पर्याय आहेत. उदा. छत्तीसगड मुक्ती मोर्चा. यात संघर्षाचाही भाग आहे आणि हॉस्पिटल्स, शिक्षण हेही आहेत.
- प्रयासच्या मांडणीत 'स्थानिक नैसर्गिक संसाधनांची कमी किंवा घटती उत्पादकता' हे रूढ विकासनीतीच्या अपयशाचे एक कारण म्हणून पर्यायवाद्यांनी मांडले असे म्हटले आहे. पण या कारणाचा पुरेसा शोध घेतलेला नाही असे वाटते. 'स्थानिक सहभागाने संसाधनांच्या विकासासाठी प्रयत्न' हा त्यावरचा उपाय म्हणून सुचवला आहे. पण या पर्यायवादी मांडणीत कारणांचा खोलवर शोध न घेताच उपाय सुचवलेले दिसतात, आणि रूढ विकासनीतीच्या चौकटीतून काम करण्याची इच्छा दिसते.
- संसाधनांच्या/जमिनीच्या हक्कासाठी लढे लढले जात आहेत. दुसरीकडे आंदोलनात मिळणारी जमीन नापीक, निकस असते. त्यावर उपजीविका चालत नाही हेही माहीत आहे. तरीही हे लढे लढले जातातच. त्याचे कारण सामाजिक आहे.

जमीनमालकाला खेड्यात पत असते, ती शेतमजुराला नसते त्यामुळे जमिनीसाठी आंदोलने लढणे या गोष्टीचे इतर सामाजिक पैलू लक्षात घेणे गरजेचे आहे.

- संघर्षात्मक किंवा रचनात्मक कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांच्या विकासाच्या कल्पनेत तीन गोष्टींना महत्व असते. १. लोकशाही– यात समता आणि निर्णयप्रक्रियेतला सहभाग येतो. २. शाश्वतता आणि, ३. वाढ (growth). या तिन्ही गोष्टींना ते सारखेच महत्त्व देतात. शाश्वतता आणि लोकशाही नसेल तर नुसती वाढ म्हणजे विकास नाही, हे म्हणण्याची हिंमत पर्यायवाद्यांनी दाखवली. रूढ विकासनीतीत मात्र वाढ या मुद्द्यापुढे लोकशाही आणि शाश्वतता हे मुद्दे गौण ठरतात.
- आजपर्यंत समतेच्या संदर्भात वाटप या दृष्टीने खूप मांडणी झाली. पण रूढ विकास नीतीतील तंत्रज्ञान आणि उत्पादनपद्धती यातच कोठेतरी चुकते आहे अशी मांडणी प्रथम पर्यायवाद्यांनीच केली.
- 'उपभोगावर नियंत्रण' हे सामाजिकदृष्ट्या आवश्यक आहे हेही पर्यायी मांडणीत प्रथम मांडले गेले.
- असे दिसते की एकच पर्यायवादी संघटना एकापेक्षा जास्त दृष्टिकोनातूनही काम करते. तरी प्रश्न सुटतात असे दिसत नाही. त्यामुळे त्यातील त्रुटी शोधायला हव्यात.
- आपण पर्यायवादी मानसिक पातळीवर जरी रूढ विकास नीतीच्या प्रभावाखालून बाहेर पडलो असलो, तरी व्यावहारिक पातळीवर शिक्षणात सर्वोत्तम गुणवत्तेचा पगडा किंवा कॉम्प्युटर, इंटरनेट यांच्या मोहातून बाहेर पडणे आपल्याला शक्य झाले आहे का? आपण आत्मपरीक्षण केले पाहिजे नाहीतर लोकांना आपल्या बोलण्यात आणि वागण्यात फरक आहे असे वाटेल.
- चळवळीच्या दृष्टीने तंत्रज्ञानाला डावलून चालणार नाही.
- पर्यायाची मांडणी करताना विज्ञान तंत्रज्ञानाचा सुयोग्य वापर करण्याबाबत आपण उदासीन आहोत का? उदा. एका तालुक्यात जवळजवळ साडेतीनशे वनौषधींची माहिती आम्ही जमा केली. आता या माहितीचे नेमके काय करायचे हा प्रश्न आमच्यासमोर आहे. त्याचे प्रमाणीकरण (Standardization) करण्याचे तंत्रज्ञान आमच्याजवळ नाही. किंवा कोकणात शेकड्याने विकला जाणारा आंबा शहरात डझनाने विकला जातो. त्याचे प्रोसेसिंग आणि मार्केटिंग करण्याचे तंत्रज्ञान आपल्याकडे नाही. फक्त श्रीमंत बागायतदारांकडे आहे. त्यामुळे विज्ञान–तंत्रज्ञान हे आता अपरिहार्य आहे हे आपल्या मांडणीत यायला हवे आहे.
- परंतु वनौषधी लोक वापरत आहेत, म्हणूनच त्यांची माहिती मिळाली ना? त्याचे व्यापारीकरण आम्ही करू शकलो नाही, असेच म्हणायचे आहे का? तंत्रज्ञान वापरून काय मिळवायचे आहे? आंब्याच्या प्रोसेसिंगचे तंत्रज्ञान मिळाले की तो निर्यात होणार आणि पोराबाळांना मिळणार नाही.
- वनौषधींच्या बाबतीत गेली १०–१५ वर्षे व्यापारीकरण टाळूनसुद्धा ते उपजीविकेचे साधन कसे बनवायचे याविषयी काम चालले आहे. हे काम पर्यायी विकासाच्या प्रवाहात असणाऱ्यांनी केले आहे. एकदा व्यापारीकरण झाले की त्या वनौषधींची स्थानिक उपलब्धता आणि उपयोग लगेच कमी होतो. काही लोक सरळ जंगलातून वनौषधी गोळा करून एकत्र जमवतात व बहुराष्ट्रीय कंपन्यांना विकतात. ह्याबाबत काय करता येईल? गेली १५–२० वर्षे यावर काम सुरू आहे पण ते एका टप्प्यावर येऊन थांबले आहे.
- हल्ली बहुराष्ट्रीय कंपन्या वनौषधींची माहिती गोळा करून त्यांचा आपल्या औषधात उपयोग करतात. पण घरगुती औषधांचा वापर आता कमी झाला आहे. आता लोक आजारी पडले की डॉक्टरकडेच जातात.
- कारण त्यामागे विज्ञान–तंत्रज्ञानाचे वलय आहे.

## प्रतिसाद :

तंत्रज्ञान कसे वापरले जाते ते महत्त्वाचे आहे. तंत्रज्ञानाचा विकास आणि उपयोग यावर वंचित घटकांचे नियंत्रण असायला हवे. यासाठी तंत्रज्ञान कसे विकसित केले जाते हे महत्त्वाचे आहे. नाहीतर त्याच तंत्रज्ञानाचा वंचितांची परिस्थिती आणखी वाईट करण्यासाठी उपयोग होऊ शकतो. उदा. मातीची उत्पादकता वाढवण्यासाठी काही लोकांनी चांगल्या हेतूने काम केले. पण ते संस्था/संघटनांशी फटकून राहिले. त्यामुळे त्या कामाचा वंचितांना उपयोग झाला नाही. ऊर्जेचे उदाहरण घ्यायचे तर ६०–७० च्या दशकात पवनचक्क्यांपासून ऊर्जानिर्मिती करण्यावर खूप काम झाले. त्यावेळी त्या लोकांना असे वाटत होते की त्यातून ऊर्जेचे सगळे प्रश्न सुटतील. पण समाजाच्या इतर गरजांना अनुकूल असे ते काम नसल्यामुळे ते समाजाने स्वीकारले नाही. पण ते तंत्रज्ञान आता महाराष्ट्रातल्या मोठया उद्योगांनी स्वीकारले आहे आणि त्यांनी जो दर लावला आहे तो इतका जास्त आहे की त्यासाठी अनुदान द्यावे लागते. त्यामुळे वंचितांना जे अनुदान जायचे, ते या लोकांना जाते.

- व्यूहनीतीमधे 'सरकार' (State) हा संदर्भही हवा. त्याबाबत आपल्याला एक स्पष्ट भूमिका घ्यावी लागेल. आपण सरकारविरुद्ध आंदोलनेही करतो, पण ती आंदोलने सरकार जास्त लोकाभिमुख व्हावे यासाठी असतात.
- सरकारची धोरणे जेव्हा ठरतात, तेव्हाच आपले प्रतिनिधी तिथे कसे असतील याचा व्यूहनीतीत विचार हवा. अंमलबजावणीसाठी सरकारी यंत्रणेचा कसा वापर करून घेता येईल याचाही विचार हवा.
- कोणत्याही पातळीवरची राज्यव्यवस्था असो – देश, राज्य किंवा पंचायतपातळीवरची – कल्याणकारी राज्याचे प्रतिमान आपण गृहीत धरतो.
- हक्कांची भाषा आता शासन आणि निधी पुरविणाऱ्या संस्था दोघेही बोलू लागले आहेत. कधीकधी तर आपण त्या भाषेत बोलावे अशी निधी पुरविणाऱ्या संस्थांची अपेक्षाच असते. मग आपली गोंधळल्यासारखी अवस्था होते.
- परकीय देणगीचे प्रमाण हे भारताच्या अर्थव्यवस्थेचा एक टक्का सुद्धा नाही. तेव्हा त्याचा बाऊ करण्याचे कारण नाही. त्यापेक्षा सरकारच्या योजनाच जास्त चांगल्या प्रकारे कशा राबवता येतील याचा विचार व्हावा.
- शासनाच्या गुंतवणुकीच्या पध्दतीमधे आपण कसा हस्तक्षेप करू शकू याचा विचार करावा. उदा. आदिवासींसाठी शासनाची जी वित्तीय तरतूद आहे, त्यापैकी ९०% रक्कम शिक्षणावर खर्च होते. इतर कोणत्याही गोष्टीवर काही खर्च होत नाही.
- रूढ विकासनीतीत असणारे कायदे, धोरणे, योजना या फसव्या, अपुऱ्या आहेत हे सातत्याने जाणवत आले आहे. उदा. ग्रामसभेच्या अधिकारांबद्दल बोलले जाते. पण जमीन, जंगल, पाणी यावर ग्रामसभेला खऱ्या अर्थाने काहीच अधिकार नाहीत. उलट त्या अधिकाराचे अजून केंद्रीकरणच झाले आहे. दुसरे उदाहरण म्हणजे महाराष्ट्र सरकारने अलीकडे सेंद्रिय शेतीचे धोरण अवलंबायला सुरुवात केली आहे. रासायनिक खतांचे कारखाने ज्यांनी काढले ते आता आपले कारखाने बंद करुन सेंद्रिय खताचे कारखाने काढतील. सामान्य शेतकऱ्यांचा त्यात काही फायदा होणार नाही.
- रूढ विकासनीतीतले कायदे फार फसवे असतात. उदा. पाणीविषयक कायदा. त्यावरून असे वाटते की सगळे लोकांच्याच हाती आहे. पण प्रत्यक्षात तसे नसते. तसेच स्थानिक आणि जागतिक याचा संदर्भ आपल्या मांडणीत जास्त स्पष्टपणे यायला हवा. म्हणजे इंग्लंडच्या अर्थव्यवस्थेला आवश्यक अशा पद्धतीने भारतीय अर्थव्यवस्था, शेती इ. कसे घडवले जातात हे स्पष्ट होणे महत्त्वाचे आहे. कल्याणकारी अर्थव्यवस्थेच्या काळात राष्ट्रीय स्वावलंबनाचा विचार झाला, पण स्थानिक स्वावलंबन बघितले गेले का? हे प्रश्न व्यूहनीतीमधे उपस्थित करणे महत्त्वाचे आहे.
- स्थानिक पातळी म्हणजे काय हे स्पष्ट व्हायला हवे. गाव हे एक एकक असे आपण म्हणतो तेव्हा बाजार–गाव आणि संस्कृती, विनिमय, माहिती या मार्गांनी त्याच्याशी जोडली गेलेली इतर गावे असा अर्थ आपण गृहीत धरतो का? कार्यकर्ते जेव्हा प्रत्यक्ष बांधणी करायला लागतील तेव्हा या सगळ्या परिमाणांचा विचार त्यांनी आधीपासूनच करायला हवा.
- आपण गाव हे जर विकासाचे एकक असे गृहीत धरले, तर गावात ग्रामपंचायत, पतसंस्था या ज्या संस्थांशी पदोपदी संबंध येतो, त्यांचा आणि वस्तू–वस्तू विनिमयाच्या पद्धतीचा विचार बाजारव्यवस्थेच्या संदर्भात करायला हवा.
- बाजारव्यवस्था ही सर्व शेतकऱ्यांची, अगदी लहानात लहान शेतकऱ्यांचीही गरज असते. महाराष्ट्रातील ५०% शेतकरी आपला माल अडचणीच्या वेळीच विकतो, कारण त्याला आपल्या अन्य गरजा भागवायच्या असतात. उपजीविकेच्या दृष्टीतून बाजार ही गरज आहे. त्यामुळे आपल्या मांडणीत बाजाराची व्याप्ती कशी असावी, त्यावर नियंत्रण कोणाचे असावे हे मुद्दे यावेत.
- शहरात ज्याला मागणी असते असे उत्पादन शेतीतून न काढता गावपातळीवर ज्याची गरज आहे असे उत्पादन काढायला हवे.
- आपल्याला बाजारव्यवस्थेची पुरेशी माहिती नसते. उदा. भाव कसे ठरतात इ. म्हणून या सर्वांची माहिती करून घेणे आवश्यक आहे .
- तसेच अनुदाने कशाला दिली जातात हेही पाहायला हवे. सेंद्रिय खत महाग आणि रासायनिक खत स्वस्त असते. शेतकरी शेणखत, लेंडीखत विकून त्यातून आलेले अर्धे पैसे रासायनिक खत विकत घेण्यासाठी आणि उरलेले अर्धे भाजी, डाळ विकत घेण्यासाठी वापरतात.
- आज असे बचत गट आहेत की जे दोन–तीन वर्षे काम करत आहेत. पण बाजार–व्यवस्थेत उभे राहण्याइतकी ताकद नसल्याने पुढे काय करायचे हा त्यांच्यापुढे प्रश्न आहे.
- जमीन, पाणी, ऊर्जा या संसाधनांविषयी बोलताना समन्यायी वाटपाचा मुद्दा जास्त ठाशीवपणे व्यक्त व्हायला हवा.

- मानवनिर्मित साधनांच्या बाबतीतही समन्यायी वाटपाचा विचार करायला हवा. उदा. धरणाचे पाणी धरणाजवळच्या आणि दूरच्या लोकांना वेगवेगळ्या प्रमाणात उचलता येते.
- क्षमतावर्धनाच्या मांडणीत क्षमतावर्धन हे आत्मसन्मान राखून झाले पाहिजे हा मुद्दा हवा.
- क्षमतावर्धनात मूल्यशिक्षण, स्वजाणीव आणि कौशल्ये यांचा समावेश हवा.
- नैसर्गिक संसाधनांवर आधारित असणाऱ्या उपजीविकेला प्रतिष्ठा/पैसा कसे मिळवून देता येईल याचा विचार करायला हवा.
- उपजीविका सुरक्षिततेचा विचार करताना बियाणाच्या सुरक्षिततेचाही विचार करावा. पूर्वी शेतकरी बियाणासाठी ५–६ कणसं बाजूला काढून ठेवायचे. हल्ली शेतकऱ्याकडे बी नसते, त्याला विकतच घ्यावे लागते.
- माहिती प्रभावीपणे लोकांपर्यंत पोचवण्याची नवी, प्रभावी तंत्रे शोधून काढायला हवीत कारण जुने मार्ग आता प्रभावी ठरत नाहीत.
- आजच्या परिस्थितीत साधेपणा म्हणजे दीनपणा असा अर्थ झाला आहे. स्वत:वर उपभोगाच्या बाबतीत बंधने घालून घेऊन त्याला प्रतिष्ठा कशी मिळेल याचा विचार करायला हवा.
- सेंद्रिय शेती लोकांनी स्वीकारावी असे वाटत असेल तर 'परवडणारी शेती' अशा शब्दात म्हणजे आर्थिक व्यवहाराच्या भाषेत सांगितले तरच लोकांना पटेल आणि ते स्वीकारतील.
- बचतगटाच्या गेल्या १३ वर्षांच्या अनुभवानंतर आता हक्कांच्या दिशेने त्यांची वाटचाल व्हावी असे वाटते. पण हे शिवधनुष्य आपल्याला पेलणार का, असा प्रश्न आहे.
- गावापर्यंत चांगल्या गुणवत्तेच्या शिक्षण, आरोग्य या सुविधा पोचल्या पाहिजेत. मनोरंजन, माहिती, तंत्रज्ञान हेही गेले पाहिजे.
- पश्चिम महाराष्ट्रात साखर कारखाना या प्रतिमानाचा पगडा रूढ विकासनीतीच्या पद्धतीने विचार करणारे आणि पर्यायवादी या दोघांवर होता. त्यानंतर पाणलोट क्षेत्र विकासाच्या प्रतिमानाचा प्रभाव आहे. पर्यायी मांडणी लोकांनी स्वीकारावी यासाठी काय करावे लागेल याचा विचार व्हावा.

## सत्र तिसरे

### उपजीविका–केंद्री व्यूहनीतीच्या अंमलबजावणीसाठी कृतीकार्यक्रम

*सुरुवातीला प्रयासतर्फे रामचंद्र कौलगी यांनी कृतीकार्यक्रमाची (चर्चासत्रासाठी तयार केलेल्या टिपणातील भाग ३) मांडणी केली. यामधे कृतीकार्यक्रमाची गरज व उद्देश, कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी आवश्यक घटक आणि कार्यक्रमातील उपक्रम हे मुद्दे होते.*

प्रयास : पर्याय जर उभे राहायचे असतील तर पुढील गोष्टींची एकाच वेळी आवश्यकता आहे. १) पर्यायी तंत्रज्ञान, २) नवीन आर्थिक संबंध, ३) वित्तीय रचना, ४) राजकीय बळ, ५) नवीन संस्थात्मक रचना. ६०–७० च्या दशकात अनुरूप तंत्रज्ञानाची (appropriate technology) चळवळ झाली. त्यात असे गृहीत धरले होते की तंत्रज्ञान सोपे, स्वस्त, लोकांच्या आवाक्यातील केले की प्रगती होईल. पण ते तंत्रज्ञान रुजलेच नाही. कारण त्यासाठी आवश्यक ते आर्थिक संबंधच अस्तित्वात नव्हते, राजकीय बळही नव्हते. या पाचही गोष्टी एका वेळेला एकत्र येतील, तरच पर्याय उभा राहू शकेल. संस्था–संघटनांनी एकत्र येऊन काम केले तर या पाच गोष्टी एका वेळी घडण्याची शक्यता निर्माण होईल. या पाचपैकी गाभ्याचा मुद्दा म्हणजे त्यामागचे राजकारण. म्हणून आपल्या सगळ्या कामाची सुरुवात हक्कांसाठी लढणाऱ्या संस्था–संघटनांपासून होणे गरजेचे आहे.

- विकासाच्या कल्पना बदलत आल्या यामागचे राजकारण स्पष्ट व्हायला हवे. तसेच स्थानिक–व्यापक (Micro-Macro) स्तरांमधील संबंध लक्षात घेण्याची गरज आहे.
- स्थानिक पातळीवर विकासाचे काम करताना त्याचा व्यापक पातळीवर काय परिणाम होतो याचे भान हवे. म्हणून Micro-Policy चा विचार आपल्या मांडणीत अंतर्भूत करायला हवा. स्थानिक पातळीपासून जागतिक पातळीपर्यंत जो संबंध आहे, तिची समीक्षा झाली पाहिजे. ती समीक्षा तज्ज्ञांनी लोकांसमोर ठेवणे याचा फारसा उपयोग नाही. ती कार्यकर्ते आणि लोक यांच्या संवादातून घडवली गेली पाहिजे.

- ’लोकसहभाग’ याचा अर्थ लोकांनी श्रमदान करणे असा होऊ शकतो. त्याऐवजी ’लोकांनी निर्णय घेणे’ असा शब्दप्रयोग हवा.
- या सगळ्या मांडणीत कोणीतरी कोणालातरी देत आहे अशी भावना दिसते. ’माझ्यामधल्या कर्तेपणामधून मी नवीन जीवनपद्धती निर्माण करतो आहे’ अशी भावना हवी.
- कार्यक्रमाची उद्दिष्टे कल्पनेच्या पातळीवर न राहता त्याच्या घटकांचा तपशील ठरवणे आवश्यक आहे.
- संशोधन/विश्लेषण/माहिती संकलन याआधीची पायरी अशी असायला हवी–संघटनेच्या पातळीवर, जनसमूहांच्या पातळीवर जो वैचारिक पाया असेल त्यातून माहिती संकलन/विश्लेषण यायला हवे.
- प्रयासच्या मांडणीत संकल्पनात्मक पातळीवरची व्यापक भूमिका कृतीकार्यक्रमाच्या पातळीवर आली नाही.
- आपल्याकडे काय काय गोष्टी आहेत (कोणत्या संघटना, कशा प्रकारच्या) हे लिखित स्वरूपात असावे.
- आपल्या भूमिकांमधे मूलभूत फरक आहे. सरकार तुमच्या नियंत्रणाला मान्यता देणार म्हणजे काय? असे होऊ शकत नाही हे अनेकदा दिसले आहे. म्हणून सरकारला योजना स्वीकारायला लावणे हे उद्दिष्ट असू शकत नाही. आपले उद्दिष्ट लोकांची ताकद वाढवत नेऊन खऱ्या अर्थाने सत्ता लोकांच्या हातात येणे हेच असले पाहिजे. आणि सत्ता म्हणजे फक्त निर्णयप्रक्रियेची, पदांची सत्ता नव्हे. निवडणुकीत कोणाला तरी निवडून आणणे नव्हे.
- आपण पर्यायी विकासाची आखणी करायची गोष्ट करतो आहोत. म्हणून शासनाकडून काहीतरी मिळवायचे इतका त्याचा संकुचित उद्देश असू शकत नाही.
- आज सामान्य माणूस उपाशी असेल, तर सरकारची वाट पाहात नाही. स्वत:च हातपाय हलवतो.
- आपल्या रणनीतीमधे, सरकारी पातळीवर काय करायचे हा एक भाग असू शकतो. पण ते अंतिम उद्दिष्ट होऊ शकत नाही. कार्यक्रमच सरकारी व्हावा हे आमचे उद्दिष्ट नाही.
- सरकारचा कार्यक्रम चांगला असेल, तर स्वीकारायला काय हरकत आहे?
- आपली अपेक्षा मर्यादित आहे. सरकार अनेक योजना स्वीकारते, त्यामधे त्यांनी आपली योजना स्वीकारावी, इतकेच आपले उद्दिष्ट आहे. सरकारकडून आर्थिक मदतीशिवाय आणखी काय अपेक्षा करणार?
- सरकारशी पूर्ण फटकून का राहायचे? जर सरकारकडून काही फायद्याचे कार्यक्रम राबवता आले, तर का राबवू नयेत?
- सरकार हे काही वेगळे आहे, असे गृहीतक नको. आपली मांडणी राजकीयच आहे. सरकार किंवा राजकीय बदल हा आपल्या कामाचा भाग म्हणूनच स्वीकारावा.
- लोकशाही म्हणजे लोकांची सत्ता नसून लोकप्रतिनिधींची सत्ता असते. समूह (Unit) जितका लहान उदा. ग्रामसभा/पाडा तितके लोकांना जास्त प्रतिनिधित्व मिळेल. पण ग्रामसभेला/ग्रामपंचायतीला काही अधिकारच नाहीत. सरकार म्हणजे गावाबाहेर आहे, असे नसून सरकार गावातच आहे असे वातावरण निर्माण व्हायला हवे.
- पर्यायी योजनांबाबत सरकारी अधिकाऱ्यांचा सहभाग तर घ्यायलाच हवा. पण त्यांच्याबरोबरचा आपला संवाद आणि लोकांबरोबरचा संवाद हा आपण जाणीवपूर्वक करणे आवश्यक आहे. कारण सरकार आणि आपण यातल्या सीमारेषा लोकांच्या मनात धूसर असतात. म्हणून याबाबत जाणीवपूर्वक प्रशिक्षण करावे लागेल. रूढ विकासनीतीला छेद देईल असे काहीतरी आपल्या कार्यक्रमातच कसे असेल ते बघावे.
- निर्णयप्रक्रिया जास्तीतजास्त खालच्या पातळीवर नेणे गरजेचे आहे. लोकांना फक्त शिफारसीचे अधिकार नकोत, निर्णयाचे अधिकार हवेत. उदा. आज ग्रामपंचायतीला फक्त शिफारसीचे अधिकार आहेत.
- पारदर्शकतेसाठी वर्गीय प्रतिनिधित्व पाहिजे. उदा. ग्रामपंचायतीत शेतमजुरांचा प्रतिनिधी, मध्यम शेतकऱ्यांचा प्रतिनिधी हवा.

**प्रतिसाद :**

निर्णयप्रक्रियेत तीन गोष्टींचा समावेश होतो. (१) निर्णय घेणे, (२) अंमलबजावणी आणि,(३) (अंमलबजावणी होत असताना) तपासणी. आता लोकांचे नियंत्रण कसे असावे? त्याची प्रशासकीय/व्यवस्थापकीय अंगे कोणती असतील. एखाद्या गोष्टींवर लोकांचे नियंत्रण आहे असे आपण केव्हा म्हणू? लोकांचे नियंत्रण म्हणजे काय? नियंत्रणात, १) सहभाग, २) पारदर्शकता, आणि ३) उत्तरदायित्व या गोष्टींचा समावेश होतो. हे प्रश्न वेगवेगळ्या क्षेत्रात – उदा. वीज, पाणी, विमा, शिक्षण – आपल्यापुढे फार लौकरच येणार आहेत.

- ग्रामदानाची मूलभूत संकल्पना आणि ग्रामदानाचा कायदा याचा आपल्याला पर्यायी योजनांसाठी वापर करता येईल का?
- जर प्रस्थापित चौकट तशीच असेल, तर कायदा कसा फोल ठरतो हे रायगड जिल्ह्यात ग्रामदान कायद्याबाबत दिसून आले आहे.
- पर्यायवादी दृष्टिकोनातून काम करणारे पुष्कळदा अलग–अलग काम करत असतात. उदा. पाण्यावर काम करणारे, स्त्रियांसाठी काम करणारे इ. लोकशाहीत लोक किती संख्येने मागणी करतात हे सरकारवर प्रभाव टाकण्यासाठी महत्त्वाचे असते. म्हणून अशी काही यंत्रणा उभी करता येईल का, की भिन्नभिन्न क्षेत्रात काम करणारे पर्यायवादी एकमेकांना मदत करतील.
- वेगवेगळ्या बाबींवर काम करणाऱ्या पर्यायवाद्यांनी विचारांची देवघेव करायला हवी. उदा. एखादा धर्मनिरपेक्षतेवर काम करीत नसेल, तरी त्याची भूमिका धर्मनिरपेक्ष असणे महत्त्वाचे आहे.
- समग्र/एकात्मिक दृष्टिकोन वैचारिक पातळीवर आपल्याला माहीत आहे. पण तो गावपातळीवर प्रत्यक्ष उपक्रमात आणण्याचे महत्त्व आता कार्यकर्त्यांना पटले आहे. उदा. शिक्षण, पाणी, स्त्रिया या सर्वांवरचे कार्यक्रम जोडून घेणे. असे केल्याने रचनात्मक, संघर्षात्मक, जागृतीची कामे ही जी कृत्रिम विभागणी आहे, ती दूर व्हायला मदत होते.
- अनेक विषयांवर एका वेळी काम करता येत नाही अशी समजूत आहे. अनेक स्वयंसेवी संस्थांनी 'प्रकल्पाधिष्ठित कामा'चे प्रतिमान प्रश्न न विचारता स्वीकारलेले आहे. उदा. शिक्षणाचे, आरोग्याचे, शेतीचे काम. पण शिक्षणाचे काम करतानाही त्यापलीकडे त्या लोकांचे जीवन काय आहे याचा विचार करावाच लागतो. मग त्यात शेती, आरोग्य अशा इतरही गोष्टी येतात. 'प्रकल्पाधिष्ठित काम' याऐवजी जीवनाच्या सगळ्या अंगांना भिडत काम हा मूलभूत बदल स्वयंसेवी संस्थामधे व्हायला हवा.
- 'वंचितां'साठी काम करताना माझे त्यात स्थान काय, याचा विचार करावा लागेल.
- कार्यकर्त्यांनी उपभोगाबाबत लक्ष्मणरेखा आखणे आवश्यक आहे आणि कार्यकर्त्यांची बांधिलकी असणेही गरजेचे आहे.
- उपभोगाबाबत एक लक्ष्मणरेखा आखून घेणे महत्त्वाचे आहे. सामाजिक जीवनशैलीचा विचार करायला हवा. हक्कांबरोबर कर्तव्यही हवे.
- विज्ञान कसे मूल्यनिरपेक्ष आहे आणि तटस्थ नाही याबद्दल जाणीव निर्माण करण्याची गरज आहे.
- लोकांची बांधणी, विचारांचे मोहोळ उठविण्याची प्रक्रिया खालच्या पातळीपासूनच सुरू व्हायला हवी. नाहीतर वरच्या पातळीवर केलेल्या धोरणवकिलीचा किंवा कायद्यांमध्ये बदल करण्याच्या प्रयत्नांचा काही उपयोग होणार नाही.

❐❐❐

## २० जुलै आणि १० ऑगस्टच्या चर्चासत्रातून पुढे आलेल्या इतर कार्यक्रमात्मक सूचना

- चर्चासत्रासाठी तयार करण्यात आलेले टिपण सोप्या भाषेत करणे महत्त्वाचे आहे.
- आपले टिपण फक्त वंचितांबद्दल नव्हे तर एकूण जीवनशैलीबद्दल हवे.
- पर्यायी विकासावरील विचारविमर्षाच्या या प्रक्रियेत सातत्य टिकून राहावे. ती काही काळानंतर बंद पडू नये. समान प्रश्नांवर सर्वांनी एकत्र येऊन लढावे.
- पर्यायी विकासाच्या कार्यक्रमाच्या वेगवेगळ्या भागांच्या मांडणीची जबाबदारी वेगवेगळ्या लोकांनी घ्यावी.
- कार्यकर्त्यांमधे संपर्क व संवाद घडून त्यांच्या चर्चेतून पुढे येणाऱ्या सूचनांचे संकलन प्रयासकडे करावे.
- या विषयावर कार्यकर्त्यांच्या विभागीय पातळीवर व स्थानिक पातळीवर बैठका, चर्चा व्हाव्यात.
- उपस्थित नसणाऱ्या कार्यकर्त्यांबरोबर स्थानिक पातळीवर चर्चा व विचारविनिमय करावा.
- पर्यायी विकासाच्या संदर्भात होणाऱ्या विविध प्रयोगांचे प्रत्यक्षदर्शन करावे.
- शाश्वत विकासाबाबत उपलब्ध असणाऱ्या पर्यायांचा अभ्यास करावा.
- महाराष्ट्रात उपलब्ध असणाऱ्या पर्यायी व शाश्वत विकास विषयक साहित्याचे प्रयासने संकलन करावे. ज्यांच्याकडे अशा प्रकारचे साहित्य उपलब्ध असेल ते त्यांनी प्रयासकडे पाठवावे.
- आम्ही चार संघटना एकत्रित काम करतो व गावात अनौपचरिक अभ्यासगट चालवतो. तेथे आम्ही चर्चा घडवून आणून त्यांची प्रतिक्रिया काय ते पाहू शकतो.
- आंबेडकर अकादमीत यावर चर्चा घडवून आणता येईल.
- कार्यकर्त्यांच्या कार्याचे/कामाचे मूल्यमापन व्हावे.
- कार्यकर्त्यांचे क्षमतावर्धन आवश्यक आहे.
- झालेल्या चर्चेवरील टिपण तयार करून ते सर्वांना पाठवावे.

# उपस्थित कार्यकर्त्यांची नावे व संपर्क पत्ते

१. गणपत बोथले, ग्रामीण विकास प्रबोधिनी, मु. पोस्ट देवरुख, रत्नागिरी – ४१५८०४. फोन नं. – ०२३५४ – ४१७०७

२. अशोक कदम, परिवर्तन, दत्त साई टॉवर, तळ मजला, दत्त मंदिराजवळ, चिपळूण कराड रोड, खेर्डी, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी. फोन नं.– ०२३५५ – ५४७४०, ५६०५२, ५०५७१.

३. अशोक धामणे, जनसहयोग प्रतिष्ठान, मु.पोस्ट – कोसुंब, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी – ४१५८०४. फोन नं.– ०२३५४ – ४१२१३

४. अशोक सासवडकर, निर्मिती ग्राम विकास केंद्र, मु. पोस्ट – उद्धर, ता. सुधागड, जि. रायगड. फोन नं.– ०२१४२–२४११२६

५. नॅन्सी गायकवाड, जागृत कष्टकरी संघटना, दिशा केंद्र, ५, रत्नराज अपार्टमेंट, डॉ. आंबेडकर चौक, कर्जत, जि. रायगड. फोन नं.– ०२१४८–२२२४८/२३९०८

६. इंदवी तुळपुळे, श्रमिक मुक्ती संघटना, मु. सोनारपाडा, पो. ता. मुरबाड, जि. ठाणे – ४२१४०१. फोन नं.– ९५२५२४ – २२५७४

७. सुरेखा दळवी, श्रमिक मुक्ती संघटना, कृष्णकुंज, ३६, शिवाजी पार्क, डॉ. एम. बी. राऊत मार्ग, दादर, मुंबई – ४११०२८. फोन नं.– ०२२ – ४४५८४८९

८. उल्का महाजन, सर्वहारा जन आंदोलन, बी – २०२, पायल सोसायटी, अभ्युदय बँकेजवळ, सेक्टर – १७, न्यू पनवेल. फोन नं.– ०२१४०–६३२६३.

९. राजन इंदूलकर, श्रमिक सहयोग संघटना, पो. चिंचनगरी, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी. फोन नं.– ऑफिस – ०२३५५ – ५६०२७ / घर – ०२३५५ – ५६००४.

१०. संदीप काटे, स्वस्तिक महिला मंडळ, स्वस्तिक महिला मंडळ संचलित औद्योगिक प्रशिक्षण संस्था, पाथर्डी, जि. अहमदनगर. फोन नं.– ०२४४८ – २२०७३

११. गोविंद शिंदे, सातपुडा सर्वोदय मंडळ, शांतिवन, पो. नेरे, ता. पनवेल, जि. रायगड – ४१०२०६. फोन नं.– ९५२१४३ – २३८०७०

१२. शकुंतला लद्धा, परिवर्तन, श्रमिक सहयोग, शालिमार अपार्टमेंट, फ्लॅट नं.– ६, कराड रोड, चिपळूण. फोन नं.– २५४ २२५

१३. प्रकाश कांबळे, ८, मंगेशपार्क, भाऊ करंजकर मार्ग, एरंवडणे, पुणे – ४११०३८. फोन नं.– ५४६२ ९०९

१४. ज्ञानेश पाटील, कष्टकरी संघटना, जी – ३, शिवम, सिद्धी, गोग्रासवाडी, पाथर्ली रोड, डोंबिवली (ई) ४२१२०१. फोन नं.– ०२५१ – २४४७९५६

१५. शुभांगी गोरे, ब्राम्हण आळी, शहापूर, जि. ठाणे – ४२१६०१.

१६. शुभदा देशमुख, आम्ही आमच्या आरोग्यासाठी, मु.पो. कुरखेडा, जि. गडचिरोली – ४४१२०९. फोन नं.– ०७१३९–२४५४७१/ ०७१२–२२६ ७५२०

१७. श्रीनिवास कुलकर्णी, समाजवादी जन परिषद, डाक बंगल्यामागे, गंगाखेड, जि. परभणी. फोन नं.– ०२४५३ – २२२ २६८

१८. प्रकाश रेड्डी, धरती बचाव आंदोलन, संभाजीनगर, खाडगाव रोड, लातूर. फोन नं.– ०२३८२ – २२२ ४५२

१९. राम राठोड, चौधरी निवास, हडको वसाहतीजवळ, उस्मानाबाद रोड, तुळजापूर. फोन नं.– २४४ ०६९ / २४२ ०६१

२०. मुकुंद दीक्षित, ४४१८, मालवीय चौक, पंचवटी, नाशिक – ४२२००३.

२१. आनंद कपूर, धोबी मळा, टेलिफोन एक्स्चेंज जवळ, एटी/पीओ मंचर, जि. पुणे – ४१०५०३. फोन नं.– ०२१३३ – २२४ १०७

२२. प्रतिभा शिंदे, शांती निवास, मोठा माळीवाडा, मु. पो. ता. तळोदे, जि. नंदूरबार – ४२५४१३. फोन नं. – ०२५६७ – २३२४८४/ ०२२३२ –५०२६४१

२३. प्रफुल्ल शिंदे, सी.व्ही.ओ.डी. जैन हायस्कूल, ८४ सॅम्यूल स्ट्रीट, पालागल्ली, डोंगरी, मुंबई – ९. फोन नं.– २३४ ३४०४०

२४. शाम पाटील, २६, अशोक नगर, जमुनागिरी रोड, धुळे – ४२४००१. फोन नं.– ०२५६२ – २४६ ४१०/९८२२ २८६६८२

२५. श्रीकांत कारंजकर, धरामित्र, होम – २०, विवेकानंद नगर, आहोर्डा रोड, नालवाडी , वर्धा – ४४२००१. फोन नं.– ०७१५२– २४१६५३/ २५०५८४

२६. सुहास कोल्हेकर, जन आरोग्य अभियान, वैजयंत अपार्टमेंट, ८६/४ गणंजय सोसायटी, गांधीभवन मार्ग, कोथरुड, पुणे – ४११०२९. फोन नं.– ०२० – ५६७ ७५१३/५३८ २७८२

२७. विलास भोंगाडे, बालविकास विरोधी अभियान, वनराईनगर, मानेवाडा, नागपूर – २४. फोन नं.– ०७१२ – २७० २१५९

२८. सारंग पांडे, लोकपंचायत, लेन. नं. ३, शिवाजीनगर, एटी / पीओ / टीए – संगमनेर, अहमदनगर – ४२२६०५. फोन नं.– ०२४२५ – २२७१३४, २२४५३१/९४२२२ ५६३२५

२९. सुरेश सावंत, ३०५, कृष्ण अपार्टमेंट, सेक्टर –१२, कोपरखैरने, नवी मुंबई – ४००७०९. फोन नं.– ०२२ – २४२२ ५२६५/ २७५४ ४९९७६

३०. सूर्यकांत कुलकर्णी, स्वप्नभूमी, केरवाडी, ता.पावस, जि. परभणी. फोन नं.– ०२० – ४३४ ७०३५

३१. दत्ता देसाई, शहीद भगतसिंग सभागृह, अक्षय, २१६, नारायण पेठ, पुणे – ३०. फोन नं.– ऑफिस – ४४५६६९४, घर – ४४८ १७१४

३२. दत्ता पाटील, विदर्भ लोकविकास मंच, कामगार भवन, दुसरा मजला, वैद्यनाथ स्केअर, रामबाग, नागपूर – ४४० ००३. फोन नं.– ०७१२ – २२३ ११६९ / २७४ २१६२ / ९८२२ २२७६३७

३३. सुगन बरंठ, महाराष्ट्र प्रदेश सर्वोदय मंडळ, २५२, एस. व्ही. रोड, महात्मा गांधी सेवा मंदिर, तिसरा मजला, बांद्रा (प.), मुंबई–४०००५०. फोन नं.– ऑफिस– ०२२ – २६४ २३२२६/ घर – ०२५५ – २४१२१२१

३४. संजय संगवई, ७, चिंतामणी अपार्टमेंट, १९, शिक्षकनगर, पौड रोड, कोथरुड, पुणे – ४११०३८. फोन नं.– ५४५०८७०

३५. मोहन सुर्वे, विकास सहयोग प्रतिष्ठान, १३०/१०४०, मोतीलाल नगर, नं. १, डी. बी मोरे मार्ग, गोरेगाव (प) मुंबई – ४००१०४. फोन नं.– ०२२ – २८७ ६२१३५, ९८२००७४६३५

३६. पांडुरंग गोविंद गोरे, सत्यशोध अंध कल्याण केंद्र, मु. आंबावेड, पो. मुनावके, ता. जावळी, जि. सातारा. फोन नं. – ९५२१६३ – ७२००२०

३७. मंगला कुलकर्णी, समाजवादी जन परिषद, डाक बंगल्यामागे, गंगाखेड, जि. परभणी. फोन नं ०२४५३– २२२ २६८

३८. वासंती दीक्षित, ४४१८, मालवीय चौक, पंचवटी, नाशिक–४२२ ००३ फोन नं.– ०२५३–२५११ ८६७ / ९८२३१ ०५४८५

३९. रवींन्द्र सुमन,सत्यशोध संघटना, ५०९, ए कँप, पी. डब्ल्यू. डी. ऑफिस समोर, पोवई नाका, सातारा – १. फोन नं– ९५२१६२–२३२ ०६० / २३४ ०६०

४०. सलमा कुलकर्णी, समाजशास्त्र विभाग, पुणे विद्यापीठ, पुणे.

४१. विष्णू टोकरे, कष्टकरी संघटना, जी – ३, शिवम, सिद्धी, गोग्रासवाडी, पाथर्ली रोड, डोंबिवली (पूर्व) – ४२१ २०१ फोन नं.– ०२५१–२४४ ७९५६.

४२. पांडुरंग शिंदे,समाज विकास संशोधन संस्था.

# कमी खर्चाची शाश्वत शेती

**प्रयोग, प्रत्यक्षदर्शन, प्रशिक्षण,**
**माहिती संकलनाचा चार सूत्री कृती-कार्यक्रम**
***प्रयास, संसाधने व उपजीविका गट, पुणे.***

## संसाधने व उपजीविका : एक दृष्टिक्षेप

झाडे-झुडुपे, जंगले, गवताळ भाग, ओढे-नाले, शेत-जमीन यांसारख्या सभोवतालच्या परिसरातील नैसर्गिक संसाधनांवर बहुसंख्य ग्रामीण भागातील लोकांची उपजीविका अवलंबून असते. मात्र या संसाधनांची उत्पादकता दिवसेंदिवस कमी होत असल्याने ग्रामीण लोकांच्या उपजीविकेची स्थिती खालावत चाललेली आहे. त्यातही विशेषतः दलित, आदिवासी, व महिलांसारख्या वंचित समाजसमूहांच्या बाबतीत नैसर्गिक संसाधनाच्या उपलब्धततेचा प्रश्न देखील तीव्र बनला आहे. जमिनीवरील मर्यादित खाजगी मालकी व सामाजिक मालकीतील संसाधनांवर होणारी बाहेरची आक्रमणे ही त्या मागील मुख्य कारणे होत. सरकारी कार्यक्रम व विविध संघटनांनी दिलेले लढे यामुळे या वंचित घटकांना जमिनी उपलब्ध झाल्या आहेत व होत आहेत. मात्र, या जमिनीचा दर्जा व उत्पादकता दोन्ही खूपच कमी असल्याने त्यातून त्यांच्या उपजीविकेचा प्रश्न सुटत नाही. त्यातच वाढते औद्योगीकरण, शहरीकरण व जागतिकीकरण यामुळे बाहेरील ताकदवान गटांचे स्थानिक नैसर्गिक संसाधनांवर (विशेषतः सामायिक मालकीच्या) होणारे आक्रमण वाढते आहे.

ह्या साऱ्या परिस्थितीमध्ये ग्रामीण भागातील नैसर्गिक संसाधनांची उत्पादकता वाढवणे व त्यावर अवलंबून असलेल्या ग्रामीण लोकांच्या विशेषतः वंचित घटकांच्या उपजीविकांना बळकटी देणे ह्या उद्दिष्टांनी प्रयास संस्थेचा संसाधने व उपजीविका गट विविध प्रकारची कामे करीत आहे. कमी बाह्य साधने वापरून करावयाची कमी खर्चाची व शाश्वत शेती ह्या संकल्पनेवर आधारित कृती-कार्यक्रम हा त्या कामांतील एक महत्त्वाचा भाग आहे.

## कमी बाह्य साधनांची शाश्वत शेती पद्धती

शेती ही ग्रामीण भागातील जनतेसाठी उपजीविकेचे प्रमुख साधन आहे. मात्र महाराष्ट्रातील बहुतेक भागातील शेतीची अवस्था वाईट आहे. राज्यातील फार मोठ्या भागामध्ये शेतीला पाणी नाही. जेथे पाणी आहे तेथे पाणी व खताचा गैरवापर झाल्याने उत्पादकता घटली आहे. पाण्याचे दुर्भिक्ष्य, विविध कारणांमुळे जमिनीची घटलेली प्रत, व जमिनीचे छोटे आकार यामुळे समाजातील वंचित घटक शेतीपासून पूर्णपणे दुरावले आहेत. मात्र जमिनी विकून शहरात जाण्यामुळे त्यांचा उपजीविकेचा प्रश्न सुटत नाही हे देखील त्यांच्या लक्षात आले आहे. शेतीसुधारणेसाठी नेहमी सांगितला जाणारा मार्ग म्हणजे पाणी, खते, कीटकनाशके यासारख्या बाह्य साधनांचा मोठ्या प्रमाणात वापर करण्याचा मार्ग त्यांच्या आवाक्याबाहेरचा आहे हेही त्यांना स्पष्टपणे दिसते आहे. कारण त्यासाठी आवश्यक ती रोख रक्कम वा कर्जासाठी पत त्यांच्याकडे नसते.

खरेतर पाणी, खते, कीटकनाशके यांचा मोठ्या प्रमाणात वापर जमिनीला हानिकारक ठरतो व तो मोठ्या शेतकऱ्यांनाही परवडणारा नाही हे आता सर्वांच्याच लक्षात आले आहे. त्यामुळे आजच्या बाह्य साधनांच्या भरपूर वापरावर आधारित परंतु अशाश्वत शेतीपद्धतीचा त्याग करण्याची वेळ आली आहे. त्याऐवजी वरील बाह्य साधनांचा कमी वापर असणाऱ्या व म्हणून कमी खर्चाच्या अशा आर्थिक व पर्यावरणीयदृष्ट्या शाश्वत शेती पद्धतींचा अवलंब करण्याची आज नितांत गरज आहे.

महाराष्ट्र शासनानेही आता शाश्वत शेतीला अधिकृत धोरण बनवले आहे. वंचित घटकांचा विचार करता त्यांच्या आर्थिक ताकतीच्या बळावर त्यांच्या जमिनीच्या छोट्या तुकड्यातून अन्नसुरक्षितता मिळवण्यासाठी व पोषक आहाराची गरज भागवण्यासाठी कमी खर्चाच्या शाश्वत शेती तंत्राचा वापर महत्त्वाचा ठरेल. त्यामुळे वंचित घटकांना शाश्वत शेतीचे दार खुले करून देणे हे शेती धोरणाचे व विकास धोरणाचे प्रथम उद्दिष्ट असायला हवे.

ह्या उद्दिष्टाच्या पूर्तीसाठी प्रयासतर्फे होणाऱ्या कामामध्ये कमी खर्चाच्या शाश्वत शेतीच्या पुढील चार पद्धतींवर भर दिला जात आहे. (१) सुपीक माती किंवा बागमाती तयार करणे, (२) पीक संगोपन करणे, (३) एकात्मिक कीड नियंत्रण साधणे, (४) कुंपण व सूक्ष्म वातावरण निर्मिती करणे.

शाश्वत शेतीच्या वरील पद्धतींचा अवलंब केल्याने शेतीची उत्पादकता दीर्घकाळ टिकून राहण्यास मदत होईल. याचबरोबर बाह्य साधनांवरील अवलंबित्व म्हणजेच रोख रक्कम वा कर्जाची गरज कमी होऊन ग्रामीण भागातील वंचित घटकांच्या उपजीविकेस बळकटी मिळेल. या धारणेने प्रयासच्या संसाधने व उपजीविका गटातर्फे 'कमी खर्चाच्या शाश्वत शेती'वरील चार सूत्री कृती–कार्यक्रम राबवला जातो आहे.

## कमी खर्चाच्या शाश्वत शेतीचा चार सूत्री कृती–कार्यक्रम

प्रयासच्या चार सूत्री कार्यक्रमातील प्रयोग व प्रत्यक्षदर्शनाचे काम साने गुरुजी राष्ट्रीय स्मारक, वडघर, ता. माणगांव, जि. रायगड येथे असणाऱ्या प्रयासच्या संसाधने व उपजीविका अभ्यास केंद्रात चालू आहे. सेंद्रिय पदार्थांचा वापर करून मातीचा कस व पोत सुधारण्याची तंत्रे, विविध टप्प्यांमध्ये पिकांची योग्य वाढ व्हावी यासाठी पीक संगोपनाची तंत्रे व पिकांवरील कीड व्यवस्थापनाची एकात्मिक तंत्रे यावर विविध प्रयोग या अभ्यासकेंद्रावर चालू आहेत. कमीत कमी साधनात व खर्चात सुपीक माती बनवणे, बांधावर व कुंपणात बहुउपयोगी वनस्पतींची लागवड, हरित – सजीव कुंपणाची लागवड, शाश्वत शेती तंत्राने वाढविण्यात येणारी परसबाग व छोटे भाजीपाला प्लॉट, कीड व्यवस्थापनासाठी विविध नैसर्गिक तंत्रे इत्यादी सारख्या शाश्वत शेतीतील विविध घटक व तंत्रांचे एक जिवंत प्रत्यक्षदर्शन (डेमोन्स्ट्रेशन) उभे करण्याचे कामही या केंद्रावर चालू आहे.

कोकणातील समाजकार्य करणाऱ्या विविध संस्था संघटनांच्या कार्यकर्त्यांसाठी एक नियमित (आठ शिबिरांची मालिका असणारा) प्रशिक्षण कार्यक्रम सध्या प्रयासतर्फे या केंद्रावर राबवला जातो. डहाणू पासून ते देवगड पर्यंतच्या कोकणपट्ट्यातील एकूण नऊ सामाजिक संस्था – संघटनांच्या प्रशिक्षित कार्यकर्त्यांच्या शाश्वत शेतीचे काम करणाऱ्या आघाडी तुकड्या या प्रशिक्षण कार्यक्रमातून तयार होत आहेत.

प्रयोग व प्रत्यक्षदर्शन यातून मिळणाऱ्या तांत्रिक, आर्थिक व सामाजिक माहितीचे सखोल व पद्धतशीरपणे संकलन चालू आहे. त्याच बरोबर महाराष्ट्रातील विविध ठिकाणी चालू असलेल्या शाश्वत शेतीतील प्रयत्नांचे पत्र व प्रत्यक्ष भेटीद्वारे माहिती संकलनही प्रयासतर्फे केले आहे.

## शाश्वत शेतीच्या कामामध्ये सहभाग

कमी खर्चाच्या शाश्वत शेती कार्यक्रमामध्ये आपण विविध प्रकारे सहभाग देऊ शकता.

- आपण आपल्या सहकाऱ्यांसह साने गुरुजी राष्ट्रीय स्मारक, वडघर, परिसरातील प्रयासच्या अभ्यासकेंद्रास अवश्य भेट द्यावी. त्याद्वारे आपण शाश्वत शेती पद्धती व तंत्राची माहिती घेऊन, आपआपल्या ठिकाणी स्वतः त्या पद्धतींचा अवलंब करू शकाल तसेच इतरांना तसे करण्यास प्रवृत्त करू शकाल.
- आपणास अधिक खोलात जाऊन माहिती घ्यावयाची असल्यास ५ ते १५ जणांचा गट जमवून आमच्या प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये सामील होऊ शकता.
- आपण अनुभवी शेतकरी किंवा शेती संबंधातील विषयाचे तज्ज्ञ असाल तर प्रयासतर्फे चालणाऱ्या प्रयोग, प्रशिक्षण व माहिती संकलनाच्या कामाला हातभार लावू शकाल.
- आपणास सामाजिक कार्यास हातभार लावण्याची इच्छा असल्यास संसाधने व उपजीविका गटातर्फे चालू असलेल्या शाश्वत शेती उपक्रम तसेच इतर विविध उपक्रमांमध्ये आपण इतरही वेगवेगळ्या तऱ्हेने सामील होऊ शकाल.

## प्रयोग/प्रत्यक्षदर्शनाचे ठिकाण :

प्रयासचे संसाधने व उपजीविका अभ्यासकेंद्र,
द्वारा : साने गुरुजी राष्ट्रीय स्मारक वडघर, ता. माणगाव,
जि. रायगड. फोन नं. – ०२१४० – २५०२०५

## प्रयासच्या संसाधने व उपजीविका गटातर्फे चालणारे काम

२००० सालापासून प्रयास ऊर्जा गटांतर्गत 'संसाधने व उपजीविका' गट कार्यरत आहे. या गटामध्ये प्रामुख्याने नैसर्गिक संसाधने व त्यावर अवलंबून असणाऱ्या लोकांची उपजीविका या विषयावर काम सुरू आहे. वंचित घटकांचा उपजीविकेचा प्रश्न विकासावरील चर्चेच्या व प्रयत्नांच्या केंद्रस्थानी कसा आणता येईल यावर संसाधने आणि उपजीविका गट काम करीत आहे. या गटात खालील विषयावर काम चालू आहे.

१) शाश्वत उपजीविकेचा विकासविषयक दृष्टिकोनाच्या मांडणीचे काम

शाश्वत उपजीविका या विषयावर संकल्पनात्मक आणि कार्यक्रमात्मक अशा दोन अंगाने काम करण्याचा या गटाचा उद्देश आहे. यामध्ये, 'शाश्वत उपजीविका' यावर आंतरराष्ट्रीय स्तरावर चाललेल्या चर्चेचा अभ्यास करणे आणि या चर्चेत सहभागी असणाऱ्या आंतरराष्ट्रीय संस्थांच्या भूमिकेची चिकित्सा करणे हा या कामाचा एक भाग आहे. तळागाळातल्या कार्यकर्त्यांसमोर या चर्चेचे विश्लेषण मांडून त्यांची दृष्टी, त्यांचा अनुभव आंतरराष्ट्रीय पातळीवरील चर्चेमध्ये नेण्यासाठी प्रयत्न करण्याची या गटाची इच्छा आहे. तसेच पर्यायी प्रतिमानाच्या संकल्पनात्मक बाजूवर विचार करणे आणि 'शाश्वत उपजीविकेच्या विकासविषयक दृष्टिकोनाची (Sustainable Livelihood Perspective) संकल्पनात्मक आणि कार्यक्रमात्मक अशा दोन पातळ्यांवर मांडणी करणे, हा या कामाचा दुसरा भाग आहे.

२) अ) आदिवासी कुटुंबाच्या प्रत्यक्षातील उपजीविकांचे विवरण

रायगड जिल्ह्यातील आदिवासींच्या उपजीविकेच्या परिस्थितीसंबंधी सखोल माहिती मिळवणे हे या अभ्यासामागील प्रमुख उद्दिष्ट आहे.

ब) इतर अभ्यासात्मक उपक्रम

- रायगड जिल्ह्यातील सरकारी पातळीवर दारिद्र्य-निर्मूलन व आदिवासी विकासाचा योजनांचा अभ्यास तळागाळातील संघटनांच्या दृष्टीतून करणे.
- सरकारने स्वीकारलेल्या पर्यायी योजनेचा (परसबाग योजना) अभ्यास करणे.

३) कमी बाह्य साधनांची शाश्वत शेती

समाजातील वंचित समूहाच्या शाश्वत उपजीविकेसाठी रोख पैसे व बाह्य साधनाची गरज कमी असणाऱ्या कसणूकीच्या पद्धती व तंत्रे (विशेषत: नैसर्गिक संसाधनांच्या व्यवस्थापनासंबंधी) यावर काम करणे हे गटाचे दुसरे प्रमुख उद्देश्य आहे. या कामामध्ये प्रयोग, प्रत्यक्षदर्शन (डेमॉन्स्ट्रेशन), प्रशिक्षण, व माहितीसंकलन असा चार सूत्री कार्यक्रम चालू आहे.

## प्रयासविषयी

प्रयास हा वैद्यकीय व तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील काही व्यावसायिकांनी एकत्र येऊन स्थापलेला व कायद्यानुसार नोंदलेला सार्वजनिक विश्वस्त निधी आहे. प्रयासच्या वतीने 'आरोग्य', 'ऊर्जा', 'शिक्षण व पालकत्व' तसेच 'संसाधने व उपजीविका' ह्या क्षेत्रांत अनेक उपक्रम चालवले जातात. आपले व्यावसायिक ज्ञान व कौशल्ये वापरुन समाजातील वंचित वर्गांच्या स्वउन्नतीसाठीच्या प्रयत्नांना व संघर्षांना साहाय्यभूत ठरावे ह्या उद्देशाने प्रयासचे सदस्य काम करीत असतात. संशोधन, विश्लेषण, प्रशिक्षण, माहितीचा प्रसार, वाङ्मनिर्मिती, इ. विविध मार्गांनी वरील उद्देशांच्या पूर्तीसाठी प्रयत्न केले जातात.

प्रयास

**संसाधने व उपजीविका गट :** 'मंगेशपुष्प', सर्व्हे नं. १३३, स्वामी विवेकानंद सोसायटी, बायफच्याजवळ, वारजे, पुणे – ४११०५२, ☎ ५२३ २८३६, मोबाईल–९४२२३१७५३०, फॅक्स – ५६७ ३११८/५४२ ०३३७, E-mail: reli@vsnl.net Web-site: www.prayaspune.org

**नोंदणीकृत कार्यालय :** अमृता क्लिनिक, आठवले कॉर्नर, कर्वे रोड, पुणे–४११ ००४, ☎ ५४४१२३०,५४२०३३७.